म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

REFBK-0006140

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ४९३

म. ग्रं. सं. ठा
विषय
सं. नं.

# नोकरशाही की पन्नास टक्के?

प्रभाकर पाध्ये

# पाकिस्तान कीं पन्नास टक्के ?

६४७०

— लेखक —

REFBK-0006140

डिसेंबर १९४१ ]

[ किंमत १ रुपया

प्रकाशक :–

**डॉ. माधव भैरव उद्‌गांवकर,**

हरी निवास, हिंदु कॉलनी,

माटुंगा, मुंबई.

या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन हक्क श्री. **कृष्णाजी नारायण सापळे** [ रामकृष्ण प्रकाशन मंडळ, ज्यूडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, मुंबई नं. ४ ] यांजकडे आहेत. पुढील आवृत्तीचे वगैरे हक्क लेखकाच्या स्वाधीन.

मुद्रक :–

**कृष्णाजी नारायण सापळे,**

रामकृष्ण प्रिन्टिंग प्रेस,

ज्यूडेक्स बिल्डिंग, त्रिभुवनरोड,

मुंबई नं. ४

# प्रकाशकाचें निवेदन

माझे परम स्नेही श्रीयुत प्रभाकर पाध्ये यांनीं बॅ. आंबेडकर यांच्या The Thoughts on Pakistan या पुस्तकावर विस्तृत परीक्षण आपल्या 'धनुर्धारी' पत्रामध्यें सुरू केलें. पहिले ३।४ लेख वाचल्यावर, निर्भेळ बुद्धिवादी दृष्टीनें मुस्लिम लीगच्या राजकारणाचें प्रतिगामी स्वरूप चवाठ्यावर मांडण्याचें काम या लेखांइतकें दुसऱ्या कोणी केलें नाहीं असें मला दिसून आलें. श्रीयुत पाध्ये यांना हे लेख पुस्तकरूपानें काढण्याची कल्पना मी सुचविल्यावर त्यांना ती पसंत पडली व त्यांनीं पुढील लेख विशेष मेहनत घेऊन लिहिले व मला ते पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याची परवानगी दिली. श्रीयुत पाध्ये हे हिंदुसभावादी नाहींत. त्यांच्या व माझ्या राजकीय दृष्टिकोनांत महत्त्वाचें अंतर आहे. ते स्वतःला बुद्धिवादी राष्ट्रीयत्वाचे पुरस्कर्ते म्हणवितात. या भूमिकेवरून शक्य तितक्या तर्कशुद्धतेनें मुस्लिम लीगच्या राजकारणांची मीमांसा केल्यावर त्या राजकारणाचें स्वरूप प्रतिगामी आणि राष्ट्रीयत्वाच्या विकासास मारक आहे असा असंदिग्ध निष्कर्ष त्यांना काढावा लागला हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. निर्भेळ राष्ट्रीय दृष्टि असलेल्या अभ्यासू व विचारशील लेखकाला पाकिस्तानची मागणी पुढें ठेऊन बेसुमार अराष्ट्रीय हक्क माण्याचा डाव मुसलमान पुढारी अत्यंत मुत्सद्देगिरीनें कसा खेळत आहेत हें दिसून आलें. पाकिस्तानची

मागणी पुरवूं न शकणाऱ्या ब्रिटिश मुत्सद्यांच्या, व पाकिस्तानच्या मागणीनें भांबावलेल्या हिंदी पुढाऱ्यांच्या मदतीनें पाकिस्तानची मागणी स्वार्थत्यागपूर्वक मागें घेण्याच्या नाटकाला किंमत म्हणून भरमसाट अराष्ट्रीय मागण्या मिळण्याचा संभव उत्पन्न होणें अशक्य नाहीं. तेव्हां हा प्रश्न समाजापुढें स्वच्छ स्वरूपांत मांडणें जरूर आहे आणि तोच हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचा उद्देश आहे.

हा उद्देश सफल होण्यांत रामकृष्ण प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. कृ. ना. सापळे हेच मुख्यतः कारण आहेत. श्री. सापळे यांनीं अत्यंत मोकळेपणानें व सौजन्यानें या पुस्तकाची जबाबदारी, माझ्या त्यांच्याशी झालेल्या पहिल्या भेटींतच, आपल्यावर घेतली याजबद्दल त्यांचे आभार मानावेत तितके थोडेच आहेत.

पाकिस्तानबद्दल सर्व विचारवंत लोकांचें मत विरुद्ध आहे. अलाहाबाद विश्व-विद्यालयाचे शासनशास्त्राचे प्रोफेसर श्री. बेनीप्रसाद आपल्या The Hindu-Muslim Questions या पुस्तकांत म्हणतात—

"But a durable partition of India is not less difficult than a re-distribution of the Himalayan ranges, the abolition of history, the destruction of patriotism as such, or the obliteration of the genius of the modern age."

परंतु तडजोड म्हणून पाकिस्तानपेक्षांहि भयंकर स्वरूपाच्या मागण्या, पाकिस्तान मागें जाऊन पुढें येऊं लागण्याचा संभव आज कोठें कोठें दिसूं लागला आहे.

मुस्लिम लीगच्या राजकारणाबद्दल श्रीयुत पाध्ये यांच्या निष्कर्षांहून दुसरा अभिप्राय हिंदुमहासभेचा नाहीं. हिंदुमहासभेबद्दल अत्यंत गैरसमज आहे. हिंदु-महासभेनें जितका अपशब्दांचा वर्षाव सोसला आहे तितका दुसऱ्या कोणत्याही संस्थेनें सोसलेला नाहीं. हिंदुमहासभा अगर हिंदुसंघटनवादी सर्व देशभर विखुरले असल्यानें व त्यांना हुकमी वर्तमानपत्रांचा आधार नसल्यामुळें समाजामध्यें पसरविलेले गैरसमज त्या त्या वेळीं दूर करणें शक्य नसतें. निरनिराळ्या प्रवृ-त्तींच्या देशभक्तांनीं हें काम निरनिराळ्या ठिकाणीं चालविलेलें असल्यामुळें

त्या त्या व्यक्तींनीं कालप्रसंगांनीं केलेलीं भाषणें, दिलेल्या मुलाखती व प्रसिद्धि-लेलीं व्यक्तव्यें फक्त त्या त्या व्यक्तींचीं मतें असूं शकतील. हिंदुमहासभेची अधिकृत मतें तशीच आहेत कीं काय याचा निर्णय अगर पडताळा न घेतां बरीच टीका केली जाते; व हिंदुमहासभा अत्यंत प्रतिगामी, सरकारच्या चरणावर विलीन झालेली, इतरधर्मीयांचा अवास्तव द्वेष करणारी, व अराष्ट्रीय आहे असाच या टीकेचा नेहमीं सूर असतो. अशा टीकाकारांना, हिंदुमहासभेचें अधिकृत मत पाहूनच टीका करा एवढी विनंती आहे. बॅ. सावरकरांनीं एके ठिकाणीं स्पष्ट शब्दांमध्यें इषारा दिला आहे तो पाहा :

It must however be borne in mind that the individual views of the leaders of the Mahasabha or of the Hindu Sangathan movement in general; cannot be taken as identical with the corporate view of the Hindu Mahasabha itself. The corporate aim, object & outlook of the Mahasabha as a body at any time can only be ascertained through the resolutions passed at its annual sessions and authorised committees representing it from time to time.

मुसलमानांचें राजकारण जर मुळांतच प्रतिगामी असेल व श्री. पाध्ये यांनीं दाखविल्याप्रमाणें ते दिवसेंदिवस अधिकाधिक प्रतिगामी होत असेल तर या प्रतिदिवशीं अधिकाधिक प्रतिगामी होत जाणाऱ्या राजकारणाला वाढता विरोध करणारी हिंदुमहासभा त्या प्रमाणांत पुरोगामी आणि खऱ्या राष्ट्रीयत्वाला पोषक ठरते हें उघड आहे. प्रारंभीं सामाजिक व धार्मिक कार्यावर जोर देणारी व त्या करितां झटणारी हिंदुमहासभा मुसलमानांच्या प्रतिगामी आणि राष्ट्रीयताविरोधी राजकारणाला पद्धतशीर विरोध हेंच प्रमुख कार्य करणारी संस्था कशी झाली हा इतिहास जरी उद्‌बोधक असला तरी तो सांगण्याचा मोह, वेळ व जागा नसल्या-मुळें, टाळणें भाग आहे.

हिंदुमहासभेची चळवळ ही मुसलमानांच्या राष्ट्रीयताविरोधी चळवळीची निव्वळ प्रतिक्रिया आहे. हिंदुमहासभेच्या प्रस्थापनेचा इतिहास सूक्ष्म नजरेनें

पाहिला तर तिचें स्वरूप चटकन् ध्यानांत येईल. मुस्लिम लीगच्या चळवळींतच हिंदुमहासभेचा उगम आढळतो. १९०६ सालीं डाक्याच्या नवाबाच्या प्रेरणेनें डाक्का येथें मुस्लिम लीगचा पाया घातला गेला. या लीगच्या प्रस्थापनेनंतर लगेच पूर्व बंगालमध्यें हिंदु विधवांना पळविणें वगैरे प्रकार सुरू झाले आणि या गुंडगिरीला प्रतिकार करण्यासाठींच त्या प्रांतांत हिंदु युवकांनीं अनुशीलन समित्या स्थापन केल्या. वंगीय हिंदूंत ही जी जागृति झाली त्यांतूनच संयुक्त बंगाल परिषद भरली आणि तिच्या बैठकींत हिंदूंच्या दुःस्थितीबद्दल चर्चा झाली. मात्र हिंदुसभेची रीतसर स्थापना करण्याचें श्रेय पंजाबकडे जातें. १९०७ सालीं हिंदुमहासभेचा पाया पंजाबांत घातला गेला आणि तेव्हांपासून हिंदुमहासभेनें मुसलमानांच्या प्रतिगामी राजकारणाला विरोध करण्याचें व्रत अविरतपणें आचरिलें.

मुसलमानांच्या प्रतिगामी राजकारणाला विरोध करण्यांत हिंदुमहासभेनें राष्ट्रीयत्वाचीच उपासना केली हें उघड होय. मुसलमानांच्या मागण्यांबद्दल हिंदुमहासभेनें जी वृत्ति धारण केली तिचें अवलोकन केलें तर हिंदुमहासभेच्या राष्ट्रीयत्वाची चांगलीच प्रतीति येईल. या मागण्यांकडे – प्रतिगामी जातीय मागण्यांकडे – हिंदुमहासभेनें नेहमींच निर्मळ राष्ट्रीय दृष्टीनें पाहिलें आहे. हिंदुमहासभेच्या अधिवेशनांत वेळोवेळीं स्वीकृत झालेल्या ठरावांकडे पाहिलें तर हें सहज दिसून येईल.

उदाहरणेंच द्यावयाचीं झालीं तर प्रथम विभक्त मतदारसंघाचें देतां येईल. १८९२ पासूनच मुसलमानांना विभक्त मतदारसंघाचा आसरा सांपडला आहे. पण विभक्त मतदारसंघ हा राष्ट्रीयत्वाला मारक आहे हें जाणून हिंदुमहासभेनें विभक्त मतदारसंघाला सदोदित विरोध केला. जातीय मतदारसंघाला हिंदुमहासभेचा सक्त विरोध आहे आणि या बाबतींत महासभेची वृत्ति अगदीं निष्पक्षपाती आहे. म्हणजे ज्या प्रांतांत हिंदु बहुसंख्य आहेत तेथेंच हिंदुमहासभेनें विभक्त मतदारसंघाला विरोध केला असें नव्हे, तर ज्या प्रांतांत हिंदु अल्पसंख्य

आहेत अशा बंगाल, पंजाब, सिंध, सरहद्द सारख्या प्रांतांतही तिनें जातीय मतदारसंघाला विरोध करून संयुक्तमतदार संघाचाच आग्रह धरलेला आहे. १९२८ सालीं श्री. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं जबलपुरास भरलेल्या अधिवेशनांत महासभेनें अगदीं स्पष्ट शब्दांत जाहीर केलें कीं, जातीय प्रतिनिधित्वाचा राष्ट्रीयत्वाला मूलभूत विरोध आहे [ Communal representation is fundamentally opposed to natonalism. ]. हें सुवर्णवचन ध्यानांत ठेऊन महासभेनें पुढील वर्षी याबद्दल एक लांबलचक ठराव केला. त्यांत खालील तत्त्वें अंतर्भूत होतीं—

The Hindu Maha Sabha has consistently and all along been of opinion that no communalism in any shape or form be introduced in the political administration of the country either in the matter of representation in Legislatures or any of the other elective bodies or in the services.........

There shall be uniformity of franchise for all communities in each province.

Elections to all the elective bodies shall be by mixed electorates.

There shall be no reservation of seats on communal considerations in any of the elective bodies and educational institutions.

The basis of representation of different communities shall be uniform, such as voting strength or taxation.

There shall be no communal representation in the public services which must be open to all communities on the basis of merit and competency ascertained through open competitive test.

The redistribution of provinces in Hindusthan, if and when necessary, shall be made on their own merits in the light of principles capable of a general application with due

regard to administrative, financial, strategic and similar other considerations but no new province shall be created with the object of giving a majority therein to any particular community.

प्रतिनिधित्वाच्या बाबतींत हिंदुमहासभेनें नेहमीं अशी राष्ट्रीय आणि तत्त्वशुद्ध दृष्टि तर ठेवलीच आहे, पण मुस्लिम अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत तिनें कधींच कोणता अनुचित आग्रह धरलेला नाहीं. राष्ट्रसंघानें अल्प-संख्याकांचा प्रश्न सोडविण्यासाठीं ज्या तत्त्वांचा अवलंब केला त्यांना मान्यता देण्याची तिची केव्हांही तयारी होती आणि आजही आहे. १९३२ आणि १९३३ सालीं महासभेच्या अधिवेशनांत यासंबंधीं अगदीं असंदिग्ध ठराव स्वीकृत झाले आहेत:—

"The Hindu Mahasabha in accordance with its previous resolutions, recommends that the communal problem of Hindusthan be settled, on all-India basis, on the lines of the International Communal Award as embodied in Minorities guaranteed Treaties to which His Majesty's Government and the Government of India are already committed as parties and signatories, and which, in the words of Mr. Henderson now form part of "The Public Law of Europe & of the world." [1932]

The Hindus, even where they are in minorities in provinces like Bengal, Punjab, Sindh and N. W. F. Province are on principle opposed to communal electorates and reservation of any form at any stage for any community in any province as a complete negation of any Responsible Government and Dominion Constitution and declare with one voice for such recognition of minorities and their safeguards as is laid down with the common consent of the principal nations of the world including Hindusthan & England, in the treaties called Minority Treaties signed by them and enforced on so many Sovereign States of Europe including Turkey, as a world solution of the communal problem to operate as a part of "The Public Law of Europe and the world"...

The Hindu Maha Sabha......appeals under Article XI of League convenant in the name of India to the League of Nations of which she is an original member, of the application of those principles and methods of minority protection which are endorsed and made operative by world opinion on the subject and on the initiative of the principal Allied and Associated Powers including India and England. [1933.]

राजकीय ध्येयाच्या दृष्टीनें पाहिलें तरी हिंदुमहासभा ही इतर कोणत्याही राजकीय संस्थेइतकी प्रगत असल्याचें आढळून येईल. संपूर्ण स्वातंत्र्य हेंच हिंदुमहासभेचें ध्येय आहे. आणि लोकसत्तावादावरच या स्वातंत्र्याची उभारणी झाली पाहिजे असा तिचा कटाक्ष आहे. या बाबतींत मुस्लिम लीगचें राजकारण किती प्रतिगामी आहे हें आतां जगजाहीर झालें आहे. लोकसत्तावादाला मुस्लिम लीगचा कां, कसा आणि किती विरोध आहे हें श्री. पाध्ये यांनीं या पुस्तकांत सप्रमाण दाखविलेंच आहे. लीगच्या लोकसत्ताविरोधी राजकारणास हिंदुमहासभेचा सक्त विरोध आहे, आणि या विरोधांतच तिच्या लोकसत्तावादी राष्ट्रीयत्वाचा विशुद्ध आविष्कार होत आहे.

याच्या उलट लोकसत्तावाद आणि संपूर्ण स्वातंत्र्य यांचे मंत्र सदोदित तोंडांत वागविणाऱ्या कॉंग्रेसनें आणि महात्मा गांधींनीं मुसलमानांच्या लोकसत्ता-विरोधी, स्वातंत्र्यविरोधी आणि प्रतिगामी राजकारणाचे विकृत चोंचले पुरविण्या-चेंच कार्य अधिक केलें आहे. राजकारणामध्यें खिलाफतीसारख्या धार्मिक बाबी घुसडून हिंदी राजकारणाचा चुथडा केला गेला. हिंदुमुसलमानांची खिलपत चळवळीच्या वेळची एकी मुसलमानांनीं आपला मतलब साधण्याकरितांच केलेली होती हेंही आतां सुस्पष्ट झालें आहे. लोकमान्य टिळकांचें मत खिलापत चळवळीला शक्य तितकें साहाय्य द्यावें, परंतु हिंदी राजकारणाशीं त्याचीं सांगड घातली जाऊं नये असेंच होते हेंही सुप्रसिद्धच आहे. कॉंग्रेसच्या गांधीप्रणीत धोरणानें देशाचें अगदीं स्पष्ट स्पष्ट नुकसान झालें आहे हें सहज सिद्ध

करून देतां येईल. भाई परमानंद यांनीं, हिंदुसभेच्या इंद्रनारायण यांनीं लिहिलेल्या वृत्तांतास जोडलेल्या उपोद्घातामध्यें याचें सुंदर विवेचन केलें आहे. १९२२ सालीं लॉर्ड रीडिंग यांनीं समेटाचीं बोलणीं चालविलीं होतीं त्याचें काय झालें तेंच उदाहरणार्थ पहा. असहकारितेच्या उत्कर्षबिंदूचा तो काल होता. १९२२ सालीं प्रिन्स ऑफ वेल्स हिंदुस्थानांत येऊन त्यांच्या हातूनच नव्या सुधारणांचें अनावरण हिंदुस्थानांत होणार होतें. युवराजांचे हिंदुस्थानांतील लोकांनीं अगदी हार्दिक स्वागत करावें अशी सरकारची इच्छा होती. व म्हणून हिंदी लोकांचें अनुरंजन करण्यासाठीं लॉर्ड रीडिंग यांनीं कॉंग्रेसशीं समेट करण्याची इच्छा दर्शविली. नव्या सुधारणांत अंतर्भूत असलेल्या द्विदल पद्धतीचें प्रांतिक स्वायत्ततेंत रूपांतर करण्याची तयारी तेव्हां सरकारची होती. हा समेटाचा हात स्वीकारावा असें देशबंधु दास यांचें मत होतें. महात्मा गांधी देखील या समेटाला थोडेबहुत अनुकूल होते. पण तेव्हां तुरुंगांत असलेल्या अलीबंधूंची मुक्तता झाल्याखेरीज लॉर्ड रीडिंग यांची भेट घेण्यासही त्यांनीं नकार दिला. आज ज्याप्रमाणें सत्य, अहिंसा आणि चरखा यांचें मोल म. गांधींना स्वातंत्र्यापेक्षांही अधिक वाटतें त्याप्रमाणें त्याक्षणीं अलीबंधूंची मुक्तता त्यांना प्रांतिक स्वायतत्तेपेक्षां अधिक वाटली. वस्तुतः हा प्रश्न नुसता प्रतिष्ठेचा होता. प्रांतिक स्वायत्तता मिळाली असती तर म. गांधींच्याच हातांत तिचीं सूत्रें गेलीं असतीं व **त्यांना अलीबंधूंच्याच सुटकेनें प्रांतिक स्वायत्ततेची सुरवात करितां आली असती.** पण त्यांनीं आगाऊ मुक्ततेचा हट्ट धरला आणि अलीबंधु अफगाणिस्थानच्या अमिराला सरकारविरोधी कटांत सामील असावेत अशा संशयानें लॉर्ड रीडिंग यानीं म. गांधीची ती अट फेटाळून लावली. क्षणिक लहरीसाठीं म. गांधींनीं देशाच्या प्रगतीस हातभार लावणारी मोठी संधि नाकारली आणि पुढें पंधरा वर्षांनीं त्याच प्रांतिक स्वायत्ततेचा [ Communal Award मुळें ] कुधारून वाढविलेला अवतार मान्य करून राष्ट्राच्या डोक्यावर आदळला. अलीबंधूंनीं या उपकाराची फेड त्यानंतर अगदीं अल्पावधींत कशी केली तें कुप्रसिद्धच आहे.

ही उत्कृष्ट संधि म. गांधींनीं गमावली इतकेंच नव्हे तर अलीबंधु आणि त्यांची खिलाफत यांच्या नादीं लागून त्यांनीं जीनासारख्या पुढाऱ्यांच्या मनांत कायमचें किल्मिष उत्पन्न केलेंच – श्री. पाध्ये यांनीं दाखविल्याप्रमाणें या किल्मिषाचे परिणाम पाकिस्तानच्या रूपानें आज राष्ट्राला भोवत आहेत – आणि एकंदर राष्ट्रीय चळवळीचा पार विचका केला. हिंदी स्वराज्याच्या चळवळींत खिलाफतची भानगड घुसडविल्यामुळें तिची कशी दुर्दशा झाली याचें अति उत्कृष्ट वर्णन मिसेस ॲनी बेझंट यांनीं आपल्या एका पुस्तकांत केलें आहे. त्याचा लांबलचक उतारा डॉ. आंबेडकर यांनीं आपल्या पुस्तकांत दिलेला आहे तो सर्वच्या सर्वच मनन करण्यासारखा आहे, परंतु त्यापैकीं कांहीं थोडाच भाग मी येथें देतों—

Since the Khilafat agitation things have changed and it has been one of the many injuries inflicted on India by the encouragement of the Khilafat crusade that the inner Muslim feeling of hatred against "Unbelievers" has sprung up, naked and unashamed as in years gone by We have seen revived, as guide in practical politics, the old Muslim religion of the sword, we have the dragging out of centuries of forgetfulness, the old exclusiveness claiming the Zazirut-Arab, the island of Arabia, as a Holy land which may not be trodden by the polluting foot of a non-Muslim, we have heard Muslim leaders declare that if the Afgans invaded India, they would join their fellow believers.............we have been forced to see that the primary allegiance of Mussalmans is to Islamic countries, not to our motherland; we have learned that their dearest hope is to establish the "Kingdom of God"–not God as Father of the world, loving all his creatures but as a God seen through Mussalman's spectacles resembling in his command through one of his prophets as to the treatment of unbelievers........The claim now put forward by Mussalman leaders that they must obey the laws of their particular

prophet above the laws of the state in which they live, is subversive of civic order and the stability of the state, it makes them bad citizens for **their centre of allegiance is outside the Nation**......................Such "Laws of God" cannot be allowed to override the laws of a civilized country, ......In thinking of an independent India the menace of Mahomadan rule has to be considered......

मुसलमानांच्या विचित्र अनुनयानें बिघडलेल्या कॉंग्रेसच्या राजकारणाचें पर्यवसान कम्युनल अवॉर्डसारख्या सर्वस्वीं अन्याय्य आणि राष्ट्रविघातक निर्णयाबद्दल neither accept nor reject या सारखी विचित्र भूमिका स्वीकारण्यांत झालें तर नवल वाटण्याचें काय कारण आहे ? कम्यूनल अवॉर्डचें स्वरूप किती निषेधार्ह आहे हें आतां विस्तारानें सांगण्याचें कारण नाहीं. त्यानें जातीय मतदाराचें क्षेत्र सखोल आणि विस्तीर्ण केलें; हिंदु, शिख आणि स्त्रिया यांच्या जाहीर इच्छेला धुडकावून लाऊन त्यानें त्यांच्या डोक्यावर विभक्त मतदारसंघ आदळला; बंगाल आणि पंजाबमधील अल्पसंख्याक हिंदूंना इतर प्रांतांतील अल्पसंख्याक मुसलमानांप्रमाणें संरक्षण द्यावयाचें बाजूलाच राहून लोकसंख्येनुसार जेवढें प्रतिनिधित्व मिळावयास हवें होतें त्यावरही त्यानें काट मारली, व तेथील हिंदूंचें त्या त्या प्रांतातील सार्वजनिक आणि सांस्कृतिक जीवनांत जे स्थान आहे त्याच्याशीं अगदीं मेळ न पडणारें प्रतिनिधित्व त्यानें त्याच्या माथीं मारलें; आणि सर्वांत अत्यंत अनुचित गोष्ट म्हणजे या निर्णयामुळें युरोपिअन आणि अँग्लोइंडियन जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या मानानें अगदीं भरमसाट प्रतिनिधित्व मिळालें. सत्य व अहिंसा यांचा सारा वेळ ध्यास लागलेल्या कॉंग्रेसनें neither accept nor reject या अर्थशून्य भूमिकेवर उभें राहून व्यवहारांत त्यास मान्यता दिली यापेक्षां त्या "राष्ट्रीय" संस्थेच्या राष्ट्रीयताविरोधाचा दुसरा पुरावा कोणता हवा ?

हिंदुमुसलमानांच्या ऐक्यासाठीं आम्हाला ही भूमिका स्वीकारावी लागली असें कॉंग्रेसवाले सांगतील. हिंदुमुस्लिम ऐक्याची ही सबब फार गोंडस दिसते,

पण तिनेंच फार गोंधळ माजविला आहे. या भूमिकेनें किती हिंदु-मुस्लिम ऐक्य साधलें? चेपत चालल्यावर आपणास पाहिजे तें मिळण्याची खात्री बळावली कीं नाहीं? ही भूमिका ज्या राष्ट्रीय मुसलमानांकरितां स्वीकारली त्यांच्या संख्येमध्यें तरी कांहीं वाढ झाली काय? यापेक्षां एकदांच अल्पसंख्याकांचें संरक्षण अमक्या पद्धतीनें काँग्रेस मान्य करते, मुसलमानाच्या संस्कृतीवर, ठरलेल्या हक्कांवर, धर्मावर कोणतेंही अतिक्रमण काँग्रेस करणार नाहीं असें स्पष्ट सांगून राष्ट्रीय संस्थेचे दरवाजे सर्वांसच मोकळे आहेत, पाहिजे त्यानें यावें, अशी घोषणा काँग्रेसनें कां केली नाहीं?

हिंदु-मुस्लिम ऐक्य हिंदु महासभेलाहि हवें आहे. त्यासाठीं 'दे वाण घे वाण' या न्यायानें आजपर्यंत थोडा का प्रयत्न हिंदुमहासभेनें केला? "No Swaraj without Hindu-Muslim Unity" अशी घोषणा करण्याची मात्र हिंदुमहासभेची तयारी नाहीं. No Swaraj without Hindu-Muslim Unity ही घोषणा काँग्रेसला शोभत नाहीं. ती सरकारच्या तोंडांत शोभते; आणि बरोबर याच घोषणेच्या जोरावर आज ॲमेरीसाहेब स्वराज्याची भाषाही करूं देत नाहींत. म्हणजे काँग्रेसचें हें धोरण सरकारच्या अगदीं पथ्यावर पडलें आहे. याच्या उलट, मुसलमान आले तर त्यांच्या साहाय्यानें, न आले तर त्यांच्याशिवाय आणि ते विरोध करतील तर त्यांना विरोधून आम्ही स्वातंत्र्याची चळवळ करणार, अशी हिंदुमहासभेची भूमिका आहे. आणि स्वराज्य हें कोणाच्या दानानें मिळत नाहीं, तें स्वपराक्रमानें मिळवावें लागतें, हें चिरंतन सत्य ज्यांना माहीत आहे ते हीच भूमिका अधिक तर्कशुद्ध आणि मार्गदर्शक आहे हें कबूल करतील.

मी पुनः सांगतों कीं, आम्हांला हिंदु-मुस्लिम ऐक्य हवें आहे. ज्या स्वराज्याचीं स्वप्नें आम्हाला पडतात त्यांत हिंदु-मुस्लिम ऐक्याचीं दृश्यें दिसतील असाच विश्वास आम्हाला वाटतो. या स्वराज्यांत मुसलमानादि अल्पसंख्याकांचे जे कांहीं रास्त हितसंबंध असतील त्यांचें कसोशीनें संरक्षण होईल अशी ग्वाही हिंदुमहासभा

देते. अल्पसंख्याकांचें हितसंरक्षण करण्याची जी कांहीं योजना राष्ट्रसंघासारखी एकादी संस्था अगर कॉंग्रेस, हिंदुमहासभा, मुसलमान, शीख वगैरेंनीं स्वीकारलेलें एखादें आंतर्राष्ट्रीय मंडळ (International Commission) सुचवील ती हिंदुमहासभेला मान्य होईल. हें सर्व अगदीं स्पष्ट असतांना हिंदुमहासभेला जातीय अगर इस्लामचा शत्रु असें संबोधण्यास काय अर्थ आहे? हिंदुमहासभेला इस्लाम अगर त्यांचे अनुयायी यांचा द्वेष वाटत नाहीं. धर्म बदलला म्हणून हाडामांसाच्या भावाचा द्वेष आपण करूं शकूं काय? पण त्या भावानें आपल्या मातृभूमीशीं इमान राखून, तिच्यावर निष्ठा ठेऊन, तिच्या सेवेमध्यें, तिच्या उत्कर्षामध्यें भागीदार व्हावयास नको काय? एवढी खात्री, एवढी हमी, मुसलमान आज देऊं शकतात काय? हिंदुस्थानमध्यें हिंदूंची संख्या केव्हांही जास्त राहणार हा हिंदूंचा काय दोष? आम्हाला मुसलमानाशीं एकी करण्याची उत्कट इच्छा आहे; पण ही एकी समर्थांची हवी, भेकडांची नको अगर मेंढ्या-लांडग्यांचीहि नको. हिंदु-मुस्लिम ऐक्याबद्दल कांहीं वर्षांपूर्वीं मुसलमानांचे कायदे-आझाम जीना यांनींच एकदां मोलाचे उद्‌गार काढले होते ते मला येथें आठवतात. हिंदुमुसलमानांची एकी कशी साधावयाची हें मुसलमानांना सांगतांना ते म्हणतात:—

"Organise yourself and unite. I make no secret of it that we have got a lot of rubbish in our midst; we must improve, rise up and weed that out. If we go through that process and bring out better Muslims, the finest steel of the Muslims; and if the Hindus do the same and equally bring out their finest steel, then there will be real unity and on that day, the freedom of India is won."

हिंदुमहासभा तरी यापरतें दुसरें काय सांगते?

माटुंगा,
मुंबई.

[डॉ.] **माधव भैरव उदगांवकर**

मराठा

# खुलासा

डॉ. आंबेडकरांच्या, ' दि थॉट्स् ऑन पाकिस्तान ' या पुस्तकाचें परीक्षण म्हणून मी या लेखमालेस सुरवात केली, पण दुसऱ्याच लेखांकापासून तिला स्वतंत्र पुस्तकाचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें.–आणि पुढें ती पुस्तकरूपानें छापून काढावयाचें ठरविल्यावर तर तिचें हें स्वतंत्र स्वरूप अधिकच वाढीस लागलें. पण याचा अर्थ असा नव्हे कीं या लेखमालेचें श्रेय डॉ. आंबेडकरांच्या पुस्तकास मुळींच नाहीं. हिंदी राजकारणाची विचक्षणा करणारा ग्रंथ या दृष्टीनें डॉक्टरसाहेबांचें हें पुस्तक अप्रतिम आहे. त्याच्या वाचनानें गेल्या पन्नास वर्षांतील हिंदुमुसलमानांच्या प्रश्नाचा सांगोपांग इतिहास तर आपल्याला समजतोच, पण त्याच्या अनुषंगानें कॉंग्रेस, खिलाफत आणि मुस्लिम लीग यांच्या विविध चळवळींच्या इतिहासाचेंहि अनपेक्षित आणि आश्चर्यकारक दर्शन बऱ्याच प्रमाणांत होतें; आणि म्हणूनच हिंदुस्थानच्या आधुनिक राजकारणाचा ज्ञानकोश असें वर्णन या पुस्तकाचें केलें तरी तें अगदींच कांहीं अतिशयोक्तीचें ठरणार नाहीं. अर्थात् ही लेखमाला लिहितांना आंबेडकरांच्या पुस्तकाचा उपयोग मी भरपूर प्रमाणांत केला. पण त्याचबरोबर प्रो. बेनीप्रसाद, बाबू राजेंद्र प्रसाद, प्रो. हॅराल्ड लास्की प्रभृतींच्या लेखनाचाहि मी उपयोग करून घेतलेला आहे हें तज्ज्ञांच्या ध्यानांत येईल. डॉ. आंबेडकरांच्या पुस्तकांतील माहितीचा मनःपूत उपयोग करूनहि माझ्या आणि त्यांच्या निष्कर्षांत तफावत पडते हा दृष्टिकोनाचा फरक आहे. तरीपण आंबेडकरांच्या या क्रांतिकारक पुस्तकाच्या वाचनानें मला थोडीबहुत नवी दृष्टि दिली हें कबूल करणें मी माझें कर्तव्य समजतों.

पाकिस्तानसारख्या चळवळीची चिकित्सा करतांना तिच्या पुढाऱ्यांचें मनोविश्लेषण, तिचें तात्त्विक अधिष्ठान, ऐतिहासिक पार्श्वभूमि, व्यावहारिक

इष्टानिष्टता, संभवनीय परिणाम इत्यादि अनेक दृष्टींनीं विचार करावा लागतो. तसा विचार करण्याचा प्रयत्न मी या पुस्तकांत केलेला वाचकांना आढळेल अशी मला आशा वाटते.

ही लेखमाला ता. २ ऑगस्ट ते ११ ऑक्टोबर १९४१च्या दरम्यान प्रसिद्ध झाली. जीना आणि मुस्लिम लीग यांच्या चळवळीची चिकित्सा करण्याचा प्रयत्न मी या पुस्तकांत केला आहे. बंगाल आणि आसाम प्रांतांत अगदीं अलीकडे ज्या घडामोडी झाल्या त्यांच्यामुळें माझ्या चिकित्सेस बाध येतो असें मला वाटत नाहीं. या घडामोडींमुळें मुस्लिम लीगच्या महत्त्वास कितपत धक्का लागतो हें अद्यापि सिद्ध व्हावयाचें आहे. — आणि थोडाबहुत धक्का बसला तरी अधुनमधून असे धक्के पचवून पुनरपि अधिकच प्रभावी स्वरूपांत बेगुमानपणें उठून उभें रहाण्याचा चमत्कार लीगनें आजवर अनेकदां केला आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

या पुस्तकाचें लेखन चालू असतां माझ्या कांहीं स्नेह्यांशीं मीं पाकिस्तान-बाबत अनेकदां चर्चा केली. त्या चर्चेमुळें माझे कांहीं मुद्दे मला स्वतःलाच स्पष्टतर स्वरूपांत प्रतीत झाल्यामुळें त्या चर्चेचे क्षण मला खरोखर बहुमोल वाटत आहेत. त्या सर्व स्नेह्यांची नामावलि येथें देत मी बसत नाहीं, पण प्रो. वि. ह. कुळकर्णी यांचा उल्लेख केला पाहिजे. या पुस्तकाची मुद्रणप्रत तपासून त्यांनीं कांहीं महत्त्वाच्या सूचना मला केल्या त्याबद्दल मी त्यांचे आभार, तें अगदींच औपचारिक दिसेल म्हणून मानीत नाहीं.

माझे स्नेही डॉ. उदगांवकर यांच्या प्रोत्साहनाचा स्वतंत्र उल्लेख केला पाहिजे. ही लेखमाला पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याची कल्पना त्यांनीं माझ्या डोक्यांत भरविली नसती तर ती आहे या स्वरूपांत लिहिण्याच्या भानगडींत मी कधीं पडलोंच नसतों.

श्री. बाबुराव सापळे यांनीं या पुस्तकाची जबाबदारी स्वीकारल्यामुळेंच तें इतक्या सुबक स्वरूपांत आणि विनायासानें प्रसिद्ध होत आहे. म्हणून मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

प्रभाकर पाध्ये

## १ जीनांचें 'नवें तंत्र'

जीना आणि मुस्लिम लीग यांनीं पाकिस्तानची मागणी केल्याबरोबर कित्येक विचारी लोक अगदीं चकित होऊन गेले. त्यांना विलक्षण नवल वाटलें. इतकी विक्षिप्त व अस्वाभाविक मागणी मुस्लिम पुढाऱ्यांनीं कां करावी हेंच त्यांच्या ध्यानांत येईना. पण मुसलमानांच्या या मागणीचें पाकिस्तान-वाल्यांना मुळींच नवल वाटत नाहीं; उलट, ती त्यांना अगदीं स्वाभाविक वाटते, व ही इतकी स्वाभाविक मागणी करण्याची अक्कल मुसलमानांना इतक्या उशिरानें सुचावी याचेंच डॉ. आंबेडकरसारख्यांना नवल वाटतें. पाकिस्तानची मागणी त्याच्या पुरस्कर्त्यांना अगदीं स्वाभाविक आणि निर्विवाद वाटते याचें कारण त्यांच्या मतें पाकिस्तानचें तात्त्विक अधिष्ठान अगदीं स्पष्ट आणि अविवाद्य आहे. या तात्त्विक अधिष्ठानाची जाणीव मुसलमानांना लवकर झाली नाहीं हेंच पाकिस्तानच्या मागणीला इतका विलंब लागण्याचें कारण असावें, असें डॉ. आंबेडकर यांनीं आपल्या Thoughts on Pakistan या पुस्तकांत सुचविलें आहे. वस्तुतः, पाकिस्तानच्या कल्पनेचा अस्पष्टसा उच्चार, खानसाहेब सरदार एम्.गुलखान यांनीं सरहद्द समितीपुढें, श्री. समर्थ यांच्या प्रश्नांना उत्तरें देतांना, १९२३ सालींच केला होता. पुढें १९३०च्या सुमारास सर महमद इक्बाल यांनीं या कल्पनेचा जोरानें पुरस्कार केला. बहुधा त्यांच्याच प्रेरणेनें, लंडनमध्यें वर्तुळ परिषद चालू असतांना, रहिमतअली प्रभृति कांहीं मुसलमानांनीं एक पाकिस्तान-कमिटी प्रस्थापित करून पाकिस्तानचा पुरस्कार करणारीं पत्रकें वर्तुळ

परिषदेच्या सभासदांना वांटलीं. पण तिकडे फारसें कोणी लक्ष दिलें नाहीं. नंतर खुद्द इक्बालसाहेबांनींच ती कल्पना सोडून दिलेली दिसते. पुढें प्रांतिक स्वायत्ततेचा कारभार सुरू झाल्यानंतर मुसलमानांना कितीहि सवलती मिळाल्या तरी या लोकसत्तावादी कारभारांत त्यांना हवें त्या स्वरूपाचें प्रभुत्व मिळण्याचा संभव नाहीं हें जेव्हां मुस्लिम पुढाऱ्यांच्या ध्यानांत आलें तेव्हां जीनाप्रभृतींनीं पाकिस्तानच्या कल्पनेचें पुनरुज्जीवन केलें आणि तिचा अत्याग्रहानें पुरस्कार करण्यास सुरवात केली. याच सुमारास अनेक मुस्लिम विद्वान् या कल्पनेचा तात्त्विक दृष्ट्या विचार करूं लागले व त्यांनीं पाकिस्तानला एक तात्त्विक अधिष्ठानहि शोधून काढलें.

हें तात्त्विक अधिष्ठान कोणतें ? या प्रश्नाचें उत्तर असें कीं, हिंदुस्थानांत हिंदु आणि मुसलमान अशा ज्या दोन प्रमुख जमाती आहेत त्या वस्तुतः जमाती [ Communities ] नसून दोन निरनिराळीं राष्ट्रें [ Nations ] आहेत. जमात आणि राष्ट्र यांच्यामध्यें किती महत्त्वाचा फरक आहे हें डॉ. आंबेडकरांनीं आपल्या पुस्तकांत मोठमोठ्या राजनीतिशास्त्रज्ञांचे आधार देऊन नीट विशद करून सांगितलें आहे. [ पृ. ३२७–३३० ] निरनिराळ्या जमातीं-मध्यें कितीहि फरक असला तरी अंतिम भवितव्याच्या दृष्टीनें आपण एकच आहोंत अशी त्यांची भावना असते. उदाहरणार्थ, मुंबई प्रांतांत गुजराती आणि महाराष्ट्रीय व कानडी अशा निरनिराळ्या जमाती असल्या आणि त्यांच्यामध्यें भाषेचे आणि चालीरीतींचे कितीहि भेद असले तरी अंतिम भवितव्याच्या दृष्टीनें आपण एकच आहोंत अशी त्यांची भावना आहे व म्हणून एकाच राष्ट्रांत समाविष्ट होण्यास त्यांची तयारी आहे. परंतु [ पाकिस्तानवाल्यांच्या मतें ] मुसलमानांचें तसें नाहीं. भरतखंडांतले हिंदु आणि मुसलमान यांच्यामधील फरक त्यांना किरकोळ स्वरूपाचे वाटत नाहींत. त्यांच्यामधील सांस्कृतिक फरकांचें स्वरूप त्यांना इतकें तीव्र वाटतें कीं, अंतिम भवितव्याच्या दृष्टीनें हिंदूंचे आणि आपले हितसंबंध एक नाहींत अशी मुसलमानांची – निदान त्यांच्या पुढाऱ्यांची – खात्री झाली आहे. म्हणून हिंदु व हिंदी मुसलमान या दोन वेगळ्या 'जमाती' नसून दोन वेगवेगळीं 'राष्ट्रें' आहेत असा

त्यांचा दावा आहे. भारतवर्ष हें एक राष्ट्र नसून एक हिंदु राष्ट्र व दुसरें मुसलमान राष्ट्र यांनीं चित्रविचित्र रीतीनें व्यापलेलें असें एक भौगोलिक खंड आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. जमात व राष्ट्र यांच्यामधील हा फरक जितका तात्त्विक स्वरूपाचा तितकाच महत्त्वाचा आहे. राजनीति-शास्त्रज्ञांच्या मतें, जमातींना सरकारविरुद्ध बंड करण्याचा हक्क असूं शकेल, पण त्यांना त्या राष्ट्रांतून फुटून निघतां येणार नाहीं; उलटपक्षीं 'राष्ट्रां'ना कोणत्याहि राष्ट्रांतून म्हणजे खरोखर राष्ट्रसमुहांतून फुटून निघण्याचा हक्क आहे. हाच हक्क मुसलमानांच्या वतीनें मि. जीना बजावूं इच्छितात. हिंदूंना ते स्वच्छच बजावतात कीं, 'भारतवर्ष हें एक अखंड राष्ट्र आहे असें तुम्हांला वाटतें, पण आम्हांला तसें वाटत नाहीं. तुम्ही हिंदू व आम्ही मुसलमान हीं खरोखर वेगवेगळीं राष्ट्रें आहेत – आणि म्हणून आम्हांला तुमच्याशीं फारकत करण्याचा, आमचें स्वतंत्र पाकिस्तान प्रस्थापित करण्याचा हक्क आहे, व तो आम्हीं बजावणार.'

मुस्लिम पुढाऱ्यांच्या या घोषणेनें हिंदी राष्ट्रवाद्यांना धक्का बसला हें अगदीं स्वाभाविक झालें. मुसलमानांच्या पूर्वींच्या मागण्यांप्रमाणें ही नवी मागणी नुसती चढेल वृत्तीची निदर्शक नाहीं. सकृद्दर्शनीं तरी ती क्रांतिकारक स्वरूपाची वाटते. हिंदी राष्ट्रवाद्यांच्या सर्व राजकीय सुखस्वप्नांचा विध्वंस करणारी ती मागणी आहे. हिंदुस्थान हें एक राष्ट्र नाहीं, अनेक राष्ट्रांचें मिळून बनलेलें तें एक कडबोळें आहे, ही भाषा स्थूल स्वरूपांत अँग्लो-इंडियन टीकाकारांच्या तोंडून त्यांनीं पूर्वीं अनेकदां ऐकली होती. अँग्लो-इंडियन टीकाकार ही भाषा अर्थात् विशुद्ध हेतूनें वापरीत नव्हते. हिंदी राष्ट्रवाद्यांच्या स्वराज्याच्या मागणीला खो घालण्याच्या मतलबी हेतूनें ती ते वापरीत असत. हा मतलबी हेतु चवाठ्यावर मांडण्यापलिकडे या टीकाकारांना अधिक कांहीं उत्तर देण्याची फारशी गरज उरत नसे. पण ही नवीन मागणी जितकी अनपेक्षित तितकीच 'पाठींत घातलेल्या वारा'-च्या स्वरूपाची होती. त्या मागणीमुळें हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या मार्गांत कितीहि अडथळे निर्माण होत असले तरी तात्त्विक दृष्ट्या ती हिंदी स्वराज्याला खो घालण्याच्या हेतूनें केलेली आहे असें म्हणतां येणार नाहीं. उलट,

ही मागणी करतांकरतांच मुसलमानांनीं, कॉंग्रेसप्रमाणेंच संपूर्ण स्वातंत्र्याचीहि मागणी निकराच्या स्वरांत केली. दुसरें असें कीं, ही मागणी बाहेरच्या उपऱ्या राजकर्त्या लोकांनीं केलेली नव्हती, तर परकीय सत्तेनें नाडलेल्या हिंदी लोकांतीलच एका प्रबल पक्षानें ती केली. पाकिस्तानच्या मागणीचें स्वरूप असें अनपेक्षित व घरभेदी असल्यानें हिंदी राष्ट्रवाद्यांना विलक्षण जोराचा धक्का बसला हें अगदीं स्वाभाविकच झालें.

परंतु पाकिस्तानच्या मागणीला 'घरभेदीपणाची मागणी' अशी शिवी देऊन कांहीं हा प्रश्न सुटणार नाहीं. पाकिस्तानचें तात्त्विक अधिष्ठान बरोबर आहे कीं नाहीं हा या वादांतला मुख्य मुद्दा आहे, आणि या बाबतींत निर्णायक-पणें बोलतां येत नाहीं ही या वादांतली सर्वांत मोठी पंचाईत आहे. पाकि-स्तानच्या तात्त्विक अधिष्ठानाची चवकशी करतांना, म्हणजे हिंदु राष्ट्र आणि मुसलमान राष्ट्र अशीं दोन राष्ट्रें भरतखंडांत आहेत हा मुसलमानांचा आग्रह बरोबर आहे किंवा नाहीं हें ठरवितांना 'राष्ट्र म्हणजे काय?' हा प्रश्न प्रथम उद्‌भवतो, आणि या प्रश्नाचें निर्विवादपणें उत्तर देणें मोठमोठ्या राजनीति-शास्त्रज्ञांनाहि कठिण झालें आहे. प्रो. हॅरॉल्ड लास्की यांनीं तर स्वच्छच सांगून टाकलें आहे कीं, राष्ट्रीयत्वाची व्याख्या करणें सोपें नाहीं, कारण नक्की कोणत्या गोष्टीमुळें तें निर्माण होतें तें सांगतां येत नाहीं.* प्रो. लास्की यांच्या या म्हणण्याचा सरळ अर्थ एवढाच होतो कीं, बुद्धीला पटेल अशी राष्ट्रीयत्वाची व्याख्या करणें अशक्य आहे; या बाबतींत निव्वळ अनुमानानें बोलावें लागतें; अर्थात् त्यामुळें मतभेदाला बराच अवसर मिळतो – आणि नसता वादविवाद उत्पन्न होतो.

पाकिस्तानचे प्रमुख पुरस्कर्ते कायदे-आझम जिना यांना हें माहीत नाहीं असें मला म्हणवत नाहीं. उलट, माझी तर अशी ठाम समजूत आहे कीं, पाकिस्तानच्या तात्त्विक अधिष्ठानाबद्दल कोणालाहि निर्विवादपणें बोलतां येणार

---

* The idea of nationality is not easy to define, for there is no measurable factor to which it can be traced.—*Grammar of Politics, P. 219.*

नाहीं हें पक्कें जाणूनच त्यांनीं पाकिस्तानबद्दल विशेष आग्रह धरण्यास सुरवात केली आहे. पाकिस्तानची प्रामाणिक तळमळ जीनासाहेबांना लागली आहे असें निदान मला तरी वाटत नाहीं. ज्या संस्कृतीच्या उद्धारार्थ पाकिस्तानाची मागणी ते करतात त्या मुस्लिम संस्कृतीबद्दल त्यांना फारशी कधीं आस्था वाटली होती असें दिसत नाहीं. जीना हे मोठे धार्मिक वृत्तीचे पाक मुस्लिम आहेत अशी त्यांची कधींच ख्याति नव्हती. डॉ. आंबेडकरांनींच हें स्वच्छ शब्दांत सांगितलें आहे. ते म्हणतात, "मोठा भाविक अगर पाक मुसलमान असल्याबद्दल जीनांची कधींच ख्याति नव्हती. एम्. एल्. ए. म्हणून शपथ घेतांना त्यांनीं पवित्र कुराणाला काय स्पर्श केला असेल तेवढाच. त्याच्या पलीकडे त्यांनीं त्या पवित्र ग्रंथांत काय आहे अगर त्याची विशेष शिकवण कोणती याबद्दल डोक्याला कधी शीण दिलेला नसावा. भक्तिभावानें अगर नुसत्या कुतूहलानें तरी त्यांनीं कधीं मशिदींत पाऊल टाकलें होतें काय याची शंकाच आहे." * ज्या मुसलमान जनतेच्या हितास्तव आज जीना कंठशोष करीत आहेत त्या मुस्लिम जनतेबद्दल त्यांना कधींच फिकीर वाटली नव्हती. किंबहुना बहुजनसमाजाचा त्यांना तिटकाराच वाटे, व त्याला राजकीय सत्ता मिळूं नये म्हणून त्याला मतदानाचा हक्क देण्याच्या विरुद्धहि ते होते. आज हें सारें बदललें आहे, हें खरें. आज जीना मुस्लिम बहुजनसमाजाशीं समरस झालेले आहेत – निदान तसे ते दिसतात. आंबेडकरांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे, "आज जीनांमध्यें आमूलाग्र फरक पडलेला दिसतो. ते आतां [ मुस्लिम ] बहुजनसमाजाशीं समरस झालेले दिसतात. बहुजनसमाजापेक्षां आपण कोणीतरी श्रेष्ठ वरिष्ठ आहोंत ही त्यांची भावना मावळलेली दिसते. मुस्लिम समाजापैकींच आपण एक आहोंत असें त्यांना वाटूं लागलें आहे. व त्यामुळेंच मुसलमानांनीं त्यांना

---

* Mr: Jinnah was never known to be a devout, pious or a professing Muslim. Besides kissing the Holy Koran as and when he was sworn as an M. L. A. he does not appear to have bothered much about its contents or about its special tenets. It is doubtful if he frequented any Mosque either out of curiosity or religious fervour.–*Thoughts on Pakistan*, p. 350

आतां डोक्यावर उचलून कायदे–आझम बनविलें आहे. जीनांचा आज इस्लामवर नुसता विश्वासच बसला आहे असें नव्हे, तर इस्लामसाठीं जान कुर्बान करण्याची त्यांची तयारी आहे. इस्लाम धर्माशीं आज त्यांचा परिचय नुसता कल्मेपुरता मर्यादित नाहीं. आज ते कुत्बेचें श्रवण करण्यासाठीं मशिदींत जातात, आणि ईदच्या सामुदायिक प्रार्थनेंत सामील होण्यांत आनंद मानतात. डोंगरी आणि नळबाजार यांना जीनांची एका काळीं नुसती नांवानें माहिती होती. आज ते त्यांना सभासंमेलनांत प्रत्यक्ष पाहून ओळखतात. जिची सुरवात आणि शेवट 'अल्ला-हो-अकबर' अगर 'कायदे-अझाद झिंदाबाद' या घोषणेनें होत नाहीं अशी एकहि मुस्लिम सभा आजकाल मुंबईत भरत नसते."‡

जीना आज मशिदींत जातात, ईदचा नमाज पडतात, फेझ घालतात, कुराणांतले मंत्र म्हणतात, डोंगरी–नळबाजारांतल्या सभांत उर्दूतून भाषणें करतात. पण जीनांमधील हें स्थित्यंतर प्रामाणिक आहे असें मला वाटत नाहीं. मुसलमानांचें नेतृत्व संपादन करण्यासाठीं ते हें एक नाटक करीत असतात अशी माझी समजूत आहे. ज्या गृहस्थानें जन्मभर धर्माशीं बेफिकिरी पत्करली तो इसम आज, कबरस्तानच्या मार्गाचें दर्शन होऊं लागल्यावर, एकाएकीं मोठा पाक मुस्लिम बनतो या गोष्टीवर माझा विश्वास [म्हातारपणीं माणूस

---

‡ Today one finds a complete change in Mr. Jinnah. He has become a man of the masses. He is no longer above them. He is among them. Having come among them, they have raised him above themselves and call him their Qaide-Azam. He has not only become a believer in Islam, he is prepared to die for Islam. To-day he knows more of Islam than mere *Kalama*. To day he goes to the Mosque to hear *Khutba* and takes delight in joining Id congregessional prayers. Dongri and Nulbazar once knew Jinnah by name. To-day they know him by his presence. No Muslim meeting in Bombay begins or ends without 'Alla-Ho-Akbar' or 'Long Live Quide-Azam.' –*Thoughts on Pakistan*, p. 350

धार्मिक वृत्तीचा बनतो असें कांहीं मानसशास्त्रज्ञ म्हणतात तें ध्यानांत वागवूनहि ] वसत नाहीं. पैगंबरसेवेचीं वस्त्रें चढविल्याशिवाय मुसलमानांचें निर्विवाद नेतृत्व मिळणें शक्य नाहीं याची जाणीव झाल्यामुळेंच जीनांनीं हें धार्मिक बावळटपणाचें नाटक चालविलें आहे, असें मला वाटतें. हा नुसता पुढारी-पणाचा हपाप आहे, आणि हा हपाप त्यांना त्यांच्या अहंकारी वृत्तीमुळेंच सुटला आहे. आपल्याइतका शहाणा दुसरा कोणी नाहीं अशी त्यांची विना-कारण पण प्रामाणिक समजूत आहे. गांधींनीं राष्ट्रीय आंदोलनाच्या नव्या तंत्राचा उपयोग करून हिंदुस्थानचें राष्ट्रीय नेतृत्व स्वतःकडे घेतल्यावर अली-बंधूंसारख्यांचा भाव वधारला आणि जीनांचा अगदींच घसरला. होमरूलच्या चळवळींत ज्याला इतका मानमरातब मिळाला त्या आपल्यासारख्या माण-साला देशाच्या राजकारणांत फारसें महत्त्वाचें स्थान उरूं नये हें त्यांच्या अहं-मन्य स्वभावास फारच लागलें, व ते विलक्षण अस्वस्थ झाले. एकदां तर वैतागून त्यांनीं राजकारणाची अजिबात रजा घेतली व लंडनला जाऊन वकिली करीत बसले. तेथें मुसलमानांच्या जातीय चळवळीचें नेतृत्व किती सुलभ आहे याचा बहुधा त्यांना साक्षात्कार झाला असावा आणि आतां तर नेतृत्वाच्या बाबतींत ते गांधींखेरीज इतर कोणाशींच मुकाबला करण्यास तयार नाहींत ! ज्या गांधींनीं त्यांना हिंदी राजकारणांत जवळजवळ नामशेष केलें होतें त्या गांधींच्या बरोबरीनें राजकीय महत्त्व संपादन करण्याच्या दृष्टीनें मुस्लिम राष्ट्रीयत्वाचें तत्त्वज्ञान त्यांच्या फारच उपयोगीं पडलें आहे. ‘ मी मुस्लिम राष्ट्राचा नेता आहें, गांधी हिंदु राष्ट्राचे नेते आहेत – आम्ही समानतेच्या भूमिकेवर असलों तरच आमच्यामध्यें विचारविनिमय होऊं शकतो ’ असें ते बोलूनच दाखवीत असतात. गांधींचा जो त्यांनीं अनेकदां बुद्धिपुरस्सर अपमान केला आहे तो त्यांच्या या अंतरंगावर प्रकाश पाडण्यास उपयोगी पडेल. जीना सरकारजमा झाले आहेत, हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीस खीळ घालण्याच्या देशद्रोही बुद्धींतून त्यांची पाकिस्तानची कल्पना उदयास आली आहे, हा प्रचार डॉ. आंबेडकरांप्रमाणेंच मला देखील निर्बुद्धपणाचा वाटतो. या बाबतींतले डॉ. आंबेडकरांचे, “ जीना हे कमालीचे हेकेखोर घमेंडानंदन असतील, त्यांच्या अहंमन्यतेला कसलेंच आवरण

नसेल, त्यांच्या उद्धटपणाला असाधारण बुद्धिमत्तेचा अगर सामर्थ्याचा आधारहि नसेल, यामुळें प्रसंगीं दुय्यम स्थानावरून सार्वजनिक कार्यासाठीं इतरांशीं सहकार्य करणें त्यांना जमत नसेल, त्यांच्या डोक्यांत कल्पनांची विपुलताहि नसेल [ मात्र त्यांचे टीकाकार म्हणतात तसे ते इतरांच्या कल्पनांवर गुजराण करणारे पोकळडोके अक्कडबाज नाहींत, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे ], त्यांच्या कीर्तीचा डोलारा कर्तृत्वापेक्षां कसबावर उभारलेला आहे असेंहि असेल. पण त्याच बरोबर हेंहि कबूल केलें पाहिजे कीं, 'चारित्र्यवान्' हें विशेषण ज्याला अधिक यथार्थतेनें लावतां येईल असा राजकारणी पुरुष दुसरा कोणी सबंध हिंदुस्थानांत दाखवितां येईल का संशयच आहे. ब्रिटिश सरकारशीं जीनांचे आजवरचे संबंध काय आहेत हें ज्याला ठाऊक आहे त्याला हें कबूल करावेंच लागेल कीं जीना हे सरकारचे कट्टे शत्रु नसले तरी ते त्याचे एक कायमचे टीकाकार आहेत. त्यांना कोणीहि विकत घेऊं शकत नाहीं." * हे उद्गार मला अगदीं पटतात. जीना पाकिस्तानचा पुरस्कार करतात म्हणून ते सरकारजमा झाले अगर त्यांनीं स्वतःला सरकारला विकलें हा प्रचार बिनडोक्याचा आहे,

---

* He may be too self-opinionated, an egotist without the mask and has perhaps a degree of arrogance which is not compensated by any extra-ordinary intellect or equipment. It may be that on that account he is unable to reconcile himself to a second place and work with others in that capacity for a public cause. He may not be overflowing with ideas, although he is not, as his critics make him out to be, an empty headed dandy living upon the ideas of others. It may be that his fame is built up more upon art and less on substance. At the same time it is doubtful if there is a politician in India to whom the adjective incorruptible can be more fittingly applied. Anyone who knows what his relations with the British Government have been will admit that he has always been their critic, if indeed, he has not been their adversary. No one can buy him. *–Thoughts on Pakistan, p. 330–1.*

हें मला बिलकुल मान्य आहे. पण त्यांचा पाकिस्तानपुरस्कार त्यांच्या अहंभावनें-तून निर्माण झाला असावा असें मानण्याला पुरेसा आधार डॉ. आंबेडकरांच्या या उताऱ्यांतच सांपडत नाहीं काय ? जीनासाहेब कोणतेंहि दुय्यम दर्जाचें स्थान स्वीकारण्यास तयार नसतात असें आंबेडकर म्हणतात. त्यांना नेहमीं पहिलें स्थान हवें असतें, आणि तें पाकिस्तानच्या प्रचारानेंच मिळेल हें जीनांनीं अचूक ओळखलें आहे.

आपल्या निर्विवाद नेतृत्वाचें रहस्य पाकिस्तानच्या पुरस्कारांत आहे हें जीनांनीं इतकें अचूक ओळखलें याचें कारण पुढारीपणाचें मानसशास्त्र त्यांना नीट अवगत झालेलें आहे. गांधी बहुजनसमाजाचे नेते झाले तर आपणहि झालें पाहिजे; हिंदी बहुजनसमाजाचें नेतृत्व आपणांस मिळणार नाहीं तर आपण मुस्लिम बहुजनसमाजाचें नेतृत्व मिळविलें पाहिजे – या दिशेनें विचार करूं लागल्याबरोबर जीनांच्या ध्यानांत आलें असलें पाहिजे कीं, अशा नेतृत्वाची उभारणी बहुजनसमाजाच्या सामुदायिक तक्रारींवर होत असते, आणि नेतृत्वाला कारणीभूत होणाऱ्या तक्रारींचाच विचार करावयाचा तर काल्पनिक तक्रारी [ Imaginary grievances ] इतक्या सुंदर तक्रारी दुसऱ्या कोणत्या ? वास्तव दृश्यांपेक्षां काल्पनिक दृश्यें अधिक परिणामकारक वाटतात हा मानसशास्त्रांतला नेहमींचा अनुभव आहे. तीच गोष्ट काल्पनिक तक्रारींची. या तक्रारी धार्मिक भावनांसारख्या खोल आणि आंतरिक भावनांना स्पर्श करणाऱ्या असल्या तर त्यांची तीव्रता अधिकच वाढते. पण काल्पनिक तक्रारींना सत्याचा अगर वस्तुस्थितीचा आधार नसतो. अर्थात् त्या दूर होण्याचा कधीं प्रश्नच उद्भवत नाहीं. त्या कायम टिकणाऱ्या असतात आणि अर्थात् त्यांच्यावर उभारलेलें नेतृत्वहि त्यांच्या बरोबरीनेंच कायम टिकतें. जीनांनीं हें बरोबर ओळखलें आणि मुसलमानांच्या काल्पनिक तक्रारींचा शोध लावण्यास त्यांनीं सुरवात केली, आणि त्यांत त्यांना साहजिक यशहि आलें. उदाहरणार्थ, कॉंग्रेसच्या राजवटींत मुसलमानांचा विदारक छळ झाल्याचा शोध त्यांनीं लावला. ही त्यांची तक्रार बहुतांशीं काल्पनिक होती [ मुसलमानांना खूष करण्यासाठीं कॉंग्रेस-मंत्रिमंडळाची हवा तो पल्ला गांठण्याची तयारी होती ] आणि म्हणूनच

जीनांनीं तिला एवढें प्रचंड स्वरूप दिलें. त्यांनीं कॉंग्रेसच्या राजवटीची चवकशी करण्यासाठीं एकदम रॉयल कमिशन मागितलें. जीनांना पक्कें माहीत होतें कीं हें रॉयल कमिशन कधींहि मिळणें शक्य नाहीं. कारण, त्यांत गव्हर्नरांचीहि चवकशी, होणार होती. कॉंग्रेस–मंत्र्यांनीं जें कांहीं केलें त्यावर गव्हर्नरांचा शिक्कामोर्तब होताच. अर्थात् कॉंग्रेस–मंत्र्यांची चवकशी म्हणजे गव्हर्नरांचीहि चवकशी आणि ती करण्यास ब्रिटिश सरकार 'संमति देण्याचा बिल्कुल संभव नव्हता. जीना हें पक्कें जाणून होते, व म्हणूनच त्यांनीं रॉयल कमिशनची मागणी अधिकाधिक उंच आणि तीव्र स्वरांत करण्यास सुरवात केली. रॉयल कमिशन कधीं मिळणार नाहीं, चवकशी होणार नाहीं व कॉंग्रेस मंत्र्यांवरील आरोप खरेखोटे ठरण्याचा संभव नाहीं; आणि जोंपर्यंत ते तसे ठरण्याचा संभव नाहीं तोंपर्यंत मुसलमानांच्या त्या [ काल्पनिक ] तक्रारी कायम राहणार व त्यावर आधारलेलें नेतृत्वहि अबाधित रहाणार ! काल्पनिक तक्रारींचीं भुतें उठविण्याचें महत्त्व जीनांनीं अचूक ओळखलें आणि हें ओळखण्याची ताकद त्यांच्याइतकी दुसऱ्या कोणत्याहि मुसलमान पुढाऱ्यांत नसल्यानेंच जीना आज मुसलमानांचे निर्विवाद नेते बनले आहेत.§

पाकिस्तानची मागणी त्याच जातीची आहे. ही मागणी सरकार कधींहि पुरी करण्याचा संभव नाहीं हें जीना बरोबर जाणतात. "हिंदुस्थान हा एक अखंड देश राहिला काय, अगर त्याचे पाकिस्तान आणि 'हिंदुस्थान' असे दोन भाग पाडले काय, अथवा कॉंग्रेसच्या योजनेप्रमाणें त्याचे वीस भाषावार तुकडे पाडले काय, हे सर्व विभाग जोंपर्यंत ब्रिटिश साम्राज्यांतील वास्तव्यावर खूष आहेत

§ आपल्या यशस्वी नेतृत्वाच्या या रहस्याची सुबुद्ध [ conscious ] जाणीव जीनांना आहे हें कदाचित् कोणाला पटणार नाहीं. मला वाटतें, तशी जाणीव, निदान स्थूल स्वरूपांत, जीनांना आहे, आणि नसली तर ती त्यांच्या अनुद्बुद्ध [ uncouscious ] मनांत खासच दडलेली असेल, आणि माझें विवेचन म्हणजे त्यांच्या अनुद्बुद्ध मनांतील कांहीं मनोव्यापारांचें वर्णन ठरेल. विश्लेषणशास्त्राच्या अभ्यासकांना या विवेचनाची उपयुक्तता वेगळी पटवून देण्याचें कारण नाहीं.

तोंपर्यंत साम्राज्याच्या दृष्टीनें ब्रिटिशांना तें सारखेंच."* हें आंबेडकरांचें म्हणणें तितकेंसें बरोबर नाहीं, हें ॲमेरीसाहेबांच्या पार्लमेंटांतील वक्तव्यावरून स्पष्ट झालेंच आहे. खरें म्हणजे पाकिस्तानमधील मुसलमान, ते अगर त्यांचे पुढारी आज तोंडानें कोणतींहि आश्वासनें देत असले तरी, ब्रिटिश साम्राज्यांत कायमचे रहावयास राजी होतील, ते साम्राज्यांतून फुटून बाहेरील मुस्लीम राष्ट्रांस मिळण्याचा प्रयत्न करणार नाहींत याचीच कोणास खात्री वाटत नाहीं. म्हणूनच पाकिस्तानला सरकारचा आशीर्वाद मिळण्याचा संभव नाहीं, व जीना हें बरोबर जाणतात. पाकिस्तानची मागणी कायम टिकणारी आहे, पाकिस्तान अस्तित्वांत येऊन त्याचा बुडबुडा फुटण्याचा संभव नाहीं हें जाणूनच त्यांनीं त्याला आपल्या नेतृत्वाची कोनशिला केलें आहे.

तसेंच, पाकिस्तानची आपली कल्पना अशास्त्रीय आहे असें ठरवितां येणार नाहीं, कारण त्याचें तात्त्विक अधिष्ठान उखडून टाकण्याचीं निश्चित साधनें राजनीतिशास्त्रांत नाहीं हेंहि ते जाणतात. 'राष्ट्र म्हणजे काय?' याची निश्चित, बुद्धिवादाच्या बिनचूक कक्षेंतील व्याख्या जोंपर्यंत देतां येणार नाहीं तोंपर्यंत पाकिस्तानचें तात्त्विक अधिष्ठान बिनबुडाचें आहे हें सिद्ध करतां येणार नाहीं, इतकें ओळखण्याइतकी बुद्धिमत्ता जीनांपाशीं आहे. अर्थात् राष्ट्रवादी राजनीतिशास्त्रज्ञ पाकिस्तान हें अशास्त्रीय थोतांड आहे हें सिद्ध करतील अशी भीति बाळगण्याचें त्यांना कारण नाहीं. म्हणजे तात्त्विक युक्तिवादानें अगर प्रत्यक्ष प्रयोगानें पाकिस्तानचा फुगा फुटण्याचा संभव नाहीं. जिचा खरेखोटेपणा युक्तिवादानें अगर प्रयोगानें सिद्ध होण्याचा संभव नाहीं अशी तक्रार उभी करण्याच्या जीनांच्या मुत्सद्देगिरींत पाकिस्तान व्यवस्थित बसतें. पाकिस्तान अस्ति-

---

* From the point of view of the Empire it matters very little to the British whether India remains one undivided whole, or is partitioned into two divisions, Pakistan and Hindustan, or into twenty linguistic fragments as planned by the Congress, so long as all of them are content to live within the Empire. —*Thoughts on Pakistan, p. 3–4.*

त्यांत येऊन त्याचा बुडबुडा फुटणार नाहीं, आणि त्याचें संपूर्ण अशास्त्रीयत्व तर्कवादानें सिद्धहि होणार नाहीं, हें ओळखल्यामुळेंच जीना पाकिस्तानचा इतका गवगवा करीत आहेत असें मला प्रामाणिकपणें वाटतें. यांत मुस्लिम संस्कृतीचा उद्धार करण्याची बुद्धि बिलकुल नाहीं. नुसता पुढारीपणाचा हपाप आहे.

## २ दोन राष्ट्रें ?

बहुजनसमाजाच्या मनाची पकड घेणाऱ्या पण खरोखर त्याची मानसिक अशांति दूर करण्यास समर्थ नसलेल्या, वस्तुस्थितीचा आभास उत्पन्न करणाऱ्या पण खरोखर वस्तुस्थितीचा फारसा आधार नसलेल्या अशा काल्पनिक तक्रारी निर्माण करून त्या असंतोषाच्या जोरावर आपलें अबाधित नेतृत्व प्रस्थापित करावयाचें हें जीनांचें पुढारीपणाचें 'नवें तंत्र' आहे. या 'असंतोषाच्या खाई'तूनच पाकिस्तानची मागणी निर्माण झाली, कारण पाकिस्तानचें तात्त्विक अधिष्ठान जीनांच्या या विशिष्ट तंत्राला अगदीं पोषक ठरलें.

हिंदी मुसलमानांची स्वतंत्र राष्ट्रीयत्वाची भावना हेंच पाकिस्तानचें तात्त्विक अधिष्ठान. पण राष्ट्रीयत्वाची निर्भेळ बुद्धिवादाला पटेल अशी निश्चित व्याख्या जोंपर्यंत देतां येत नाहीं तोंपर्यंत हें तात्त्विक अधिष्ठान कसें सिद्ध करणार ? राष्ट्रीयत्वाची भावना नक्कीं कोणत्या गोष्टीमुळें निर्माण होते तें सांगतां येत नाहीं, हें प्रो. हॅरॉल्ड लास्कीसारखे राजनीतिशास्त्रज्ञ कबूल करीत असले तरी अशा अनिश्चित गोष्टींनाहि तर्कशास्त्राच्या चवकटींत बसविण्यासाठीं तर्कवादी मनाची धडपड चालू असल्यानें प्रो. लॅास्की यांनीं देखील राष्ट्रीयत्वाची एक ठोकळ कल्पना सादर केलीच आहे. ती अशीः—

" स्थूलमानानें पाहातां, रेनन आग्रहानें प्रतिपादन करतात त्याप्रमाणें, राष्ट्रीयत्वाची कल्पना ही खरोखर आत्मिक स्वरूपाची आहे. एका विशिष्ट प्रकारच्या एकीची, इतर सर्वांपेक्षां आपण कांहीं तरी निराळे आहोंत अशी समजूत निर्माण करणाऱ्या एकीची, भावना राष्ट्रीयतेच्या कल्पनेंत अंतर्भूत

असते. आपण सर्व एक आहोंत अशी बंधुत्वाची भावना [ राष्ट्रीयत्वामुळें ] निर्माण होते. [ या भावनेमुळें एकत्र आलेले ], लोक आपलें विशिष्ट साम्य आणि इतरांशीं असलेला आपला भेद यांवर विशेष भर देतात." ×

डॉ. आंबेडकरांनीं देखील राष्ट्रीयत्वाचें वर्णन जवळ जवळ याच शब्दांत केलें आहे [ पृ० २५ ]. राष्ट्रीयत्व ही एक आत्मिक भावना आहे. आपण लोक सर्व एक आहोंत; आपल्यांत विशेष प्रकारचें साम्य आहे; आणि जगांतील इतर लोकांपेक्षां आपणांत कांहीं तरी विशेष, कांहीं तरी निराळें आहे, ही जी आत्मिक भावना तीच राष्ट्रीयत्वाची भावना होय. या विशेष प्रकारच्या जाणिवेलाच डॉ. आंबेडकर 'consciousness of kind' म्हणतात व प्रो. लास्की तिचें वर्णन 'a consciousness of special destiny' असें करतात. आपल्या विशिष्ट समुहांत सामील होण्याची व इतरांपासून अलग होऊन राहण्याची मानसिक तळमळ–'A longing to belong to one's own group and a longing not to belong to any other group'–हाच [डॉ. आंबेडकरांच्या भाषेंत ] राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेचा विशेष आहे.

ही विशिष्ट भावना कोणत्या गोष्टीमुळें निर्माण होते हेंच निश्चितपणें सांगणें कठिण आहे. वांशिक समानतेमुळें ती निर्माण होते असें म्हणतां येणार नाहीं. ऑस्ट्रियन व जर्मन हे सामान्यतः एकाच वंशाचे लोक आहेत असें म्हणतां येईल, परंतु ते एका राष्ट्रांत सामील व्हावयास तयार नाहींत असें गेल्या महायुद्धानंतर दिसलें. अमेरिकेंत निरनिराळ्या अनेक वंशांचे लोक आहेत, परंतु ही वंशाभिन्नता त्यांच्या प्रभावी राष्ट्रीयत्वास मुळींच मारक झालेली नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, मानवसमाजाच्या विकासांत वंशाभिन्नतेचा

---

× Broadly speaking, in fact, the idea of nationality is, as Renan insisted, essentially spiritual in character. It implies a sense of special unity which marks off those who share in it from the rest of mankind...There grows up a sense of kinship which binds men into oneness. They recognize their likenesses and emphasise their difference from other men. —*Grammar of Politics*, 219–220

हळुहळू लोप होत आहे; आणि निरनिराळ्या राष्ट्रांत वर्णसंकर इतका झाला आहे कीं, हिटलरसारखे माथेफिरू कांहींही म्हणत असले तरी, कोणत्याहि राष्ट्रांत अगदीं शुद्ध एकजिनसी वंशाचे लोक आहेत असें सिद्ध करतां येणार नाहीं.

मग ही राष्ट्रीयत्वाची भावना भाषेच्या साम्यामुळें निर्माण होते असें तरी म्हणतां येईल का ? तेंहि नाहीं. कारण, इंग्लंड-अमेरिकेची भाषा एक असूनहि इंग्रज व अमेरिकन लोक एका राष्ट्रांत सामील व्हावयास तयार नाहींत. तीच गोष्ट स्पेन आणि स्पॅनिश अमेरिका यांची. उलटपक्षीं कॅनडा व स्वित्झर्लंड या राष्ट्रांत अनेक भाषा बोलणारे रहिवाशी असूनहि ते राष्ट्रीयत्वाच्या आंतरिक भावनेनें प्रेरित झालेले आढळतात. पूण्यभू आणि पितृभू यांचे लागेबांधेहि निर्णायक ठरत नाहींत हें ज्यूंच्या उदाहरणावरून समजतें. आणि जीना म्हणतात त्याप्रमाणें हिंदी मुसलमान जर पाकिस्तानसाठीं खरोखरच आतुर झाले असतील तर समान चालीरीती देखील राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यास दुर्बल ठरतात असें सिद्ध होतें.

पण हिंदी मुसलमान खरोखरच पाकिस्तानसाठीं आतुर आहेत का ? राष्ट्रीयत्वाच्या विशिष्ट भावनेनें प्रेरित होऊन ते हिंदूंपासून विभक्त व्हावयास खरोखरच अधीर झाले आहेत का ? अंतिम भवितव्याच्या दृष्टीनें हिंदु आणि मुसलमान हे निराळे, हिंदूंचें भवितव्य निराळें व आमचें निराळें, अशी त्यांची खरोखरच मनोमय भावना झाली आहे काय ?

या प्रश्नांचें निर्णयात्मक उत्तर देणें कठिण आहे, हीच या वादाची खरी मौज होय. जीना, आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकरहि म्हणतात कीं, ‘ होय, मुसलमानांत ही अलगपणाची भावना निर्माण झाली आहे. ते हिंदूंच्या नशिबांत आपलीं नशिबें मिळवून टाकण्यास तयार नाहींत. हिंदूंच्या भवितव्याच्या गाड्याला आपल्या भवितव्याचा नळा अडकविण्यास त्यांची तयारी नाहीं.’

हिंदुस्थानच्या मोठमोठ्या शहरांतील मुस्लिम रहिवाश्यांकडे पाहिलें तर या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे असें वाटूं लागतें. शिवाय राष्ट्रीयत्वाची भावना प्रचारानें निर्माण करतां येत नसली तरी फुलवतां [ अगर पेटवतां ]

येत असल्यामुळें मुस्लिम लीग व हिंदुमहासभा यांच्या अविरत प्रचारामुळें नागर मुसलमान व हिंदु यांची विलगपणाची भावना वाढीस लागणें शक्य आहे व वाढीस लागलेली दिसतेहि. परंतु आपल्या सात लाख खेड्यांतील हिंदु व मुस्लिम जनता या विभक्तपणाच्या जाणिवेनें ग्रासली गेली आहे असें निश्चित-पणें म्हणतां येईल काय ? आणि दुसरा महत्त्वाचा प्रश्न असा कीं, हिंदुस्थानांत जिचा फैलाव वाढत्या प्रमाणावर होत आहे त्या पाश्चात्य संस्कृतीनें हिंदी मुस-लमान व हिंदु नकळत तरी एकमेकांकडे खेचले जात आहेत कीं नाहींत ?

राष्ट्रीयत्वाचा विचार करतांना ज्या अनेक बाबींचा उल्लेख करावा लागतो त्यांच्या दृष्टीनें पाहिलें तर काय आढळतें ? हिंदुस्थानांत अनेक भाषा आणि अनेक वंश आहेत, पण त्यांची विभागणी धर्मांच्या अनुरोधानें झाली आहे काय ? कोंकणी मुसलमान आणि पंजाबी मुसलमान यांच्यामध्यें कितीसें वांशिक [ अगर भाषिक ] साम्य आढळेल ? आणि मद्रासी हिंदु व पेशावरी हिंदु यांच्यामध्यें तरी कितीसें साम्य आहे ? या बाबतींत सरहद्द प्रांतांतील एका युरोपियन अधिकाऱ्यानें आपला एक सुंदर अनुभव सांगितला आहे. त्याच्याकडे एकदां एक मद्रासी ब्राह्मण पाहुणा आला. सर्व सरहद्द प्रांत पाहून झाल्यावर त्यानें तत्प्रांतीय हिंदूंना भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली. दुसऱ्या दिवशीं त्या अधिकाऱ्यानें हिंदूंची एक रांगच रांग त्या ब्राह्मणापुढें उभी केली. ती पाहिल्याबरोबर तो वेदमूर्ति ओरडला, 'शान्तं पापम् ! शान्तं पापम् ! हे तर मुसलमान ! यांना काय हिंदु म्हणायचं ? तुम्ही माझी चेष्टा तर करीत नाहीं ?' पण ती चेष्टा नव्हती. पेशावरी मुसलमान आणि पेशावरी हिंदु यांच्या भाषावेशांत कांहीं फरक नसतो याची त्याला कल्पना नव्हती. खरोखर पेशावरी मुसलमान [ अगर हिंदु ] आणि मद्रासी मुसलमान [ अगर हिंदु ] यांच्यामध्यें जितकें साम्य आहे त्याहून कितीतरी अधिक साम्य पेशावरी मुसलमान आणि पेशावरी हिंदु व मद्रासी मुसलमान आणि मद्रासी ब्राम्हण यांच्यामध्यें आहे.

भाषेच्या दृष्टीनें पाहिलें तरी हाच अनुभव येईल. मुसलमानांचे पुढारी उर्दू ही आपली राष्ट्रभाषा असल्याचें सांगतात – नव्हे, ती हिंदुस्थानची राष्ट्रभाषा

व्हावी अशी त्यांची उर्मट मागणी आहे. पण आठ कोटी मुसलमानांत अडीचतीन कोटींहून अधिक मुसलमानांना उर्दू मुळींच समजत नाहीं. उलटपक्षीं, मद्रासी हिंदु आणि मद्रासी मुसलमान यांची जशी एकच तामीळ ही मातृभाषा आहे तशीच इतर प्रांतांतील हिंदु-मुसलमानांची एकच मातृभाषा आहे. बंगालमध्यें तर अनेक मुसलमान लेखकांनीं वंग–वाङ्मयांत बहुमोल भर टांकली आहे. हिंदुमुसलमानांत भाषेच्या दृष्टीनें विशेष भेद आढळत असेल तर तो शहरांत. कारण, शहरी मुसलमानांचा उर्दू बोलण्याकडे कल असतो. मुस्लिम लीगच्या प्रचारामुळें तो वाढत आहे व खेड्यांतहि त्याचें लोण पोंचत आहे. पण प्रचार हें दुधारी शस्त्र असल्यानें त्यामुळें निराश होऊन बैठक मारण्याचें कांहींच कारण नाहीं. लीगच्या प्रचारावर विरुद्ध प्रचाराचा उतारा देणें शक्य आहे.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत मुसलमानांच्या सामाजिक चालीरीती किती सारख्या आहेत याचें वर्णन डॉ. आंबेडकरांनींच आपल्या पुस्तकांत केलें आहे. [ पृ. २८–२७ ] इतकेंच नव्हे, तर हिंदूंत सामाजिक विषमता असेल तर हिंदी मुसलमानांतहि नेमकी त्याच प्रकारची विषमता आहे हें त्यांनीं अनेक अनपेक्षित आधार देऊन सिद्ध केलें आहे. [ त्यांच्या पुस्तकांतील Social Stagnation हें प्रकरण पाहा. ]

तेव्हां हिंदु आणि मुसलमान सर्वथैव विभिन्न आहेत असें म्हणतां यावयाचें नाहीं. भौगोलिक दृष्ट्या ते अखंड असलेल्या एकाच देशाचे नागरिक आहेत, प्रांतविशिष्ट भेद सोडले तर त्यांची भाषा एकच आहे, आजचे हिंदी मुसलमान बहुतांशीं कालचे हिंदूच असल्यानें त्यांचा वंशहि एकच आहे, आणि त्यांच्या चालीरीतीहि पुष्कळच प्रमाणांत सारख्या आहेत. पण तरीहि डॉ. आंबेडकर राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें त्यांना एक मानायला तयार नाहींत, कारण [ ते बजावतात ] देश, भाषा, वंश अगर चालरीत हें राष्ट्रीयत्वाचें व्यवच्छेदक लक्षण होऊं शकत नाहीं. पण यावर प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, देश, भाषा, वंश अगर चालरीत यांपैकीं कोणत्याहि एका गोष्टीमुळें राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होऊं शकत नसली तरी या सर्व गोष्टी एकत्र झाल्यानें राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होऊं

शकेल कीं नाहीं ? या प्रश्नाला डॉ. आंबेडकरांचें उत्तर असें दिसतें कीं, हिंदु-मुसलमानांना एकत्र बांधणाऱ्या गोष्टी आहेत त्यांहून त्यांना विभागणाऱ्या गोष्टीच अधिक प्रभावी आहेत. § रेननने राष्ट्रीयत्वाच्या आंतरिक प्रेरणेचें जें स्वरूप वर्णन केलें आहे त्यावरून या गोष्टींवर प्रकाश पडतो. रेनन म्हणतो, "राष्ट्र हा एक सजीव आत्मा आहे. तें एक आत्मिक तत्त्व आहे. दोन गोष्टींमुळें [ या दोन गोष्टी खरोखर एकच आहेत ] या तत्त्वाचें स्वरूप ठरत असतें. एक म्हणजे समान स्वरूपाच्या ऐतिहासिक स्मृतींचा अमूल्य ठेवा; आणि दुसरी म्हणजे या ऐतिहासिक परंपरेचें संरक्षण करण्यासाठीं एकत्र राहाण्याची अनिवार इच्छा."† ऐतिहासिक परंपरा आणि या परंपरेनें निर्माण झालेल्या संस्कृतीचें जतन करण्यासाठीं एकत्र येण्याची इच्छा, हीं दोन राष्ट्रीयत्वाच्या आत्मिक सामर्थ्याचीं रहस्यें आहेत. यांपैकीं ऐतिहासिक परंपरेचा विचार केला तर, हिंदु आणि मुसलमान यांच्या परंपरा वेगळ्या, इतकेंच नव्हे तर परस्पर-विरोधी नाहींत काय, असें डॉ. आंबेडकर विचारतात. आंबेडकरांचा प्रश्न सकृद्दर्शनीं अगदीं बिनतोड वाटतो. मुसलमान हिंदुस्थानांत आक्रमक म्हणून शिरले व ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित होईपर्यंत हिंदु आणि मुसलमान यांचे राजकीय संबंध बहुतांशीं कट्टर विरोधकाचेच होते. हिंदुस्थानांत ब्रिटिशांचें सत्ताधारी म्हणून आगमन होईपर्यंतच्या राजकीय इतिहासांत या विरोधाचींच नानाविध चेष्टितें आपण वाचतों. पण आपण वाचतों तो इतिहास म्हणजेच सारें सत्य असें आपणांस निर्विवादपणें म्हणतां येईल का ? ब्रिटिशपूर्व हिंदुस्थानच्या इतिहासाला हिंदुमुसलमानांच्या विरोधाची जशी एक उद्वेगजनक

---

§ The things that divide are far more vital than the things which unite.—*Thoughts on Pakistan*, p. 30

† A nation is a living soul, a spiritual principle. Two things which in truth are but one, constitute this soul, this spiritual principle. One is the common possession of a rich heritage of memories; the other is actual consent, the desire to live to-gether, the will to preserve worthily the undivided inheritance which has been handed down. [ *Quoted in Thougts on Pakistan, p.* 29]

बाजू आहे तशीच हिंदुमुसलमानांच्या सहकार्याचीहि एक अतिशय उज्ज्वल आणि आशादायक बाजू आहे हें विसरतां येईल का ? दुर्दैवानें डॉ. आंबेडकरांनीं एकाच बाजूचें विशेष दिग्दर्शन केलें आहे. दुसरें असें कीं, ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर हिंदुमुसलमानांचे राजकीय संबंध एकाच प्रकारचे म्हणजे पारतंत्र्याचेच झाले नाहींत का ? या समान पारतंत्र्यामुळें हिंदुमुसलमानांत कांहीं वेळां उज्ज्वल स्वरूपाचें सहकार्य निर्माण झाल्याचें आढळतें. उदाहरणार्थ, १८५७ सालच्या संग्रामांत हिंदुमुसलमान सैनिक सहकार्याच्या भावनेनें आणि परस्परांच्या खांद्याला खांदा भिडवून लढले. तसेंच, सायमन कमिशनवरील बहिष्काराच्या वेळीं हिंदुमुसलमानांच्या एकीचें जें दृश्य दिसलें तें अनेक दृष्टींनीं स्पृहणीय आणि आशादायक होतें. हीं उदाहरणें अपवादादाखल असतील. 'परकीय सत्तेखालीं हिंदु आणि मुसलमान यांचीं सारखीच कुचंबणा होत आहे याची जाणीव दोघांनाहि सारख्या प्रमाणांत होत नसेल. तरीपण आपलें समान पारतंत्र्य हा आपल्या सामायिक इतिहासाचा भाग नाहीं असें कसें म्हणतां येईल ?

ब्रिटिशांच्या आगमनानें जी नवी राजकीय आणि आर्थिक राजवट हिंदुस्थानांत सुरू झाली तिचे परिणाम हिंदु आणि मुसलमान यांना सारखेच भोगावे लागत आहेत याची जाणीव दोघांना कदाचित् सारख्या प्रमाणांत होत नसेल. या समानतेमुळें जी ऐक्याची भावना निर्माण व्हावयास हवी तीहि राज्यकर्त्यांच्या व पुढाऱ्यांच्या धोरणामुळें तितक्या प्रमाणांत होत नसेल. परंतु ती अजिबात होत नाहीं अगर होणार नाहीं असें कसें म्हणतां येईल ? ब्रिटिशांच्या आगमनानें हिंदुस्थानांत भांडवलशाहीचें जें युग निर्माण झालें त्यामुळें कामगार व भांडवलवाले असे भेद निर्माण झाले. 'आतां हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत मुस्लिम कामगार व मुस्लिम भांडवलवाला यांना परस्परांबद्दल एक प्रकारची विशिष्ट आपुलकी वाटत असेल. परंतु निदान आर्थिक प्रश्नांवर तरी मुस्लिम कामगार मुस्लिम भांडवलवाल्याशीं वैर पुकारून हिंदु वर्गभाईशीं दोस्ती पुकारील कीं नाहीं ? कामगारांच्या वर्गविशिष्ट संस्थांत हिंदुमुसलमानांचें जें

सहकार्य दृष्टीस पडतें त्यांत या प्रश्नाचें उत्तर सांपडेल.* हा नियम जसा कामगारांना लागू आहे, तसाच भांडवलवाल्यांना लागू आहे, आणि मुंबई–कलकत्त्यांत हिंदु–मुसलमान भांडवलवाल्यांच्या व सिंधपंजाबांत मुस्लिम–हिंदु जमीनदारांच्या सहकार्याचीं दृश्यें आपल्या नजरेस हरहमेश पडत असतात. अशा परिस्थितींत हिंदु मुसलमानांची ऐतिहासिक परंपरा दोघांना सर्वस्वीं विभागणारी आहे आणि जोडणारी मुळींच नाहीं असें कसें म्हणतां येईल ?

आर्थिक प्रेरणेपेक्षां धार्मिक प्रेरणा हिंदी मुसलमानांत आज अधिक प्रभावी बनली आहे हें कबूल करावयास हरकत नाहीं. हिंदु उगवत्या सूर्याला अर्घ्य देतो तर मुसलमान मावळत्या सूर्याकडे तोंड करून नमाज पडतो; हिंदु शेंडी राखतो मुसलमान अगदीं विरुद्ध दिशेला हनुवटीखालीं केसांची वाढ करतो – ही विरोधाची भावना आजकाल उग्र होत आहे हें अगदीं खरें. परंतु सुशिक्षित हिंदु आणि मुसलमान कोणत्याच सूर्याची आराधना करीत नाहींत व शेंडी अगर दाढी, कांहींच वाढवीत नाहींत ही गोष्ट सूचक नाहीं काय ? ज्या पाश्चात्य संस्कारांमुळें हे दृश्यभेद लोप पावत आहेत त्यांचा प्रसार अधिकाधिक होत रहाणार नाहीं काय ? औद्योगिक युगाची नवप्रभा हिंदुस्थानच्या क्षितिजावर अधिकाधिक फांकूं लागेल अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. तेव्हां आर्थिक भेदापेक्षां धार्मिक संस्कार अधिक प्रभावी ठरत असल्याचें आज दिसत असलें तरी ते आर्थिक भेद निर्माण करणाऱ्या समाज-व्यवस्थेचें आधुनिक तत्त्व-ज्ञान सर्वंकष ठरून धार्मिक संस्कारावर प्रभावी मात करूं लागेल अशी आशा करावयास काय हरकत आहे ?

शिवाय असें कीं, इस्लाम धर्म कितीहि उदार आणि समतावादी [ अर्थात् मुस्लिमांपुरता ] असला तरी त्याच्यामध्येंहि नानाविध पोटभेद

---

* अलीकडे जातीयतेला जोर चढल्यामुळें जातीय स्वरूपाच्या कामगार–संस्था अस्तित्वांत येत आहेत. पण निव्वळ जातीय तत्त्वावर कामगारसंघटना करून कामगारांचे आर्थिक प्रश्न सोडवतां येत नाहीत हा अनुभव आल्यानंतर या जातीय संस्थांबद्दल कामगारांचा उत्साह ओसरूं लागेल असा कयास करायला हरकत नाही.

आहेतच, आणि अशाच एका भेदाचीं चेष्टितें शियासुनींच्या दंग्यांच्या रूपानें राजरोस पहावयासहि सांपडतात. तरीहि मुसलमानांचें एकराष्ट्र होऊं शकतें [ असें जीना आंबेडकर म्हणतात ] तर देश, वंश, भाषा, चालरीत इत्यादि बाबतींत साम्य असलेल्या हिंदुमुसलमानांचें एकराष्ट्र कां होऊं नये ?

वरील विवेचनावरून एवढें स्पष्ट होईल कीं हिंदु आणि मुसलमान हीं निश्चितपणें दोन राष्ट्रें आहेत असें मानावयास निर्णायक असा पुरावा आपल्यापाशीं नाहीं. एक तर राष्ट्रीयत्व म्हणजे काय हेंच आपल्याला निश्चितपणें सांगतां येत नाहीं. दुसरें असें कीं, राष्ट्रीयत्वाची व्याख्या करतांना ज्या अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो, त्या ध्यानांत घेतल्या म्हणजे अनेक परस्परविरोधी आणि गुंतागुंतीचीं दृश्यें आपल्या नजरेस पडूं लागतात. हीं दृश्यें इतकीं अनिर्णायक आणि गोंधळ उत्पन्न करणारी आहेत कीं त्यांच्या आधारानें हिंदु आणि मुसलमान हीं दोन राष्ट्रें आहेत असें अनुमान बांधून त्यावर राष्ट्राची पुनर्घटना करावयास लागणें मोठें धाडसाचें ठरेल.

अर्थात् वर नमूद केलेल्या पुराव्यानें हिंदु व मुसलमान हे एकाच राष्ट्राचे दोन भाग आहेत असेंहि निर्णायकपणें ठरत नाहीं हें देखिल ध्यानांत घेतलें पाहिजे. हिंदुस्थान हें नेहमींच एकराष्ट्र होतें, अगर आज तें तसें सर्वस्वीं आहे हा राष्ट्रवाद्यांचा आग्रह सोडून द्यावा लागतो. हिंदुस्थान हें एकराष्ट्र तर नाहींच–पण हिंदु व मुसलमान अशा दोन राष्ट्रांचाहि तो देश नाहीं. हिंदुस्थानांत तसें पाहिलें तर अनेक प्रकारचे भेद आहेत–आणि ते प्रभावीहि आहेत. थोडें विस्कळित रीतीनें बोलावयाचें म्हटलें तर हिंदुस्थानांत दोनच राष्ट्रें नाहींत तर अनेक राष्ट्रें आहेत असें म्हणतां येईल. या बाबतींत राष्ट्रवाद्यांचे अँग्लो-इंडियन टीकाकारच अधिक बरोबर होते, असें मला वाटतें. निसर्ग, संस्कृति आणि इतिहास यांचे कितीहि दाखले दिले तरी राष्ट्रीयत्वाच्या आधुनिक कल्पनांस उतरेल असें एकराष्ट्र हिंदुस्थानांत कधीं काळीं होतें हें पटत नाहीं. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या लोकांतील साम्यापेक्षां भेदाचेच दाखले अधिक मिळतात. उदाहरणार्थ, बंगाली आणि महाराष्ट्रीय. यांची ऐतिहासिक परंपरा अशी काय सलोख्याची आहे ? मद्राशांत आणि मारवाड्यांत कितीसें साम्य

आहे ? पेशावरी ब्राह्मण आणि मद्रासी ब्राह्मण यांच्यांत कितीसें पटेल ? नाहीं, हिंदुस्तान एकराष्ट्र नाहीं.– पण तो एकराष्ट्रीयत्वाच्या मार्गावर खास आहे. ही प्रक्रिया आज शंभर दीडशें वर्षें चालू आहे. इतक्या दीर्घावधींत हिंदुस्थानचें एकराष्ट्र झालें नसलें तर तो दोष प्रथमतः राज्यकर्त्यांचा आहे. इंग्रजांनीं फक्त राजकीय एकी प्रस्थापित केली. पण राजकीय ऐक्य म्हणजे कांहीं राष्ट्रीय आणि सामाजिक अगर आर्थिक ऐक्य नव्हे. एक राजकीय ऐक्याची बाब सोडली तर इतर बाबतींत सरकारचें धोरण हिंदुस्थानच्या सामाजिक व सांस्कृतिक एकीकरणाला बरेंचसें विघातक ठरलें आहे. जातीय संस्थांचें आणि पुढाऱ्यांचें धोरणहि हिंदुस्थानच्या एकीकरणाला मारक ठरलें आहे. हे अडथळे कायम आहेत तोंपर्यंत हिंदुस्थानांत एकराष्ट्रीयत्वाची गतिमान् आणि प्रभावी भावना निर्माण होणें कठिण दिसतें.

ही राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणें हेंच राष्ट्रवाद्यांचें खरें कर्तव्य आहे. हिंदुस्थानांतील हिंदूंत आणि मुसलमानांत एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणें हें अर्थात् हिंदु अगर मुसलमानांत धार्मिक राष्ट्रीयत्व निर्माण करण्यापेक्षां अधिक बिकट वाटेल – परंतु वरील विवेचनावरून एवढें दिसून येईल कीं तें अगदींच अशक्य नाहीं. मुसलमानांत देखील धर्मातीत राष्ट्रीयत्व निर्माण करतां येतें हें कमालपाशाच्या तुर्कस्थाननें सप्रमाण सिद्ध केलें आहे. डॉ. आंबेडकरांनीं हिंदुस्थानांत दोन राष्ट्रें प्रस्थापित करण्यासाठीं तुर्कस्थानच्या इतिहासांतून कांहीं दाखले दिले आहेत. मला वाटतें, त्याच इतिहासांतून हिंदी एकराष्ट्रीयत्वाचा मार्ग दाखविणारे दाखले खात्रीनें काढून दाखवितां येतील.

# ३ जुनीं तत्त्वें आणि नवे प्रवाह

पण वादासाठीं जीना, आंबेडकर [ अगर सावरकर ] यांचा, हिंदु व मुसलमान हीं दोन अलगविलग राष्ट्रें आहेत हा दावा मान्य केला तरी त्यांतून डॉ. आंबेडकर आणि जीना म्हणतात त्याप्रमाणें पाकिस्तानचाच निष्कर्ष निघतो आणि दुसरा कोणताहि निघूं शकत नाहीं, हें तरी निर्विवादपणें सिद्ध होतें काय?

या प्रश्नाच्या उत्तराबद्दल डॉ. आंबेडकर प्रभृति पाकिस्तानवाल्यांच्या मनांत मुळींच संदेह नाहीं. हिंदु व मुसलमान हीं दोन स्वतंत्र राष्ट्रें आहेत हें मान्य केल्याबरोबर त्यांच्या स्वतंत्र राज्यांना मान्यता दिली पाहिजे असें आंबेडकरांनीं सिज्विक्सारख्या राजनीतिशास्त्रज्ञांचीं मतें उद्धृत करून, नव्हे त्यांत स्वतःची प्रभावी भर टाकून, प्रतिपादिलें आहे. अजूनपर्यंत मुसलमानांकडे एक जमात [ Community ] याच दृष्टीनें पहात असत. अर्थात् सिज्विक्सारख्या राजनीतिशास्त्रज्ञांच्या मतें कोणत्याहि जमातीला राष्ट्रांतून फुटून निघण्याचा हक्क नाहीं, पण राष्ट्राला तो आहे. सिज्विक म्हणतात, “ एका देशाच्या दोन विभागांतील रहिवाशांच्या, कायदा किंवा इतर सरकारी कारभार यांविषयींच्या गरजा अथवा अपेक्षा, वांशिक, धार्मिक, ऐतिहासिक अगर प्रचलित सामाजिक भेदांमुळें जेव्हां विभिन्न असतात तेव्हां त्यांच्यावर एकाच समान सरकारची सत्ता लादणें अगदीं सहजच अयोग्य अगर गैरसोईचें ठरतें.” § जमात आणि

§ When from differences of race or religion, past history, or present social conditions, the respective inhabitants [ of two portions of a state's territory ] have divergent needs and demands in respect of legislation and other governmental interference it may easily be inexpedient that they should have a common Government....—*Elements of Politics*, p. 649

राष्ट्र यांना हे वेगवेगळे हक्क कां असावेत हे आंबेडकरांनीं, या राजनीतिशास्त्रज्ञांच्याहि पुढें जाऊन, सांगितलें आहे. एका राष्ट्रांतील निरनिराळ्या जमातींमध्यें कितीहि भेद असले तरी आपलें अंतिम भवितव्य एकच आहे असें त्यांना वाटत असतें, तर उलट निरनिराळ्या राष्ट्रांना, अंतिम भवितव्याच्या दृष्टीनें आपण अगदीं निराळे आहोंत याची तीव्र जाणीव झालेली असते. हाच जमात आणि राष्ट्र यांच्यामधील खरा तात्त्विक फरक आहे, असें आंबेडकर म्हणतात.

निरनिराळ्या राष्ट्रांचा संपूर्ण स्वातंत्र्याचा हा हक्क १९ व्या शतकांतील मिल्ल् प्रभृति राजनीतिशास्त्रज्ञांनीं अगदीं पूर्णपणें मान्य केला होता. किंबहुना लोकशाहीची ती एक अनिवार्य अट आहे असेंच त्यांना वाटत असे. मिल्ल् म्हणतात, "राज्याच्या प्रादेशिक मर्यादा राष्ट्रीयत्वाला धरून असाव्यात ही सर्वसाधारणपणें स्वतंत्र राजकीय संस्थांची [ म्ह० लोकसत्तेची ] अनिवार्य अट असते." ¶ डॉ. आंबेडकरांनीं मिल्लसाहेबांचें हें वाक्य नेमकें उद्धृत केलें आहे. हेगेलसारखा तत्त्वज्ञानी आणि मॅझिनीसारखा देशभक्त यांच्याहि राजकीय विचारसरणीचा रोख हाच होता. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर कोणत्याहि प्रकारचा अंमल चालविणें हें या विचारवंतांच्या मतें राजकीय दृष्ट्या मूर्खपणाचें व नैतिक दृष्ट्या निषेधार्ह आहे.

हे थोर विचारवंत ज्या कालांत अशीं मतें प्रतिपादन करीत होते त्या कालीं जगाचे राजकीय व आर्थिक व्यवहार आजच्या इतके आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे झाले नव्हते. आज या व्यवहारांना पूर्णपणें जागतिक स्वरूप प्राप्त झालें आहे. आजकाल न्यूयॉर्कमध्यें एखादी बँक खतम् झाली तर टोकिओंत एखादी 'हाराकिरी' होत असते, व हिंदुस्थानांत कापूस बुडाला तर इंग्लडांतील अनेक अब्रूदार कुटुंबांना दुपारची वेळ भागविण्यासाठीं सरकारच्या तोंडाकडे केंविलवाण्या मुद्रेनें पहावें लागतें. भांडवली उद्योगधंदे व भांडवली व्यापार – थोडक्यांत

¶ It is, in general, a necessary condition of free institutions that the boundaries of governments should coincide, in the main, with those of nationalities.—*Representative Government*, p. 298.

म्हणजे एकंदर भांडवलशाहीच आज आंतरराष्ट्रीय स्वरूपाची झाली आहे. निरनिराळ्या राष्ट्रांचें आर्थिक जीवन त्यामुळें कमालीचें परस्परावलंबित बनलें आहे. या परस्परावलंबित जीवनाचे प्रहार राष्ट्रांच्या राजकीय जीवनावर झाल्याखेरीज कसे राहातील ?

जगाच्या व्यवहारांना असें आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालेलें असतांना निरनिराळ्या राष्ट्रांनीं आपापलें राजकीय स्वातंत्र्य पूर्णपणें अबाधित राखण्याचा प्रयत्न केला तर प्रचंड स्वरूपाचा अंतर्विरोध [ आज निर्माण झाला आहे तसा ] उत्पन्न झाल्याखेरीज कसा राहील ? सध्यांच्या कालांत प्रत्येक राष्ट्राचें भवितव्य इतर राष्ट्रांच्या भवितव्याशीं या ना त्या रीतीनें निगडित झालें आहे. एका राष्ट्राच्या धोरणाचे पडसाद दुसऱ्या राष्ट्राच्या धोरणांत उमटतात व एकाच्या धोरणाचे परिणाम दुसऱ्याला भोंवतात. अशा परिस्थितींत एकाच्या धोरणानें दुसऱ्याच्या हक्कांवर गदा येते किंवा काय याचा विचार करावयास नको काय ? एका राष्ट्राला कोणत्याहि प्रकारचें अनियंत्रित स्वातंत्र्य दिलें कीं दुसऱ्याला तशाच प्रकारच्या स्वातंत्र्याची तहान लागते व यांतूनच राष्ट्रीय प्रतिष्ठेच्या राजकारणाचा [ politics of prestige ] जन्म होतो. या राजकारणाचें पर्यवसान न्याय, स्वातंत्र्य आणि शांति यांच्या संपूर्ण विलयांत होणार हें कांहीं आतां नव्यानें सांगायला नको. म्हणूनच प्रो. लास्की यांनीं मिल्ल्–मॅझिनीच्या राष्ट्रवादावर जो अपूर्णतेचा शेरा मारला आहे तो अगदीं समर्पक वाटतो. प्रो.लास्की म्हणतात, "स्वयंनिर्णयाचा हक्क ज्यांत समाविष्ट असतो अशा राष्ट्रीयत्वाचे परिणाम मिल्ल् आणि मॅझिनी यांच्या दृष्टीला दिसले त्यापेक्षां फार निराळे ठरले आहेत. यांतूनच प्रतिष्ठेच्या राजकारणाचा जन्म होतो, आणि या राजकारणामुळेंच जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांतील संबंध न्यायावर उभारणें अशक्य ठरतें. ज्या भावनांतून या राष्ट्रीयत्वाचा उगम होतो त्या भावना, आजच्या सांस्कृतिक वातावरणांत, भयानक स्वरूप धारण करण्याचा संभव आहे हें जाणण्यासाठीं त्यांचें अस्तित्व किंवा सत्त्व नाकारण्याचें कारण नाहीं. प्रत्येक राष्ट्राला जगण्याचा हक्क आहे हें खरें. पण ज्या अर्थीं त्याला स्वच्छंदपणें जगणें शक्य नाहीं, त्या अर्थीं त्याला आपलें जीवित कसें असावें हा प्रश्न आपला आपण स्वतंत्रपणें

ठरविण्याचा हक्क नाहीं. कारण, ज्या राजकीय व्यवस्थेचा, राष्ट्र हें आज एक घटक झालें आहे त्या व्यवस्थेंत कांहीं अशीं नैतिक तत्त्वें अनुस्यूत आहेत कीं ज्यांच्या-पुढें राष्ट्रीय हितसंबंधच काय, पण अस्तित्व देखील दुय्यम दर्जाचें ठरतें."$

प्रो. लास्की यांनीं हें १९२४–२५सालीं लिहिलें. अनिर्बंध राष्ट्रीयत्वाचें जें भयानकत्व त्यांच्या दृष्टीला तेव्हां दिसलें तें आज विदारक रीतीनें खरें ठरलें आहे. राष्ट्रीयत्वाचा अमर्याद हव्यास धरल्यामुळेंच युरोपांतील अनेक राष्ट्रांच्या स्वातंत्र्यास भडाग्नि मिळाल्याचें भेसूर दृश्य आज दिसत आहे. युरोपांतील राष्ट्रें निदान स्वतंत्र तरी होतीं. भरतखंडांतील हिंदु मुस्लिम लोकांचें राष्ट्रीय स्वातंत्र्य हा आज नुसता वादविवादाचा, कागदावर सोडविण्याचा प्रश्न आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, हिंदु व मुस्लिम हीं दोनहि राष्ट्रें आज परतंत्र आहेत, एकाच परकीय सत्तेचें त्यांच्यावर प्रभुत्व आहे, व म्हणून त्यांना एक प्रकारचें समान असें [ राष्ट्रीय नाहीं तरी ] राजकीय जीवन प्राप्त झालें आहे. अशा परिस्थितींत, त्यांनीं राजकीय तत्त्वज्ञान आणि व्यवहार यांच्या अद्यावत् घड्यांचें परिशीलन करून परस्परावलंबी व परस्परपोषक अशा नवीन

---

$ A nationalism that implies the sovereign right of self-determination is, therefore, a principle of which the consequences are far different from those envisaged by men like Mazzini and Mill. It involves the politics of prestige; and these, in their turn, involve a world so ordered that relationships between nations cannot become matters to be determined by justice. It is not necessary to deny the reality, even the validity, of national feeling to realise that it is built on emotions which are, in the atmosphere of contemporary civilization, fraught with grave danger....A nation is entitled to live. But because it cannot live itself alone, the question of how it is to live is not a question it is entitled to determine alone. For in the political order of which it is a part, moral purposes are realised to which national interests, even it may be national existence, are secondary.—*Grammar of Politics*, p. 225–6

राष्ट्रीयत्वाचा [ आंतरराष्ट्रीयत्वाचा असें म्हणा हवें तर ] विकास करावयाचा कीं १९ व्या शतकांतील जुनाट राजकीय सिद्धान्तांवर अंधविश्वास टाकून परस्परविरोधी व अंतीं परस्परांना मारक होईल अशा राष्ट्रीयत्वाचा आग्रह धरावयाचा ? अशा आग्रहानें अस्तित्वांत आलेलें राष्ट्रीयत्व जन्मांधच ठरेल याबद्दल मला तरी संशय वाटत नाहीं !

पाकिस्तानचें तात्त्विक अधिष्ठान ज्या राष्ट्रीयत्वावर आहे तें राष्ट्रीयत्व असें जन्मांध आहे. आधुनिक दृष्टीचा त्याला आधार नाहीं. एकोणिसाव्या शतकांत राष्ट्रांचें स्वातंत्र्य अगदीं अविवाद्य होतें. परंतु आज १९४१ सालीं राष्ट्रीयत्व आणि आंतरराष्ट्रीयत्व यांतील विरोधाच्या स्फोटाचा गगनभेदी आवाज माणसांचीं मनें [ दुसऱ्यांदा ] बधिर करीत असतांना हिंदु व मुसलमान हीं दोन वेगळीं राष्ट्रें आहेत एवढेंच सिद्ध करून त्यांतून पाकिस्तानचा निष्कर्ष काढणें हें निर्विवाद ठरणार नाहीं.

# ४ एकराष्ट्रीयत्वाच्या मार्गावर

हिंदु आणि मुसलमान हीं दोन स्वतंत्र आणि सलग राष्ट्रें आहेत एवढें सिद्ध झाल्याबरोबर त्यांचा स्वतंत्र राज्यसत्तेचा हक्क प्रस्थापित होतो, हा पाकिस्तानवाल्यांचा तात्त्विक युक्तिवाद जुनाट आहे, त्याला आधुनिक राजनीतिशास्त्रांत फारसा आधार नाहीं, हें मीं, प्रो. लास्की यांचे उद्गार उद्धृत करून, सिद्ध केलें. पण हिंदुस्थानांत हिंदु आणि मुस्लिम अशीं दोन राष्ट्रें आहेत हेंच मुळीं निर्विवादपणें सिद्ध होत नाहीं. भरतखंडांतील हिंदु काय अगर मुसलमान काय, त्यांच्यामध्यें भाषेचे, चालीरीतींचे वगैरे इतके भेद आहेत कीं हीं दोन राष्ट्रें प्रस्थापित होण्यापूर्वी हिंदूंचा आणि त्याचप्रमाणें मुसलमानांचाहि बराच राजकीय विकास व्हावा लागेल.

ज्यांच्यामध्यें धर्माचा विलक्षण प्रभाव आहे असें सांगितलें जातें त्या मुसलमानांकडे, उदाहरणार्थ, पहा. हिंदुस्थानांतील दरोबस्त सर्व मुसलमानांची संस्कृति सारखी आहे असें म्हणतां येईल का? त्यांच्यामध्यें भाषेचे, चालीरीतींचे, क्वचित् वंशाचे, वगैरे भेद काय थोडे आहेत? मुसलमानांची संस्कृति इतकी सर्वंकष आणि प्रभावी असते कीं त्याच्यापुढें भाषेचे व चालीरीतींचे भेद अगदीं निष्प्रभ ठरतात, असें यावर उत्तर दिलें जाण्याचा संभव आहे. परंतु तें समर्पक नाहीं, कारण डॉ. आंबेडकरांनींच स्वतः म्हटल्याप्रमाणें, "भाषिक भेद हें सांस्कृतिक भेदाचें फक्त निराळें नांव आहे."‡ दुसरें असें

‡ Linguistic difference is simply another name for cultural difference—*Thoughts on Pakistan, p. 22*

कीं, इस्लाम धर्म हा कितीहि प्रभावी आणि मुसलमानांना एकत्र सांधणारा असला तरी तोहि राष्ट्रीयत्वाचें व्यवच्छेदक लक्षण ठरलेला नाहीं, हें आपल्याला तुर्कस्थान आणि आरबी राष्ट्रें यांच्या उदाहरणावरून दिसतें. तुर्की राज्यकर्त्यांनीं आरबांना सर्व दृष्टींनीं समानतेनें वागविलें. त्यांचा धर्म तर एकच होता. तरीहि वांशिक भेद प्रबळ ठरून आरबांनीं तुर्कस्थानविरुद्ध स्वातंत्र्यवादी बंड पुकारलेंच. डॉक्टर आंबेडकर यांनीं हें छान सांगितलें आहे, " आरबांशीं तुर्की लोक धर्माच्या धाग्यानें बांधलेले होते. धर्म–बंधन हें मनुष्याला ज्ञात असलेल्या सर्व बंधनांत पक्कें बंधन आहे...शिवाय हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, तुर्कांनीं आपल्या खिश्चन प्रजेला आपणाहून कमी प्रतीची म्हणून मानलें असलें तरी आरबांना त्यांनीं समानतेनेंच वागविलें...निव्वळ राजकीय दृष्ट्याच नव्हे तर सामाजिक दृष्टीनें देखील तुर्कांनीं आरबांना बरोबरीच्या दर्जानें वागविलें...स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तीन तत्त्वांवर आधारलेल्या या इस्लामी भ्रातृभावानें आरबांचें समाधान व्हावयास नको होतें काय ? पण काय वाटेल तें म्हणा, आरबांचें समाधान झालें नाहीं एवढें खरें. आरब राष्ट्रवाद्यांनीं इस्लामचे बंध तोडून आरबी स्वातंत्र्यासाठीं आपल्या तुर्की धर्मबांधवांविरुद्ध युद्ध पुकारलें."† अंतिम भवितव्याच्या दृष्टीनें देखील मुसलमानांना आपण हिंदूंहून निराळे आहोंत असें वाटतें याचा निर्विवाद पुरावा नाहीं. पाटण्याचे डॉ. सच्चिदानंद सिंह यांनीं नुकताच जो एक अनुभव

† The Turks were bound to the Arabs by the tie of religion. The religious tie of Islam is the strongest known to humanity... Add to this the fact that while the Turk treated his Christian subjects as his inferior he acknowledged the Arab as his equal...Not only politically but even socially the Arab was treated as his equal by the Turk......Ought not the Arabs to have been satisfied with this Islamic brotherhood of Arabs and Turks based on fraternity, liberty and equality? Say what one may, the Arabs were not satisfied.– Arab nationalism broke the bonds of Islam and fought against his fellow Muslim, the Turk, for its independence. —*Thoughts on Pakistan*, p. 213.

प्रसिद्ध केला आहे, त्यानें थोडासा निराळाच प्रकाश पडतो. डॉ. सिंह हे यंदा [ १९४१ सालीं ] आय्.सी.एस्.चे परीक्षक होते. त्यावेळीं मुलाखतीला आलेल्या ३७ मुस्लिम विद्यार्थ्यांना त्यांनीं पाकिस्तानबद्दल प्रश्न विचारले. ३७ पैकीं ३६ विद्यार्थ्यांनीं पाकिस्तानला आपला सक्त विरोध दर्शविला व विरोधाचीं समर्पक कारणेंहि सादर केलीं.

हिंदुधर्मीयांचे धार्मिक पाश मुसलमानांच्या इतके प्रभावी नसले तरी त्यांचा राजकीय व बौद्धिक विकास मुसलमानांच्या मानानें किती तरी अधिक झाला असल्यानें त्यांच्यांत हिंदु राष्ट्रीयत्व प्रस्थापित करणें कदाचित् अधिक सोपें ठरेल. पण हिंदूंचे हेच गुण एकराष्ट्रीयत्वास पोषक होतील हें लक्षांत टेवलें पाहिजे. मात्र हिंदुस्थानांतील हिंदूंत वाटतें तितकें सहकार्य अगर एकी आजहि नाहीं हें द्रवीडस्तान आणि दलितस्तान यांच्या मागण्या वाढत्या आवाजांत कानांवर पडत आहेत, यावरून दिसून येईल. स्वतः डॉ. आंबेडकर दलितस्तानचा आग्रह धरीत नाहींत. त्यांच्या 'हिंदुस्थानां'त अस्पृश्यांचा समावेश होतो. त्यामुळें 'हिंदुस्थानां'त अस्पृश्यांना विशेष महत्त्व प्राप्त होईल, आणि त्यांची स्थितिहि सुधारेल हें जाणून अस्पृश्यांनीं व त्यांच्या पुढाऱ्यांनीं भरतखंडाचे पाकिस्तान आणि ' हिंदुस्थान ' असे भाग पाडण्याचा आग्रह धरावा हें अगदीं स्वाभाविक आहे, आणि त्याबद्दल स्पृश्यांनीं त्यांना दोष देण्याचें कारण नाहीं. पण 'हिंदुस्थान'च्या प्रस्थापनेचा पुरस्कार करण्यापूर्वीं त्यांनीं पाकिस्तानचा तात्त्विक निकष त्याला लावायला नको काय ? म्हणजे 'हिंदुस्थानां'त स्पृश्यास्पृश्यांना एकत्र कोंबण्यापूर्वीं स्पृश्य हिंदु आणि अस्पृश्य हीं दोन वेगवेगळीं राष्ट्रें नाहींत, अंतिम भवितव्याच्या दृष्टीनें आपण एकच आहोंत असें त्यांना – निदान अस्पृश्यांना – वाटतें असें सिद्ध करावयास नको काय ? डॉ. आंबेडकरांच्या पुस्तकांत या प्रश्नाचा ऊहापोह कोठेंच आढळत नाहीं.

या विवेचनावरून एवढें सिद्ध होतें कीं, भरतखंडांत हिंदु आणि मुस्लिम अशीं दोन वेगवेगळीं राष्ट्रें प्रस्थापित करावयाचीं म्हटलीं तरी त्यासाठीं बरीच खटपट करावी लागेल. मग थोडी अधिक खटपट करून हिंदुस्थानांत एकराष्ट्रीयत्वच प्रस्थापित करण्यास काय हरकत आहे ? यांत अनैसर्गिक अगर

अनैतिहासिक असें कांहीं नाहीं. भौगोलिक दृष्ट्या हिंदुस्थान हा एक सलग व स्वतंत्र असा देश आहेच, पण गेलीं शंभर–सव्वाशें वर्षे तो एकाच राजसत्ते-खालीं असल्यानें एकराष्ट्रीयत्वाच्या दिशेनें त्याचा विकासहि होत आहे. अर्थात् डॉ. आंबेडकरांचा अभिप्राय अगदीं विरुद्ध स्वरूपाचा आहे. हिंदुमुसलमानांत एकराष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें कांहीं प्रगति तर नाहींच, पण उलट त्यांच्यांतलें होतें-नव्हतें तेंहि राजकीय ऐक्य दिवसेंदिवस संपुष्टांत येत आहे असें त्यांनीं सायमन कमिशनच्या आधारानें सांगितलें आहे. जोंपर्यंत हिंदुस्थानांत ब्रिटि-शांचीच अनियंत्रित सत्ता होती तोंपर्यंत हिंदुमुसलमानांतील स्पर्धा मर्यादित स्वरूपाची होती, परंतु देशांत राजकीय संक्रमण सुरू झालें आणि सत्ता हिंदी लोकांच्या हातांत जाण्याचीं लक्षणें वाढत्या प्रमाणावर दिसूं लागलीं, त्याबरोबर हिंदुमुसलमानांच्या परस्परविरोधी आकांक्षा जागृत झाल्या आणि त्यांच्या स्पर्धेला विशेष तीव्र स्वरूप प्राप्त होऊं लागलें,† असें सायमन कमिशनचें मत आहे. तें चूक आहे असें म्हणण्याचें जरी कारण नसलें तरी हे मतभेद अगर ही स्पर्धा संक्रमणकालापुरतीच टिकून राहील, एकदां स्वराज्याची पूर्ण प्रस्थापना झाली म्हणजे ती नष्ट तरी होईल किंवा तिला अधिक हितकर वळण तरी लागेल अशी आशा करावयास काय हरकत आहे ? पण डॉ. आंबेडकरांना मात्र अशी कांहीं आशा वाटत नाहीं. "दीडशें वर्षांच्या समान राजकीय अंमलाच्या कालांत जर आपणांमध्यें राष्ट्रीय ऐक्य प्रस्थापित होऊं शकत नाहीं तर तें कधींच होण्याचा संभव नाहीं,"* असें त्यांना

---

† So long as authority was firmly established in British hands and self-government was not thought of, Hindu-Muslim rivalry was confined within a narrower field...But the coming of the Reforms and the anticipation of what may follow them have given new point to Hindu-Muslim competition. [Quoted in *Thoughts on Pakistan*, p. 185]

* If one hundred and fifty years of life under a Central Government does not suffice, eternity will not suffice. —*Thoughts on Pakistan, p. 184.*

वाटतें. हिंदी लोकांची सकुंचित मनोवृत्ति, त्यांची एकंदर प्रकृतिच या अपयशाला जबाबदार आहे असें त्यांचें म्हणणें आहे. हिंदी लोकांत एकीची भावनाच नाहीं. ती प्रस्थापित व्हावी अशी त्यांना तळमळच नाहीं. त्यांना एक वेश नको, एक भाषा नको, एका प्रकारचें जीवनहि नको. राष्ट्रीय साम्यापेक्षां प्रांतिक विषमतेचाच अभिमान त्यांना अधिक वाटतो. उदाहरणार्थ, गुजरात्याला गुजराती असण्याबद्दल धन्यता वाटते तर महाराष्ट्रीयाला आपण महाराष्ट्रीय जन्मलों यांतच पुण्य वाटत असतें. अशा परिस्थितींत *Civis Indianus Sum* या घोषणेंत चैतन्य भरणारी राष्ट्रीय भावना हिंदी लोकांत कशी निर्माण होणार, असा त्यांचा सवाल आहे.

पण हा सवाल अगदीं बिनतोड आहे असें मला वाटत नाहीं. गुजराती, महाराष्ट्रीय, मद्रासी असे भेद नसतात कोणत्या राष्ट्रांत? खुद्द ग्रेट ब्रिटनमध्यें इंग्रज, वेल्श, स्कॉच असे फरक नाहींत काय? लंडनच्या रस्त्यावर फिरणाऱ्या बसेसमध्यें 'या स्कॉच लोकांनीं आमची सर्व सिव्हिल सर्व्हिस काबीज केली' असे तक्रारीचे उद्गार अगदीं राष्ट्रीय प्रकृतीच्या इंग्रजांच्या तोंडांतून बाहेर पडलेले ऐकूं येतात असें माहीतगार सांगतात. वैचित्र्यांत संवादित्व [ unity in variety ] निर्माण करणें हें एकराष्ट्रीयत्वाचें मोठें कार्य असतें. गेल्या शंभर–सव्वाशें वर्षांत तें झालें नाहीं हें तर उघडच आहे. पण याला हिंदुस्थानांतली परकी सत्ता आणि पुनरुज्जीवनाच्या स्वप्नांत गुंग असणारे जातीय पुढारी व त्यांच्या संस्था कारण आहेत. इंग्रजांनीं सर्व हिंदी लोकांना एकाच राजकीय अंमलाखालीं आणलें, म्हणजे हिंदुस्थानांत राजकीय एकी प्रस्थापित केली. परंतु निव्वळ राजकीय एकीनें एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होत नाहीं हें आंबेडकरांनींच, रेनन, ब्रायसी आणि प्रो. मार्विन यांचीं मतें उद्धृत करून सांगितलें आहे. रोमन साम्राज्यांत नुसती राजकीय एकी होती, आत्मिक एकी नव्हती, म्हणून त्याचा चारपांचशें वर्षांत ऱ्हास झाला. पण त्या साम्राज्यांत अशी एकी निर्माण होऊं शकली नाहीं याचें कारण त्या कालीं जगाची आर्थिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक प्रगति फारशी झाली नव्हती. आजच्या औद्योगिक युगांत निरनिराळ्या प्रकारच्या लोकांना

एकत्र सांधणारे घटक कितीतरी अधिक आणि अधिक प्रभावी आहेत. ब्रिटिशांचें हिंदुस्थानांत आगमन झाल्यावर जुनी मोडकळीस आलेली सरंजामी व्यवस्था संपुष्टांत यावयास सुरवात होऊन नवें औद्योगिक युग अवतरलें. या नव्या युगांत नवीं मूल्यें आणि नव्या जाणिवा निर्माण होऊं लागल्या. या नवयुगाच्या स्वाभाविक विकासास अनेक अडथळे आले. पण त्याच्या आंतरिक गतीमुळें हिंदुस्थानांत एकराष्ट्रीत्वाचा विकास होणें अपरिहार्यच होतें, व तसा तो होतहि आहे. हे अडथळे दूर झाले म्हणजे तो अधिक झपाट्यानें होईल.

मात्र भरतखंडांत हिंदु अगर मुस्लिम राष्ट्रीयत्वाच्या विकासापेक्षां हिंदी एकराष्ट्रीयत्वाचा विकास अधिक बिकट आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. हिंदुस्थानांत एकराष्ट्रीयत्वाची प्राचीनकालापासून चालत आलेली ऐतिहासिक परंपरा नाहीं. हिंदुस्थानांत अनेक साम्राज्यें उदयास आलीं आणि विलयास गेलीं, परंतु, सर्व हिंदुस्थानभर आपलें एकछत्री राज्य स्थापण्याची त्यांच्या संस्थापकांची इच्छा असूनहि, त्यांचा विस्तार हिंदुस्थानाच्या भौगोलिक मर्यादांनीं कधीं परिमित होता असें म्हणतां येणार नाहीं. कांहींचा विस्तार हिंदुस्थानच्या सरहद्दीपलीकडे गेला, पण त्याचवेळीं हिंदुस्थानचे कांहीं भाग त्यांच्या बाहेरच राहिले. हिंदुस्थानच्या सांस्कृतिक विकासाबद्दल कमी अधिक प्रमाणांत तेंच म्हणतां येईल. या बाबतींत हिंदी राष्ट्रवाद्यांच्या अँग्लो–इंडियन टीकाकारांचे आक्षेप मला बरोबर वाटतात. पण म्हणून हिंदी एकराष्ट्रीयत्वाचा विकास कधींच होणें शक्य नाहीं, अगर हिंदुस्थानांत नाना पंथ, नाना भेद आणि नाना कळा असल्यामुळें हिंदुस्थानांत एकराष्ट्रीयत्वाची प्रस्थापना केवळ अशक्य होय असें जेव्हां हे टीकाकार प्रतिपादन करूं लागतात तेव्हां मतलबामुळें हे 'लोक अमेरिका आणि कॅनडा यांच्या इतिहासाकडे बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष तरी करीत असतात किंवा त्याचें ज्ञान तरी त्यांना नसतें असें वाटूं लागतें. जॉर्ज वॉशिंग्टननें अमेरिकन स्वातंत्र्याचें निशाण फडकविण्यापूर्वी अमेरिकेंत ज्या वसाहती केल्या होत्या त्यांत कांहीं तरी साम्य होतें काय ? किंवा त्यांचा कधीं काळीं समन्वय होईल अशी अपेक्षा तरी करणें शक्य होतें काय ? त्यांच्यामधील आर्थिक, व्यापारी आणि धार्मिक भेदांचें आणि स्पर्धायुक्त जीवनाचें इतिहासकार लेकी यांनीं पुढील शब्दांत

वर्णन केलें होतें: "डच, जर्मन, फ्रेंच, स्वीडिश, स्कॉच आणि आयरिश वंशांचे अनेक लोक इंग्रजांच्या वंशजांत मिसळले, आणि त्यांनीं त्या वसाहतींचें स्वरूप मोठें चित्रविचित्र करून सोडलें. त्यांच्यामध्यें राज्यव्यवस्था, धार्मिक समजुती, व्यापारी हितसंबंध आणि सामाजिक चालीरीति यांचे इतके प्रकार होते कीं, त्यांची कधीं एकी होईल हीच गोष्ट अनेकांना अविश्वसनीय वाटली."× बर्न्री नांवाच्या एका इंग्रज प्रवाशानें या वसाहतींत १७६० च्या सुमारास प्रवास केला आणि त्यांच्याबद्दल पुढील उद्गार नमूद करून ठेवले: "उत्तर अमेरिकेंतील निरनिराळ्या वसाहतींत, पाणी आणि विस्तव यांच्या मध्यें नसेल इतकी विषमता होती."§ अमेरिकेंतील वसाहतींत सुरवातीस असें 'अहिनकुलम्' असूनहि त्यांचें पुढें एक प्रभावी आणि नमुनेदार राष्ट्र बनलें. कॅनेडिअन राष्ट्रीयत्वाचा इतिहास देखील असाच आहे.

यावर असा आक्षेप घेतां येईल कीं, अमेरिका व कॅनडा या देशांत कितीहि तऱ्हा आणि पंथ असले तरी त्यांपैकीं इस्लाम धर्म हा एक नव्हता; इस्लाम हा इतका कडवा आणि दुराराध्य धर्म आहे कीं त्याच्या अनुयायांशीं सहकार्य करून एकराष्ट्रीयत्वाची प्रस्थापना करणें केवळ अशक्य होय. पण चीन अगर रशिया यांच्या उदाहरणांकडे पाहिलें कीं हा आक्षेप किती फोल आहे तें ध्यानांत येऊं लागतें. चीनमध्यें मुस्लिम, ख्रिश्चन, बुद्धिस्ट आणि कन्फ्युशिअन, असे निरनिराळ्या धर्मांचे लोक असूनहि चीनच्या एकराष्ट्रीयत्वास फारसा बाध आलेला नाहीं; इतकेंच नव्हे, तर जपाननें आणलेल्या अरिष्टांतहि त्यांची एकी तावूनसुलाखून निघाली. रशियांत देखील मुस्लिम प्रांत आहेत.

---

× Great bodies of Dutch, Germans, French, Swedes, Scotch, and Irish, scattered among the descendants of the English, contributed to the heterogeneous character of the Colonies, and they comprised so many varieties of government, religious belief, commercial interests and social type that their union appeared to many incredible.

§ Fire and water are not more heterogeneous than the different Colonies in North America.

त्यांनीं सोव्हिएट सरकारचें प्रभुत्व मान्य तर केलेंच आहे, पण सोव्हिएटच्या अंमलाखालीं त्यांची नमुनेदार प्रगतिहि झाली आहे. यावर कदाचित् असा आक्षेप घेतला जाईल कीं, रशियन मुसलमानांची परंपरा हिंदी मुसलमानांच्या परंपरेप्रमाणें तद्देशियांना विरोधक आणि विघातक नाहीं. पण हें खरें नाहीं. मध्य–आशियांतील मुसलमानांनीं एकदां रशियावर जबरदस्त स्वारी करून कीव्ह राजधानी जमीनदोस्त केली होती. रशियन तुर्कस्थानमधील मुसलमान हे चेंगीझखानाचे वंशज आहेत हें विसरून चालणार नाहीं. पण ही आक्रमक परंपरा रशियनांशीं त्यांची राष्ट्रीय एकी होण्याच्या आड आली नाहीं. दुसरें असें कीं, हिंदी–मुसलमानांची ऐतिहासिक परंपरा राजकीय दृष्ट्या हिंदूंना कितीहि विरोधक म्हटली तरी सांस्कृतिक दृष्ट्या ती तशीच आहे असें म्हणतां येणार नाहीं. जिला इंडो–पर्शियन संस्कृति असें म्हणतात तिचा उद्‌गम आणि विकास ध्यानांत घेतला तर हें पटेल. उत्तर हिंदुस्थानी संगीत अगर शिल्पकला हीं हिंदु आणि मुसलमान यांच्या सांस्कृतिक मिलाफाचीं प्रतीकें आहेत. ह्या सांस्कृतिक मिलाफाचा आविष्कार प्रत्यक्ष जीवनांतहि कसा होतो हें पंजाब अगर संयुक्त प्रांत यांतील कांहीं खानदानी हिंदु आणि मुसलमान घराण्यांच्या रहाणीकडे तुलनात्मक दृष्टीनें पाहिलें म्हणजे समजून येईल. भेंडीबाजारांतील मुसलमान हेच कांहीं हिंदुस्थानांतील मुसलमानांचे प्रतिनिधि नव्हत आणि म्हणूनच हिंदुस्थानांत सात-आठ कोटी मुसलमान आहेत म्हणून भेदरून जाण्याचें कारण मला दिसत नाहीं.

आणि मुसलमानांत देखील धर्मातीत राष्ट्रीयत्व निर्माण करतां येतें हें कमाल-पाशानें तुर्कस्थानमध्यें चांगलें यथास्थित सिद्ध केलें आहे. त्यानें खिलाफत संपुष्टांत आणली, तुर्की मौलवींची जिंदगी जप्त करून त्यांचें आळशी जीवन अशक्य केलें, धर्मगुरूंचा अवास्तव अधिकार नष्ट केला, तुर्की लोकांच्या डोक्याची फेज उडवून देऊन त्यांच्या पोषाखांत आधुनिक आकर्षकत्व आणलें, तुर्की स्त्रियांचा गोषा दूर करून त्यांना सामाजिक जीवन प्राप्त करून दिलें, तुर्की जनतेच्या कौटुंबिक कायद्यांत स्विस पद्धतीचा अंतर्भाव केला आणि तुर्की भाषेंत देखील सुधारणा करून परकी लॅटीन लिपी तिच्या माथीं मारली. या सर्व सुधारणा

कमालनें इतक्या झपाट्यानें केल्या कीं तें एक विसाव्या शतकाचें आश्चर्य होऊन बसलें आहे. तुर्कस्थानचें उदाहरण हिंदुस्थानला सर्व प्रकारें गिरवितां येईल असें मला म्हणावयाचें नाहीं, परंतु पाकिस्तानच्या पुरस्कारासाठीं युद्धोत्तर तुर्कस्थानचा आदर्श जितपत पुढें करतां येतो तितपत तो पाकिस्तानच्या विरुद्धहि करतां येतो एवढेंच माझें म्हणणें आहे.

अर्थात् कमालच्या सर्व सुधारणा तुर्कस्थानच्या स्वातंत्र्यामुळें शक्य झाल्या हें तर उघडच आहे. वर मीं अमेरिका कॅनडा यांचीं उदाहरणें दिलीं; पण त्यांच्याहि राष्ट्रीयत्वाचा खरा विकास त्यांचें स्वातंत्र्य प्रस्थापित झाल्यावरच झाला. हिंदी एकराष्ट्रीयत्वाचाहि खरा विकास स्वातंत्र्याच्या प्रस्थापनेनंतरच होईल. हिंदुमुसलमानांची तेढ ही पारतंत्र्यांतून उद्‌भवलेलीच एक विकृति आहे, आणि स्वातंत्र्य हाच या विकृतींवर खरा रामबाण उपाय आहे.

# ५ नात्सी तंत्राचा इस्लामी अवतार !

पाकिस्तानचा व्यावहारिक विचार करूं लागलें कीं पहिला प्रश्न हा उपस्थित होतो कीं, पाकिस्तानचें नक्की स्वरूप कोणतें? मुसलमानांना पाकिस्तान हवें म्हणजे नक्की काय हवें? हें पाकिस्तान हिंदुस्थानच्या कोणत्या भागावर प्रस्थापित करावयाचें? त्याचे हिंदुस्थानशीं, ब्रिटिश साम्राज्याशीं अगर एकंदर जगाशीं संबंध कोणते रहाणार? या पाकिस्तानमध्यें ज्या प्रकारची राज्यव्यवस्था मुस्लिम लीगवाले आणूं इच्छितात त्याचें स्वरूप तरी कोणतें राहील?

मि. महमदअल्ली जीना यांचें बिल्कुल उत्तर देत नाहींत, त्याबद्दल अवाक्षरहि तोंडावाटे काढावयाचें ते टाळतात, ही या वादांतली मोठी मौज आहे. अनेकांना यांचें आश्चर्य वाटतें. कांहीं दिवसांपूर्वी माटुंगा येथें बोलतांना डॉ. जयकर यांनीं देखील याबद्दल आश्चर्य व्यक्त केलें. मला मात्र याचें मुळींच आश्चर्य वाटत नाहीं. मि. जीना यांचें जें नेतृत्वाचें विशिष्ट तंत्र मीं मागें विशद करून सांगितलें त्याला हें अगदीं धरून आहे. सत्याचा आभास निर्माण करणाऱ्या परंतु वस्तुस्थितीचा फारसा आधार नसलेल्या, बहुजनसमाजाच्या मनाची पकड घेणाऱ्या परंतु बहुजनसमाजाच्या सामुदायिक हिताशीं फारसा संबंध नसलेल्या, बहुजनसमाजाच्या आंतरिक प्रेरणांना चेतवणी देणाऱ्या परंतु खरोखर या प्रेरणांच्या विकृतीवर आधारलेल्या, काल्पनिक व म्हणून कधींहि दूर होऊं न शकणाऱ्या अशा कायम स्वरूपाच्या तक्रारी निर्माण करून त्यांच्या जोरावर आपलें अबाधित नेतृत्व प्रस्थापित करावयाचें असें तें

जीनांचें विशिष्ट तंत्र आहे, आणि पाकिस्तान हें त्या तंत्राच्या चवकटींत चपखल बसतें. हें पाकिस्तान कधींहि अस्तित्वांत येण्याचा संभव नाहीं हें जाणूनच जीनांनीं त्याची घोषणा करावयास सुरवात केली आहे. हें पाकिस्तान ज्या दिवशीं अस्तित्वांत येईल, ज्या दिवशीं सत्याच्या किरणाचे चटके त्याला बसतील त्या दिवशीं तें हवेंत विरून जाण्यास सुरवात होईल, हें जीना बरोबर जाणतात. इतकेंच काय, पण या पाकिस्तानचा निश्चित तपशील कागदावर मांडल्याबरोबर त्याची चमक नष्ट होऊं लागेल हेंहि त्यांना नीट माहित आहे. म्हणूनच ते पाकिस्तानचें स्वरूप वर्णन करून सांगावयाचें कसोशीनें टाळतात. इतकेंच नव्हे, तर मुस्लिम लीगच्या लाहोर येथील अधिवेशनांत एक परस्परविरोधी स्वरूपाचा ठराव पास करून घेतात. [ डॉ. आंबेडकरांनीं लाहोर ठरावाचें हें परस्परविरोधी स्वरूप चांगलेंच स्पष्ट करून दाखविलें आहे. – पृ. १७] जीनांचें पुढारीपणाचें तंत्र ज्यांना समजलेलें नाहीं, अगर ज्यांना त्याची पर्वा वाटत नाहीं अशा कांहीं मुस्लिम विद्वानांनीं पाकिस्तानच्या चारपांच निश्चित योजना सादर केल्या आहेत. परंतु त्यांचा तपशील प्रकाशांत आल्याबरोबर त्यांचें व्यवहारशून्य स्वरूप चवाठ्यावर आलें आणि त्यांतील अडचणी झगझगितपणें दृष्टीस पडून लोकांचा त्यांच्यावरचा विश्वास साफ उडाला. याचा मोठा पुरावा म्हणजे मुस्लिम लीगला यांपैकीं एकहि योजना पसंत पडलेली दिसत नाहीं, आणि मुस्लिम लीगपाशीं स्वतःची अशी एकहि अधिकृत योजना नाहीं. ज्या दिवशीं आपण अशी अधिकृत योजना सादर करूं त्या दिवशीं पाकिस्तानचें घनदाट धुकें वितळूं लागेल इतकें जाणण्याइतकी चलाख बुद्धिमत्ता जीनांपाशीं आहे. म्हणून ते नेहमीं सांगत असतात कीं, प्रथम आमचें पाकिस्तानचें तत्त्व मान्य करा, म्हणजे मग आम्हीं आमचा तपशील सांगूं. जीनांचा हा युक्तिवाद नवीन नाहीं. मागें जीना आणि जवाहरलाल यांचा पत्रव्यवहार झाला तेव्हांहि त्यांची हीच वृत्ति व्यक्त झाली. जवाहरलाल नेहरू एकसारखे जीव तोडून त्यांना विनवीत होते कीं, तुम्हांला नक्कीं काय हवें तें बोला. पण जीना बोलत ना. मुस्लिम लीग ही प्रथम मुसलमानांची एकमेव प्रतिनिधि संस्था आहे हें मान्य करा, मग सांगतों – अशी

उडवाउडव त्यांनीं चालविली. त्याच प्रकाराची पुनरावृत्ति आज ते पाकिस्तान-बाबत करीत आहेत.

पाकिस्तानबाबतची ही संदिग्धता मुस्लिम लीगच्या एकंदर कार्यक्रमांतच दिसून येते. तत्त्वज्ञान आणि कार्यक्रम यांतील संदिग्धता मुजोरीनें भरून काढण्याकडे सर्वच राजकीय पक्षांची प्रवृत्ति असते आणि तेंच दृश्य लीगमध्येंहि दृष्टीस पडत आहे. या मुजोरीच्या राजकारणाचा शोध जीनांनीं लावलेला नाहीं, पण हिटलर आणि झेकोस्लोव्हाकिआंतील सुडेटन जर्मन यांच्याकडून स्फूर्ति घेऊन त्यांनीं या मुजोरीला विशेष संघटित स्वरूप दिलेलें दिसतें. मुस्लिम लीगच्या कराचीच्या अधिवेशनांत मि. जीना आणि सर अब्दुल्ला हरून यांनीं हिंदी मुसलमानांची सुडेटन जर्मनांशीं पहिल्यांदा तुलना केली आणि जें सुडेटन जर्मनांनीं केलें तें हिंदुस्थानांत करण्याची ताकद मुसलमानांच्या मनगटांत आहे अशा धमक्या सरकारला आणि मुस्लिमेतर जनतेला ऐकविल्या. तेव्हांपासून मुस्लिम लीगच्या राजकारणांत सुडेटन जर्मनांच्या राजकारणाचें अनुकरण वाढत्या प्रमाणावर होत असल्याचें दृश्य दृष्टीस पडत आहे. झेकोस्लोव्हाकियांत सुडेटन जर्मनांची संख्या अवघी २३'४ टक्के होती. कांहीं किरकोळ अपवाद सोडले तर झेक सरकारची सुडेटनांविषयींची वृत्ति अगदीं आदर्श होती. प्रथम प्रथम राज्यकारभारांत आपल्याला अधिक वांटा मिळावा एवढीच, हिंदी मुसलमानांप्रमाणें, सुडेटन जर्मनांची मागणी होती – परंतु जर्मनींत हिटलरचा उदय होऊन त्यानें पॅन-जर्मॅनिझमची घोषणा केल्यापासून सुडेटन जर्मनांच्या राजकारणांस निराळेंच वळण लागलें. अजूनपर्यंत सुडेटन हे आपल्याला फक्त अल्पसंख्याक म्हणवीत, पण यापुढें कॉन्रॅड हेनलाईन या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं आपण नुसते अल्पसंख्याक आहोंत हें नाकारण्यास व आपल्या स्वतंत्र राष्ट्रीयत्वाचा पुकारा करण्यास सुरवात केली, आणि झेक सरकारविरुद्ध पद्धतशीर प्रचार सुरू केला. काल्पनिक तक्रारींच्या याद्या निर्माण झाल्या, आणि कोणाच्या ध्यानींमनींहि नाहींत असे छळवादाचे आरोप सरकारवर करण्यांत येऊं लागले. झेक सरकारनें सुडेटनांना अधिक सवलती देऊन समजावण्याचा प्रयत्न केला – परंतु त्यांच्या

विरोधाचा पारा वाढतच राहिला. अखेरीस ता. २४ एप्रिल १९३८ हेनलाईननें एक ८ कॉलमी जाहीरनामा प्रसिद्ध केला आणि जर्मनवादानें स्फुरलेल्या स्वतंत्र राष्ट्रीयत्वाच्या जोरावर जीवनाच्या बहुतेक सर्व क्षेत्रांत संपूर्ण स्वायत्तता आणि उरल्यासुरल्या मध्यवर्ति कारभारांत संपूर्ण समानता यांची मागणी केली. झेकोस्लोव्हाकिआचा यापुढील करुण इतिहास कुप्रसिद्धच आहे. या इतिहासाची पुनरावृत्ति हिंदुस्थानांत करण्याचा जीना आणि मुस्लिम लीग यांचा मनसुबा दिसतो. सुडेटन जर्मनांच्या प्रचारांच्या सर्व अवस्थांतून लीगचा प्रचार गेला आहे. * प्रथम नुसत्या राज्यकारभारांत अधिक वांटा मागवायचा, नंतर आपण अल्पसंख्याक आहोंत हें नाकबूल करून स्वतंत्र राष्ट्रीयत्वाचा हक्क सांगावयाचा, मग आपल्या मातृभूमीचें ऐक्य नाकारावयाचें, त्यानंतर अगदीं निराधार असे छळवादाचे आरोप करावयाचे, हें सर्व झालें म्हणजे देशाच्या फाळणीचा आग्रह धरून उरल्यासुरल्या मध्यवर्ति कारभारांत पन्नास टक्के प्रतिनिधित्वाचा हट्ट धरावयाचा – ही सुडेटन जर्मनांच्या मागण्यांची चढती भाजणी मुस्लीम लीगच्या मागण्यांतहि आढळते. मुसलमानांनीं सुडेटन जर्मनांची स्वतंत्र राष्ट्रीयत्वाची तात्त्विक भूमिकाच केवळ स्वीकारली असें नव्हे, तर त्यांचें प्रचाराचें तंत्रहि त्यांनीं व्यवस्थित उचललेलें दिसतें. त्यांच्यांतला खाकसार पंथ तर उघड उघड नात्सी पद्धतीवरच आधारलेला आहे, पण मुस्लीम लीगच्या स्वयंसेवक पथकालाहि नात्सी

---

* याचें अतिशय वेंचक वर्णन अलाहाबादचे विद्वान् आणि समतोल इतिहासकार प्रो. वेणीप्रसाद यांनीं पुढीलप्रमाणें केलेलें आढळतें: The progress of the Sudetan demands from a larger share in administration and policy to a repudiation of minority status, the claim to separate nationhood, the denial of Czechoslovak unity, charges of atrocities and oppression unsupported by evidence, the demand for frontier revision, the advocacy of a virtual partition together with the claim of 50 per cent share in the residual central organisation – all these features in the Sudetan movement in 1936–38 found their counterpart in the resolutions of the Muslim League in 1939–41 – *The Hindu-Muslim Questions*, *P*. 72.

चळण लागत असल्याचें सिद्ध करून देतां येईल. नात्सी प्रचारामध्यें घोषणा, ध्वज, बोधचिन्हें, विजयचिन्हें यांचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. हिटलरला विजयचिन्हासाठीं लांबून उसनवारी करावी लागली, पण मुस्लिम लीगपाशीं चाँद तयारच होता. घोषणांचीहि उणीव नव्हती. पॅन–इस्लामिझम् आणि पाकिस्तान यांचीं स्वप्नें जीनांपूर्वीं इतरांना पडलेलीं होतीं. फक्त धमक्यांची उणीव होती, तीहि आतां लीगच्या पुढाऱ्यांनीं भरून काढली आहे. डॉ. आंबेडकर-सारख्या पाकिस्तानवादी इसमालासुद्धां असें म्हणावें लागत आहे कीं, मुसलमानांच्या राजकारणांत दादागिरी शिरलेली दिसते. हिंदु–मुसलमानांच्या दंग्याची जबाबदारी तर आंबेडकरांनीं स्पष्ट शब्दांत मुस्लिम पुढाऱ्यांच्या माथीं मारली आहे. * मी या राजकारणाला आततायीपणाचें राजकारण इतकेंच म्हणतों.

अर्थात् मुसलमानांच्या राजकारणांत आततायीपणाचें हें दृश्य अगदींच नवीन नाहीं. तिचा कमी अधिक आविष्कार आज अनेक वर्षें होत आहे. पण कालपरवांपर्यंत तिचें स्वरूप बरेचसें नकारात्मक होतें. म्हणजे राजकीय हेतूसाठीं आततायीपणाचा प्रत्यक्ष उपयोग करण्याऐवजीं होणाऱ्या आततायीपणाचा निषेध करावयाचें कांहीं प्रमुख मुसलमान पुढाऱ्यांनीं वेळोंवेळीं नाकारलें. उदाहरणार्थ, धर्मवेड्या मुस्लिम माथेफिरूंनीं बंडें केलीं, दंगे केले, खून देखील केले – पण अनेक प्रमुख मुसलमान पुढाऱ्यांनीं या माथेफिरूंचा निषेध करण्याचें कर्तव्य बजावलें नाहीं. ता. २३ डिसेंबर १९२६ रोजीं स्वामी श्रद्धानंदाचा आजारी अवस्थेंत खून झाला. त्याचप्रमाणें पुढें लाला नानकचंद, 'रंगीला रसूल'कर्ते राजपाल, नथुरमल शर्मा इत्यादींचे निघृण खून झाले. पण प्रमुख मुस्लिम पुढाऱ्यांनीं या अधम कृत्यांचा निषेध केला नाहीं. उलट कांहीं सुशिक्षित मुसलमानांनीं खुनी लोकांच्या आत्म्याला सद्गति मिळावी अशी अल्लाची

* The third thing that is noticeable is the adoption by the Muslims of the gangsters' methods in politics. The riots are a sufficient indication that gangsterism has become a settled part of their strategy in politics—*The Thoughts on Pakistan*, P. 267.

प्रार्थना केल्याचे दाखले आहेत.* मुस्लिम पुढाऱ्यांची ही लाजिरवाणी वृत्ति मोपला बंडाच्या वेळीं चांगलीच चव्हाठ्यावर आली. खिलापत पुढाऱ्यांनीं मोपला बंडखोरांना अभिनंदनाचे संदेश पाठविण्याचे ठराव केले, इतकेंच नव्हे तर त्यांच्या बंडखोरीचें ' धर्मासाठीं चालविलेला शूर संग्राम ' [ The brave fight they were conducting for the sake of religion ' ] असें वर्णन केलें. कॉंग्रेसवादी मुसलमान तरी अधिक शहाणपणा दाखवतील अशी अपेक्षा होती; पण तीहि फोल ठरली, असें स्वामी श्रद्धानंद यांनीं, कॉंग्रेसच्या विषयनियामक कमिटींतील मोपल्यांच्या निषेधाच्या ठरावाचा जो इतिहास निवेदन केला आहे त्यावरून दिसतें. ठरावाच्या मूळ मसुद्यांत हिंदूंवर अनन्वित अत्याचार करण्याबद्दल मोपल्यांचा निःशेष निषेध करण्यांत आला होता; पण कांहीं हिंदु कॉंग्रेसवाल्यांनाच तो पटला नाहीं, आणि त्यांच्या उपसूचनांनीं ठरावाचें स्वरूप कांहीं निवडक मोपल्यांचाच निषेध करण्याइतपत सौम्य झालें. पण या सौम्य स्वरूपांतहि तो ठराव कांहीं मौलानांना पटला नाहीं. मौलाना हजरत मोहनी यांच्यासारख्या कट्टर स्वातंत्र्यवाद्यानें तर चक्क सांगितलें कीं, मोपला प्रदेशाचें स्वरूप दार–उल–हर्ब [ शत्रुभूमि ] असें झाल्यामुळें मोपल्यांना तेथील हिंदूंसमोर कुराण कीं तलवार असा सवाल फेंकणें भागच होतें ! मुसलमान सभासदांच्या या वृत्तीमुळेंच तो ठराव एकमतानें पास होऊं

---

* It is reported that for earning merit for the soul of Abdur Rashid, the murderer of Swami Shradhanand, in the next world, the students & professors of the famous theological college at Deoband finished five complete recitations of the Koran & had planned to finish D. V. a lakh and a quarter recitations of Koranic verses. Their prayer was "God Almighty may give the marhoon ( i. e. Rashid ) a place in the 'a' ala–e–illeeyeen ( the summit of the seventh heaven ).– As quoted in Dr. Ambedkar's *Thoughts on Pakistan* [ P- 153 ]. या वृत्तान्तांत कितपत तथ्य आहे किंवा या पैगंबरभक्तांचा संकल्प सिद्धीस गेला किंवा नाहीं हें मला माहीत नाहीं. हा वृत्तान्त खोटा असेल तर वरचा माझा अभिप्राय निराधार ठरतो, हें उघडच आहे.

शकला नाहीं, आणि मोपला बंडामुळें शरमलेल्या कॉंग्रेसवाल्यांना फक्त बहुमतावर समाधान मानून घ्यावें लागलें. मोपला बंडासारख्या भीषण प्रकाराबाबत ज्या मुसलमान पुढाऱ्यांची ही वृत्ति त्यांनीं अर्थात् दंगेधोपे किंवा स्त्रियांचें शीलहरण यांच्याकडे निषेधाचा नुसता दृष्टिक्षेपहि करण्याचें नाकारलें तर नवल तें कोणतें ?

मुस्लिम पुढाऱ्यांच्या या वृत्तीला कांहीं सन्मान्य अपवाद असतील. अजिबात नाहींत असें मला म्हणावयाचें नाहीं. परंतु मौलाना महंमदअलीसारखा पुढारी जेव्हां, अगदीं नीचांतला नीच मुसलमान असला तरी तो मला धर्मदृष्ट्या महात्मा गांधींपेक्षांहि अधिक वंदनीय आहे [ However pure Mr. Gandhi's character may be, he must appear to me, from the point of view of religion, inferior to any Mussalman, even though he be without character' ] असे उद्गार विनदिक्कत काढतांना आढळतो तेव्हां मन खरोखरच विषादानें भरून जातें आणि मुसलमान पुढाऱ्यांना संस्कृतीचे साधेसीधे अर्थ कळूं लागण्याइतकी धर्मातीतता त्यांच्यामध्यें कधीं काळीं उत्पन्न होईल का असा संशय उत्पन्न होतो. मी आशावादी आहें. मुसलमानांत धर्मातीत राष्ट्रीयत्व निर्माण होऊं शकेल असा मला विश्वास वाटतो. पण त्यापूर्वी या असल्या पुढाऱ्यांना अर्धचंद्र दिला पाहिजे एवढें निश्चित.

पण दुर्दैवानें असें एखादें दृश्य दृष्टीस पडण्याऐवजीं मुस्लिम लीगच्या राजकारणांतला नात्सीप्रेरित आततायीपणा दिवसें दिवस वाढीस लागल्याचीं व त्याला संघटित स्वरूप प्राप्त होत असल्याचीं लक्षणच वाढत्या प्रमाणावर दिसत आहेत. अडीच तीन कोटी मूठभरांची मातृभाषा चाळीस कोटी हिंदवासीयांची राष्ट्रभाषा व्हावी, किंवा बंकिमचंद्रांच्या 'वंदे मातरम्'ऐवजीं 'सारे जहाँसे आच्छा' हें महमद इक्बालकृत गीत राष्ट्रगीत म्हणून मान्य व्हावें, अगर राष्ट्रध्वजांत चॉंद या जातीय चिन्हाला सन्मानाचें स्थान मिळावें – या पुष्कळदां दमदाटीपूर्वक केलेल्या भरमसाट मागण्या म्हणजे मुस्लिम लीगच्या राजकारणांत शिरलेल्या आततायीपणाचीं कांहीं मामुली उदाहरणें होत. पण याहूनहि विक्षिप्त आणि खरोखर भयानक उदाहरणें काढून दाखवितां येतील. बंगालचे मुख्य प्रधान फजलुल हक सारख्यांचीं कांहीं भाषणें ऐका

किंवा ' दि स्टार ऑफ इंडिया' अगर 'आझाद' यांसारख्या लीगवादी पत्रांतील कांहीं मुक्ताफळें वाचा, म्हणजे कांहीं मुसलमानांचा आततायीपणा कोणत्या थराला जातो याची थोडी कल्पना येईल. सबंध हिंदुस्थानवर मुस्लिम अधिराज्य प्रस्थापित करावयाचें ही मनस्वी इच्छा या आततायीपणाच्या मुळाशीं आहे. फजलुल हक्क एकदां स्पष्टच म्हणाले कीं, सर्व मुसलमान एक झाले आणि त्यांनीं सांघिक सहकार्यानें कार्य केलें तर ते पुनः या देशाचे राज्यकर्ते होतील असा खात्रीनें संभव वाटतो.* हिंदु लोक बहुसंख्य आहेत याची आपल्याला भीति वाटत नाहीं, आपला अल्लावर विश्वास आहे, आणि अल्लाच्या कृपेनें या बहुसंख्याकांना आपण सहज नेस्तनाबूद करूं, असें सांगतांना या महान् मुसलमानानें हिंदूंना राजरोसपणें ' काफिर ' असें संबोधून आपल्या इस्लामी संस्कृतीचें एकदां नमुनेदार प्रदर्शन केलें होतें.‡ सबंध हिंदुस्थान एकदां पाकिस्तानच होतें, असें नुकतेंच एका मुस्लिम पुढाऱ्यानें मुंबईत जाहीर केलें, आणि या विशाल पाकिस्तानची पुनरपि प्रस्थापना करण्याची धमकीवजा घोषणा लीगचे कांहीं पुढारी अधुनमधून करीत असतात. हिंदुस्थानांत इंग्रजांचें आगमन होण्यापूर्वी आपण मुसलमानच राज्यकर्ते होतों, इंग्रजांनीं हा देश आपल्याकडून जिंकून घेतला व म्हणून इंग्रजांनंतर आपलीच सत्ता या देशावर प्रस्थापित झाली पाहिजे, ही भावना या प्रचाराच्या मुळाशीं आहे. या मनोवृत्तीचा अतिशय आक्षेपार्ह विलास कांहीं मुस्लिम वर्तमानपत्रांच्या रकान्यांत आढळून येतो. उदाहरणार्थ ' दि स्टार ऑफ इंडिया'नें एकदां उघड उघड लिहिलें कीं, ' [ मुस्लिम ] सिंह मेलेला नाहीं, त्याला फक्त झोंप लागलेली आहे, हें या लुप्या चुव्यांना [ म्ह. हिंदूंना ] दाखवून देण्याची वेळ आली आहे...त्यांना एकदां उत्तर दिलेंच पाहिजे. मग बंगाल कोणाच्या

* " If the Moslems united and worked as a team there was every likelihood of their ruling again this country."

‡ " I am not afraid of anyone but ' Allha ' and could face 22 crores of Hindus without moving a muscle. I have faith in God and I am confident that inspite of their large numbers I will put them down. It is the Moslems alone who have a future. The ' Kaffir ' has no future."

मालकीचा आहे हें त्यांना समजेल. त्यांना जरूर तो धडा शिकविला जाईल.' †
'आझाद' नांवाच्या पत्रानें ता. १० मार्च १९४१ च्या अंकांत छापलेल्या कवितेंत तर या धमक्यांना अत्यंत अभद्र स्वरूप प्राप्त झालेलें आढळतें. त्या कवितेंत मुसलमानांना मूर्तिपूजक हिंदूंवर चाल करून जावयास सांगितलें आहे.*

मवाली दादा असें ज्या नात्सींचें विचारपूर्वक वर्णन प्रो. लास्की यांनीं केलें आहे त्यांचें बुद्धिपुरस्सर अनुकरण करणारांच्या राजकारणास असें पद्धतशीर आततायीपणाचें [ डॉ. आंबेडकरांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे दादागिरीचें ] वळण लागणें साहजिकच आहे. कांहीं विवेकशील मुसलमानांना याची खंत वाटत असेल, पण जीना आणि मुस्लीम लीगचे इतर पुढारी कॉनरॅड हेनलाईन आणि सुडेटन जर्मन यांच्याकडे आत्मीयतेनें बोट दाखवितांनाच आढळतात. मात्र त्यांत त्यांची एक गफलत होत आहे, ती त्यांच्या लक्षांत आलेली दिसत नाहीं. हेनलाईन यांना एका प्रबल राष्ट्राच्या कर्तबगार धुरंधराचा पाठिंबा होता. हेनलाईनला विजय मिळाला तो नुसता पॅन-जर्मॅनिझमच्या घोषणेनें नव्हे, तर हर हिटलरचे सुसज्ज सैनिक त्याला मदत करण्यासाठीं जावयास तयार होते म्हणून. मुस्लिम लीगला हिटलरच्या पॅन-जर्मॅनिझमप्रमाणें पॅन-इस्लामिझम्चा आधार आहे. पण त्या तत्त्वप्रणालीला प्रत्यक्ष आकार देण्याची हिंमत असलेला एकादा मुस्लिम हिटलर इस्लामच्या क्षितिजावर उगवत असलेला आज तरी दिसत नाहीं.

---

[ † 'The time has com to show the little rats that the lion is not dead–only sleeping......they will have their answer. They will see to whom Bengal belongs, they shall be taught the lesson they need.' ]

* याहूनहि अधिक आक्षेपार्ह आणि संतापजनक उद्गार लीगवादी वृत्तपत्रांत प्रसिद्ध होत असतात. के. एम्. मुन्शी यांच्या Social Welfare पत्राच्या ता. २४ जुलै १९४१ च्या अग्रलेखांत याचे कांहीं निवडक नमुने आढळतील. मुस्लिम लीगवादी लोकांच्या या आततायी मनोवृत्तीचा अधिक पुरावा, बंगाल प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें The Dacca Riots Inquiry Committee ला सादर केलेल्या कैफियतींत आढळतो.

# ६ नवी जाणीव

इस्लामच्या क्षितिजावर एखाद्या मुस्लिम हिटलरचा उदय दिसत नसला तरी जीनांना त्याची फिकीर वाटत नाहीं. एक तर दुसऱ्या कोणत्या तरी हिटलरचें अनुयायित्व पत्करून दुय्यम पद स्वीकारणें त्यांच्या अहंमन्य स्वभावास मानवणार नाहीं. आणि दुसरें म्हणजे पाकिस्तान आलें काय अगर न आलें काय त्याची त्यांना पर्वा वाटत नाहीं. पाकिस्तान ही जीनांच्या बाबतींत सर्वस्वीं वैयक्तिक महत्त्वाकांक्षेची बाब झाली आहे. तें त्यांच्या नेतृत्वाचें अधिष्ठान आहे, आणि त्याचें अस्तित्व कल्पनेच्या साम्राज्यांत गुरफटून रहाण्यांतच त्यांच्या नेतृत्वाचें रहस्य आहे. १९१७ सालीं मँचेस्टर गार्डियन पत्राचे मि. वॉकर नांवाचे एक प्रतिनिधि हिंदुस्थानांत आले होते. त्यांनीं जीनांच्या स्वभावाचें जें निदान मि. एड्विन् मॉटेग्यू यांच्यापाशीं बोलून दाखविलें तें अगदीं अचूक आहे, आणि त्या स्वभावनिरीक्षणाच्या साहाय्यानें जीनांच्या पाकिस्तान-प्रचाराचा अर्थ आपणास बरोबर समजूं शकतो. मि. वॉकर यांच्या मतें, जीनांच्या सर्व धडपडींच्या मुळाशीं महत्त्वाकांक्षा आहे.* ही महत्त्वाकांक्षा म्हणजेच पुढारीपणाचा हपाप. जीनांचा पाकिस्तानवाद या हपापांतूनच उद्भवला आहे. अशा परिस्थितींत या मुस्लिम हेनलाईननें, त्याला एखाद्या इस्लामी हिटलरचा आधार न मिळाला म्हणून निराश होण्याचें काय कारण आहे?

---

* At the root of Jinnah's activities is ambition.–*Montague's Indian Diary*, P. 67

आणि जीनाच कशाला, ब्रिटिश साम्राज्यांतील अस्तित्वावर खूष असणाऱ्या जीनांसारख्या इतर सुधारणावादी मुस्लिम पुढाऱ्यांनाहि, पाकिस्तानला ब्रिटिश सरकारची मान्यता मिळण्याचा संभव नाहीं याची नीट जाणीव आहे, पण जीनांप्रमाणेंच त्याची त्यांना फिकीर वाटत नाहीं. मुस्लिम लीगनें आज संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास केलेला असतांना जीनाप्रभृति मुस्लिम पुढाऱ्यांना सुधारणावादी म्हणणें कांहीं लोकांना जरा कसेंसेंच वाटेल. पण जीनांचें सर्व राजकीय जीवन न्याहाळलें म्हणजे ब्रिटिश साम्राज्यांतून फुटून निघावयास अवश्य असलेलें क्रांतिकारकत्व त्यांजपाशीं संभवत नाहीं हें ध्यानांत येईल. १९१७ सालींच, आपण तरुण लोकांना क्रांतिकारक चळवळींपासून अलिप्त ठेवीत आहों अशी शेखी त्यांनीं उपर्युक्त मि. वॉकर यांजपाशीं मिरविली होती. [ *The Indian Diary, P. 67* ] त्यानंतर क्रांतिकारकत्वाचा साक्षात्कार त्यांना झाल्याचा कांहीं पुरावा उपलब्ध नाहीं. जीनांचे इतर साथीदार म्हणजे सर शिकंदर हयातखान, फझलुल हक्क, छतारीचे नबाब वगैरे, सरकारशीं हरेक प्रकारें सहकार्य करावयास आतुर झालेले सत्तालोलुप लोक. हे लोक पाकिस्तान–प्रस्थापनेचें क्रांतिकारक कार्य कसें काय पार पाडणार ? या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर आंबेडकरांच्या पुस्तकांत नाहीं. पाकिस्तानची प्रस्थापना ब्रिटिश साम्राज्यांत शक्य आहे आणि सरकार त्याला हरकत घेणार नाहीं, असें आपल्या ग्रंथाच्या उपोद्घातांत आंबेडकरांनीं म्हटलें असलें तरी, पाकिस्तानची मागणी ही खरोखर क्रांतिकारक मागणी आहे आणि पाकिस्तानची प्रस्थापना ही ब्रिटिश साम्राज्याच्या बाहेर संधान बांधूं पहाणारी अगर पुढेंमागें साम्राज्यास विघातक ठरणारी अशी क्रांतिकारक घटना आहे याची नीट उमज पडल्यामुळेंच बहुधा, पुस्तकाच्या अखेरच्या एका विभागांत, मुसलमान हे वसाहतीच्या स्वराज्यावर खूष रहावयास तयार नाहींत, त्यांना खरोखर संपूर्ण स्वातंत्र्य हवें आहे [ म्हणजे मुसलमानांच्या स्वातंत्र्यविषयक–आकांक्षा त्यांच्या पाकिस्तानप्रचाराशीं सुसंगत आहेत ] असें, मौलाना हजरत मोहनी प्रभृतींचे उद्गार उद्धृत करून, त्यांनीं सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. पण आंबेडकरांच्या पुस्तकांतला हाच भाग विशेष कच्चा वाटतो. आतां, हजरत मोहनी हे कट्टे स्वातंत्र्यवादी आहेत आणि

ते पक्के पाकिस्तानवादीहि आहेत, ही गोष्ट अगदीं खरी; पण आज पाकिस्तानच्या आंदोलनांत हजरत मोहनींना कितीसें महत्त्व आहे ? खरे पाकिस्तानवादी हे खरे स्वातंत्र्यवादीच असले पाहिजेत.– पण मुस्लिम लीगचे मान्यवर पुढारी स्वातंत्र्यवादी आहेत असें मानण्यास आधार नाहीं, व म्हणूनच पाकिस्तानविपयींची त्यांची आस्था अगर निष्ठा पूर्णपणें प्रामाणिक आहे असें म्हणतां येणार नाहीं.

यावर असा आक्षेप घेतां येईल कीं हे मुसलमान पुढारी जर निष्ठावंत पाकिस्तानवादी नाहींत आणि जीनांप्रमाणें पाकिस्तान ही जर त्यांची वैयक्तिक नेतृत्वाची बाब असूं शकत नाहीं तर हे लोक पाकिस्तानसाठीं अगदीं कसम खाऊन कोशिस कां करीत आहेत ? पाकिस्तानसाठीं जान कुर्बान करण्याच्या अस्मानी आरोळ्या हे लोक कां मारीत आहेत ? या प्रश्नाचें उत्तर अगदीं सोपें आहे. पाकिस्तान हा अखिल भारतीय भूमिकेवर ज्याप्रमाणें जीनांचा वैयक्तिक महत्त्वाकांक्षेचा प्रश्न आहे त्याचप्रमाणें प्रांतिक प्रमाणावर तो या इतर पुढाऱ्यांच्या नेतृत्वविपयक कांक्षांचा प्रश्न आहे. पण पाकिस्तान–प्रचाराचा एवढा एकच फायदा नाहीं. पाकिस्तानच्या जोरावर हिंदुस्थानांतील प्रातिनिधिक संस्थांत हिंदूइतकें म्हणजे निम्मेनिम प्रतिनिधित्व मिळवून देण्याची आशा ते बाळगतात. पाकिस्तानचें तात्त्विक अधिष्ठान म्हणजे द्विराष्ट्र–सिद्धान्त – म्हणजे हिंदुस्थान हें एक राष्ट्र नसून त्यांत हिंदु आणि मुसलमान अशीं दोन स्वतंत्र आणि सलग राष्ट्रें आहेत ही तात्त्विक विचारसरणी. ही विचारसरणी मान्य केली कीं भरतखंडाच्या कोणत्याहि व्यवहारांत हिंदूंच्या बरोबरीनें हक्क सांगण्याचा अधिकार मुस्लिम राष्ट्रीयत्वाच्या जोरावर मुस्लिम पुढाऱ्यांना मिळतो. हा हक्क संपादन करून घेण्यासाठीं पाकिस्तानचा सारा खटाटोप मुसलमानांनीं मांडला आहे, असें मला वाटतें. भरतखंडांत हिंदु आणि मुसलमान हीं दोन राष्ट्रें आहेत असें एकदां मान्य झालें कीं राष्ट्र या नात्यानें हिंदु व मुसलमान यांचे हक्क सारखे आहेत हें ओघानेंच ठरतें – व हेंच सिद्ध करून घेण्यासाठीं मुसलमानांची सारी धडपड आज सुरू आहे. मुसलमानांचा हा हक्क मान्य केला, म्हणजे हिंदुस्थानच्या व्यवहारांत पन्नास टक्के प्रतिनिधित्व मुसलमानांस द्यावयाचें कबूल केलें कीं

मुस्लिम पुढारी पाकिस्तानची भाषा तावडतोब सोडून देतील याबद्दल मला तरी शंका वाटत नाहीं.

पण ही पन्नास टक्क्यांची मागणी इतकी अरेरावीची आहे, किंबहुना गेल्या चाळीस-पन्नास वर्षांत हजार लटपटी करून मुसलमानांनीं इतकें भरमसाट प्रतिनिधित्व मिळविलें आहे कीं, यापुढें अधिक प्रतिनिधित्वाची भाषा बोलण्यापूर्वी पाकिस्तानसारखी कांहीं तरी विलक्षण सबब पुढें केली पाहिजे हें मुस्लिम पुढाऱ्यांनीं बरोबर ओळखलें, आणि या त्यांच्या ' नव्या जाणिवे 'तूनच पाकिस्तानचें आजचें भूत निर्माण झालें आहे. याचा अर्थ एवढाच कीं, पाकिस्तान ही मुसलमानांच्या गेल्या पन्नास वर्षांतील लोभी आणि असंतुष्ट राजकारणाचीच एक अवस्था आहे आणि हें त्याचें स्वरूप ध्यानांत आलें तरच तें भूत गाडून टाकण्याचा उपाय सांपडण्याचा संभव आहे.

मुसलमानांच्या या पन्नास वर्षांच्या राजकारणाचा इतिहास म्हणजे हिंदूंचें राष्ट्रीयत्व आणि त्यांतून निर्माण झालेलें औदार्य याचा मुस्लिम पुढाऱ्यांनीं पद्धतशीर रीतीनें घेतलेल्या गैरफायद्याचा इतिहास होय. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं झगडण्याचें काम त्यांनीं प्रायः हिंदु राष्ट्रवाद्यांकडेच सोपविलें. राष्ट्रीय आंदोलनांत त्यांनीं बहुतेक बेताचाच भाग घेतला. गांधींच्या असहकारतेंत तुर्की टोप्यांची जागा गांधी टोप्यांनीं बऱ्याच प्रमाणांत घेतली, पण याचें कारण असहकारितेचा खरा उगम तुर्की खिलाफतच्या मोहिमेंत होता, हिंदी स्वराज्याच्या चळवळींत नव्हता. डॉक्टर आंबेडकरांनीं हें भरपूर पुराव्यानिशीं सिद्ध केलें आहे [ पृ. १४४ ]. अशा रीतीनें मुस्लिम पुढारी राष्ट्रीय आंदोलनापासून जरी साधारणपणें अलिप्त रहात असले तरी या आंदोलनांतून नव्या सुधारणांचा उदय होण्याचीं चिन्हें दिसूं लागल्याबरोबर मुस्लिम मागण्यांच्या लठ्ठ याद्या घेऊन तयार होण्यास मात्र ते चुकत नसत. १८९२ सालीं सुधारणांची चाहूल लागण्यापूर्वी मुसलमानांची वृत्ति निराळी होती. १८५७ सालीं हिंदूंच्या खांद्याला खांदा लावून ते लढले होते. पण १८८५ सालीं नॅशनल कॉंग्रेसची स्थापना झाली आणि मुसलमानांना या संस्थेपासून दूर राखण्यासाठींच बहुधा त्यांना स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्याची शक्कल तेव्हांचे व्हाइसरॉय लॉर्ड

डफरिन् यांना सुचली, तेव्हांपासून मुस्लिम पुढाऱ्यांना मुसलमानांपुरते स्वतंत्र हक्क प्रस्थापित करून घ्यावयाची जी चटक लागली ती आजतागायत! १९०९ च्या मोर्ले–मिंटो कायद्यांत मुसलमानासाठीं स्वतंत्र मतदार संघाची योजना झाली आणि मुसलमान हे कायदेशीर रीत्या राजकीय अल्पसंख्याक ठरले. सन १९१६ सालीं होमरूल चळवळ झाली. तिला मुसलमानांचा पाठिंबा मिळविण्यासाठीं लो. टिळकप्रभृति काँग्रेस–पुढाऱ्यांनीं मुस्लिम लीगशीं लखनौ-करार केला. या करारान्वयें मुसलमानांना कायदेमंडळांत पुढील प्रमाणें नक्की प्रतिनिधित्व मिळालें असें सायमन कमिशनच्या रिपोर्टावरून समजतें:—†

| प्रांत | मुसलमानांची लोकसंख्या % | एकंदर सभासदांत मुसलमानांच्या प्रतिनिधित्वाचें प्रमाण % |
|---|---|---|
| पंजाब | ५५·२ | ४० |
| संयुक्त प्रांत | १४·३ | २५ |
| बंगाल | ५४·६ | ३० |
| बिहार–ओरिसा | १०·९ | १८·५ |
| मध्यप्रांत | ४·४ | ९·५ |
| मद्रास | ६·७ | १०·५ |
| मुंबई | १९·८ | २५·५ |
| आसाम | ३२·३ | ३० |
| मध्यवर्ति असेंब्ली | २४·० | २६ |

हें प्रतिनिधित्व मिळाल्यावर तरी मुसलमान राष्ट्रीय आंदोलनांत सामील होतील असें वाटलें होतें. असहकारितेंत ते शिरल्यानें ही अपेक्षा सफल झालीसें वाटलें, पण मुसलमानांचें लक्ष तेव्हां खिलाफतवर होतें, स्वराज्यावर नव्हतें. यानंतरच हिंदु–मुसलमानांच्या दंग्याचें युग सुरू झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. १९२७ सालीं सायमन कमिशनची नेमणूक झाल्यावर त्यावर बहिष्कार घाल-

† Quoted in Dr. Ambedkar's *The Thoughts on Pakistan*, P.188

ण्यांत मुसलमानांनीं हिंदूंच्या बरोबरीनें भाग घेतला, ही गोष्ट खरी आहे. पण त्यानंतर जीनासाहेबांचे जे चौदा [ वस्तुतः पंधरा ] मुद्दे निघाले त्यांना जातीयतेचाच उग्र दर्प येत होता. या चौदा [ म्ह० १५ ] मुद्यांत मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ मिळावा, त्यांच्या धार्मिक व सांस्कृतिक हक्कांचें संरक्षण व्हावें वगैरे जुन्या मुद्यांचा अंतर्भाव तर होताच, पण त्याचबरोबर [ १ ] पंजाब व बंगालमध्यें मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येनुसार कायदेशीर बहुमत मिळावें, [२] मध्यवर्ति व प्रांतिक मंत्रिमंडळांत मुसलमानांना ⅓ प्रतिनिधित्व मिळावें, [ ३ ] नोकऱ्यांत मुसलमानांना योग्य हिस्सा मिळावा, [ ४ ] सिंध प्रांत वेगळा करावा आणि सरहद्द व बलुचिस्तान यांना स्वायत्तता द्यावी, [ ५ ] शेषाधिकार [ 'रेसिड्युअरी पॉवर्स' ] प्रांतिक सरकारांकडे सोंपवावे, असे अगदीं नवीन मुद्दे होते. यांतील अखेरचा सोडून बहुतेक सर्व मुद्दे १९३५ च्या कायद्यांत मान्य केलेले आहेत. पंजाब व बंगाल प्रांतांत मुसलमानांचें सर्व सभासदांत बहुमत प्रस्थापित झालेलें नाहीं हें खरें, पण हिंदूंवर त्यांना निर्विवाद बहुमत मिळालें आहे; आणि इतर प्रांतिक कायदेमंडळांत त्यांचें प्रतिनिधित्व थोडेंबहुत वाढलेलें आहे असें आढळून येईल.

पण इतकें मिळूनहि मुस्लिम पुढाऱ्यांचें समाधान झालें नाहींच. त्यांच्या मागण्यांची कमान सारखी चढतीच राहिली. या सुमारास जीनांचें नेतृत्व मुस्लिम लीगच्या राजकारणांत पुनरपि प्रस्थापित झाल्यानें तिला नक्की काय हवें तें बाहेर येईना, पण जीना–जवाहरलाल पत्रव्यवहारावरून जो कांहीं अंदाज लागूं शकतो त्या अंदाजाप्रमाणें तेव्हां जीनांना [ १ ] त्यांचे पूर्वींचे चौदा [ म्ह० पंधरा ] मुद्दे, [ २ ] गोहत्त्येचा हक्क, [ ३ ] वंदे मातरम्‌चा त्याग [ ४ ] मुस्लिम लीगच्या ध्वजाला राष्ट्रध्वजाच्या बरोबरीनें मान्यता, [ ५ ] मुस्लिम लीगला मुसलमानाची एकमेव प्रातिनिधिक संस्था म्हणून मान्यता आणि [ ६ ] संयुक्त मंत्रिमंडळें, या मागण्यांना कॉंग्रेसकडून संमति हवी होती असें दिसतें. कॉंग्रेसच्या आणि हिंदु समाजाच्या राष्ट्रीयत्वावर घाला घालण्याचा हा पहिला प्रयत्न होता. यालाच पुढें पद्धतशीर स्वरूप प्राप्त झालें. १९३९ सालीं मुस्लिम लीगनें कायदेमंडळें, मंत्रिमंडळें, नोकऱ्या, सैन्य, आरमार,

सरकारी समित्या, स्थानिक स्वराज्य संस्था, इत्यादि सर्व खात्यांत ५० टक्के प्रतिनिधित्व मागितलें, आणि मुस्लिम प्रांत अगर व्यवहार यांमध्यें ⅔ मुस्लिम सभासदांची संमति मिळाल्याखेरीज कोणत्याहि रीतीचा फेरबदल होऊं नये असा आग्रह धरला. उर्दू ही राष्ट्रभाषा व्हावी ही मागणी याच खेपेस पुढें आली.

हिंदुस्थानच्या हरेक कारभारांत मुसलमानांना ५०% प्रतिनिधित्व हवें, या मागणीच्या समर्थनार्थ लीगचे पुढारी आपला द्विराष्ट्र–सिद्धान्त पुढें करीत असतात. भरत खंडांत हिंदूंप्रमाणेंच मुसलमान हे स्वतंत्र राष्ट्र आहेत, या सिद्धान्ताच्या जोरावर ते प्रत्येक ठिकाणीं पन्नास टक्के मुसलमान घुसडूं पहात आहेत. कायदेमंडळें, सरकारी खातीं, लष्कर वगैरे ठिकाणीं मुसलमानांना निम्मे-निम प्रतिनिधित्व तर हवेंच, पण कांहीं दिवसांनीं ट्रॅम–बसेस्–आगगाड्यांत, रस्त्यावर, थिएटर्स, सार्वजनिक उद्यानें, चौपाटीसारख्या जागा, वसतिगृहें इत्यादींत मुसलमानांसाठीं निम्मी जागा खास राखून ठेवावी–किंबहुना कोणत्याहि शहरांत अगर खेड्यांत निम्मीं घरें मुसलमानांसाठीं बांधावींत अशी मागणी लीगवाले केल्याखेरीज राहणार नाहींत, असें वाटतें. आज मुस्लिम लीगवाले पाकिस्तानच्या नांवावर फक्त मुस्लिम प्रांतावरच हक्क सांगत आहेत, पण हें पन्नास टक्के प्रतिनिधित्वाचें वेड असेंच वाढत राहिलें तर कांहीं दिवसांनीं लीगचे पुढारी तमाम हिंदुस्थानांतील सबंध स्थावर आणि जंगम जिंदगीवर पन्नास टक्के हक्क सांगण्यासाठीं पुढें सरसावल्याखेरीज रहाणार नाहींत असें म्हणणें भाग पडतें !

या सर्व डावपेंचांच्या मुळाशीं हिंदुस्थानांतील साऱ्या मुस्लिमेतर जनतेला गुलाम बनविण्याचें कुटिल कारस्थान आहे असा संशय उत्पन्न होतो. हिंदु लोक हे स्वभावतःच गुलामी वृत्तीचे आहेत, आपण त्यांच्यावर सहासातशें वर्षें राज्य करून हें सिद्ध केलेलें आहे, इंग्रजांनीं हिंदुस्थान जिंकला, पण तो मुसलमानांपासून, हिंदूंपासून नव्हे, तेव्हां इंग्रजांनंतर हिंदुस्थानांत स्वाभाविकपणें मुसलमानांचेंच आधिपत्य प्रस्थापित झालें पाहिजे–असा कांहीं मुस्लिम पुढाऱ्यांचा दावा आहे. या मनोवृत्तींतूनच १९२५ च्या सुमारास, पानिपतला

मराठ्यांचा विजय झाला कीं पराभव झाला हा वाद उपस्थित झाला होता. ज्या अर्थी या युद्धानें मुसलमानांच्या आक्रमणाला कायमचा आळा बसला त्या अर्थी या युद्धांत परिणामतः मराठ्यांचाच विजय झाला असें हिंदुपक्षाचें म्हणणें पडलें. त्यावेळीं नजिबाबादचे मौलाना अकबरशहा खान यांनीं या वादाचा निकाल लावण्याचा एक अखेरचा आणि बिनतोड म्हणून जो एक उपाय सुचविला तो या पुढाऱ्यांच्या मनोवृत्तीवर चांगलाच प्रकाश टाकतो. 'पानिपतला पुनः एकदां तुमची–आमची कसोटीची लढत होऊं द्या, म्हणजे आम्ही मुसलमान आमच्या शौर्याचा तडाका कसा आहे तो दाखवूं.' अशा अर्थाची सूचना त्यांनीं पंडित मालवीयांना अगदीं गंभीरपणें केली. मुस्लिम लीगचे आजचे पुढारी असा धोकेबाज डाव खेळण्यास तयार नसले तरी त्यांची मनोवृत्ति तीच आहे. राष्ट्राच्या सर्व कारभारांत पन्नास टक्के वांटा उपटून इतर सर्व मुस्लिमेतरांसकट बहुसंख्य हिंदूंना कायमचे अल्पसंख्याक बनविण्याचा त्यांचा डाव आहे, आणि हा डाव अगदींच निलाजरेपणाचा दिसूं नये, त्याला थोडीबहुत प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनीं त्याच्या समर्थनासाठीं द्विराष्ट्र-सिद्धान्त पुढें केला आहे. पण तें खरोखर द्वि-राष्ट्रीयत्व नसून अतिराष्ट्रीयत्व आहे. मुसलमानांचा हा हक्क मान्य केला आणि इतर अल्पसंख्याकांच्या पदरांत त्यांचें प्रतिनिधित्व टाकलें म्हणजे सत्तर टक्के हिंदूंना जेमतेम ३०–३५ टक्के प्रतिनिधित्वावर समाधान मानावें लागेल. म्हणजे सर्वसाधारण हिंदु मनुष्य राजकीय दृष्ट्या अर्धमेला होईल; राजकीय दृष्ट्या हिंदु जनतेला अर्धांग-वायु होईल. अगदीं राष्ट्रीय ऐक्याची कोणतीहि विशाल कल्पना घेतली तरी ही भरमसाट मागणी मान्य करणें शक्य नाहीं. कारण, हें राष्ट्रीयत्व नव्हे – ही राष्ट्रीयत्वाची विटंबना आहे. लीगच्या पुढाऱ्यांना हें समजत नसेल असें नाहीं. परंतु त्याची त्यांना पर्वा वाटत नाहीं. स्वतःला ते अतिराष्ट्रीय समजतात.

१९४० सालीं जीनांनीं, व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळांत कॉंग्रेस सामील

होत असेल तर ५० टक्के, होत नसेल तर निर्विवाद बहुमत मुसलमानांसाठीं मागितलें तेव्हां त्यांचें हें अतिराष्ट्रीयत्व चांगलेंच चवाठ्यावर आलें. मुसलमानच हिंदुस्थानचे स्वाभाविक राज्यकर्ते आहेत या समजुतींत या अतिराष्ट्रीयत्वाचा उगम आहे. असें हें कुजात अतिराष्ट्रीयत्व हिंदु अगर इतर मुस्लिमेतर यांच्या राष्ट्रीयत्वाबद्दल कितीसा आदर दाखवणार ?

हिंदी राष्ट्रीयत्वाला अशा रीतीनें बरबाद करावयास निघालेल्या या अतिराष्ट्रीयत्वाची यापुढें कितपत मिजास राखावयाची हाच आज राष्ट्रवाद्यांपुढें प्रश्न उभा आहे. याचें निःसंदिग्ध उत्तर कॉंग्रेस व इतर राष्ट्रीय पक्ष यांनीं दिलें पाहिजे.

## ७ पाकिस्तानचे विविध प्रकार

महमदअली जीना आणि मुस्लिम लीगवाले पाकिस्तानचें स्वरूप स्पष्ट करून सांगावयाचें कां टाळतात हें आतांपर्यंतच्या विवेचनावरून स्पष्ट झालेंच आहे. पण कांहीं फाजील उत्साही, अगर तात्त्विक प्रकृतीच्या, किंवा ज्यांना मुस्लिम लीगचा डाव समजलेला नाहीं अगर त्याची पर्वा वाटत नाहीं अशा कांहीं मुस्लिम गृहस्थांनीं आपापल्या योजना पुढें मांडल्या आहेत. त्यांचें स्वरूप थोडेंबहुत न्याहाळून पाहिलें पाहिजे, कारण एक तर त्यामुळें पाकिस्तान अस्तित्वांत येणारच असेल तर त्याची दिशा समजेल, आणि दुसरें म्हणजे ज्याअर्थी या योजना आत्यंतिक असल्या तरी फाजील आत्यंतिक नाहींत त्याअर्थी कांहीं भोळेभाबडे तर कांहीं मतलबी लोक त्यांचा स्वीकार करण्याचा संभव आहे.

पाकिस्तानची अगदीं पहिली योजना रहमतअली नांवाच्या एका गृहस्थांनीं मांडली. तेव्हां अर्थात् पाकिस्तानला मुस्लिम लीगनें सध्यां प्राप्त करून दिलें आहे तसें मतलबी स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. मि. रहमतअल्ली, एम्. ए., एल्‌एल्. बी., हे त्या बाबतींत अगदीं प्रामाणिक होते असेंच म्हटलें पाहिजे. पाकिस्तानची कल्पना प्रथम महमद इक्बाल यांनीं मांडली असली तरी रहमतअल्ली यांनाच या चळवळीचे खरे प्रस्थापक म्हटलें पाहिजे. त्यांनीं भरतखंडाचे पाकिस्तान आणि ‘ हिंदुस्थान ’ असे दोन भाग कल्पिले, आणि पाकिस्तानांत पंजाब, सरहद्द प्रांत, काश्मीर, सिंध आणि बलुचिस्तान असा पांच

प्रांतांचा अंतर्भाव केला. बाकी सर्व प्रांत त्यांनीं ‘ हिंदुस्थानां ’त समाविष्ट केले. या एकाच गोष्टीवरून त्यांच्या योजनेंत मतलबी राजकारणापेक्षां प्रामाणिक इस्लामभक्ति अधिक होती असें दिसून येईल. ह्या योजनेचीं पत्रकें त्यांनीं वर्तुळ परिषदेच्या सभासदांना वांटलीं, व आंतून ब्रिटिश सरकारची मान्यता मिळविण्याचा प्रयत्न केला. पण सरकारला हा, जुन्या इस्लामी साम्राज्याच्या पुनरुज्जीवनाचा एक प्रयत्न वाटला, आणि त्यानें त्या योजनेस स्पर्शहि करण्याचें नाकारलें.

त्यानंतर कांहीं कालानें मुस्लिम लीगनें पाकिस्तानच्या चळवळींत वारा भरला. आणि कांहीं मुस्लिम विचारवंतांना पाकिस्तानच्या निश्चित योजना सादर करण्याची आवश्यकता वाटली.

यांतली एक योजना ‘ पंजाबी ’ या टोपण नांवाच्या गृहस्थांनीं आपल्या Confederacy of India या पुस्तकांत मांडली आहे. हिंदुस्थानचे पांच फेडरेशन्समध्यें विभाग पाडून हे सर्व विभाग एका कॉन्फेडरेशनमध्यें समाविष्ट करावे अशी या सद्‌गृहस्थांची योजना आहे. हीं पांच फेडरेशन्स अशीं—

[ १ ] दि इंडस रीजन्स फेडरेशन [ इंदस्तान ]—या फेडरेशनमध्यें [ कांहीं हिंदु विभाग सोडून ] पंजाब, सिंध, सरहद्द, बलुचिस्तान, भावलपूर, आंब, दिर स्वात, चित्रल, खानपुर, कालट, लास बेला, कपुर्थळा आणि मालरकोटला अशा प्रादेशिक घटकांचा [ units ] समावेश होतो. या फेडरेशनमध्यें ८२ टक्के मुसलमान, ६ टक्के शिख आणि ८ टक्के हिंदु, अशी लोकसंख्या राहील.

[ २ ] दि हिंदु इंडिया फेडरेशन [ हिंदुस्तान ]—या फेडरेशनमध्यें संयुक्त प्रांत, बिहार, बंगालचा कांहीं भाग, ओरिसा, आसामचा कांहीं भाग, मद्रास, मुंबई आणि कांहीं संस्थानें समाविष्ट होतील. लोक संख्याः ८३·७२% हिंदु आणि ११% मुसलमान.

[ ३ ] दि राजस्तान फेडरेशन [ राजस्तान ]—यामध्यें रजपुताना आणि मध्य हिंदुस्थानमधील निरनिराळ्या संस्थानांचा समावेश होतो. लोकसंख्याः ८६·३९% हिंदु आणि ८·०९% मुसलमान.

[ ४ ] दि डेक्कन स्टेट्स् फेडरेशन [ दख्खन ]–यांत हैद्राबाद, म्हैसूर आणि बस्तुर हीं संस्थानें येतात. लोकसंख्या : ८५'२८% हिंदु आणि ८'९९% मुसलमान.

[ ५ ] दि बेंगॉल फेडरेशन [ वंगाल ]–यांत पूर्व वंगाल, गोलपारा, सिल्हेट, त्रिपुरा आणि इतर संस्थानें यांचा अंतर्भाव होतो. लोकसंख्या [ अदमासें ]: ६६'१% मुसलमान आणि ३३'९% हिंदु.

' पंजाबी ' यांच्या या योजनेप्रमाणें प्रत्येक फेडरेशनवर एक गव्हर्नर जनरल राहील. याच्या हाताखालीं निरनिराळ्या घटकां[ units ]चे गव्हर्नर असतील. हा गव्हर्नर जनरल कॉनफेडरल सत्तेला म्हणजे व्हाइसरॉयला जबाबदार राहील. निरनिराळ्या खात्यांची मि. ' पंजाबी ' यांनीं जी विभागणी आणि वांटणी केली आहे ती पाहिली म्हणजे त्यांच्या योजनेचा खरा अर्थ ध्यानांत येऊं लागतो. परराष्ट्रीय संबंध, संरक्षण, पाणीपुरवठा, संस्थानांचे हक्क इत्यादि जे प्रश्न आपण अगदीं साहजिकपणें मध्यवर्ति सत्तेकडे सोंपवितों ते, ' पंजाबी ' यांच्या मतें, फेडरल [ कॉन्फेडरल नव्हे ] सत्तेच्या स्वाधीन करावेत.

आपली ही योजना आततायी आहे हें ' पंजाबीं'ना बिल्कुल कबूल नाहीं. एखाद्या कुटुंबामध्यें वांटप झालें तरी जसे त्यांतील मंडळीचे सारे संबंध संपुष्टांत येत नाहींत तशी ही विभागणी आहे असें ते म्हणतात. हिंदुस्थानचीं शकलें करावीं अगर ' पाकिस्तान'चे संबंध बाहेरील राष्ट्रांशीं जोडावे हें आपल्याला संमत नाहीं असें त्यांचें सांगणें आहे.* आपण हिंदु नसलों तरी हिंदुस्थानचेच सुपुत्र आहोंत, व म्हणून आपल्या योजनेला 'पाकिस्तान' असें नांव न देतां फक्त ' इंदस्तान ' असें आपण म्हणत आहोंत, असें ते बजावतात. याबद्दल त्यांचे आभार मानावयास हरकत नाहीं; पण,

* 'We should not be inspired by any such extra-territorial ideals, ambitions, or affinity. We should be separationists–cum–confederationists, and, if the Hindus disagree with the idea of a confederacy...then we should be simply separationists.'–Quoted in Rajendra Prasad's *Pakistan*, *P. 15.*

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्याला फार काल मुस्लिमेतर जगांत राहणें शक्य नाहीं, सर्व जगभर इस्लामी क्रांति घडवून आणणें भाग आहे असें जें आपण आपल्या पुस्तकाच्या २६९–७९ या पृष्ठांत म्हणतां त्याचा अर्थ काय, असें मात्र या पैगंबरभक्ताला खडसावून विचारलें पाहिजे.

ही दूरची बात सोडली तरी ही योजना अनेक दृष्टींनीं आक्षेपार्ह ठरते. प्रथम म्हणजे या योजनेप्रमाणें हिंदुस्थानांत मध्यवर्ति आणि प्रांतिक यांच्या ऐवजीं कॉन्फेडरल, फेडरल आणि प्रांतिक अशीं तीन प्रकारचीं सरकारें प्रस्थापित करावीं लागल्यानें राजकारभाराचा आधींच बेसुमार वाढलेला खर्च भरमसाट होईल. दुसरें असें कीं, हिंदुस्थानची निरनिराळ्या फेडरेशन्समध्यें विभागणी करतांना कोणतींहि तर्कशुद्ध तत्त्वें वापरलीं आहेत असें वाटत नाहीं. उदाहरणार्थ, इंदस्स्तानमध्यें मुस्लिम, शिख आणि हिंदु असे भेद तर शिल्लक रहातातच, पण त्या एका फेडरेशनमध्यें पांच भाषा बोलल्या जातात. तीच स्थिति 'हिंदुस्थान'ची. हें 'पंजाबी'कृत 'हिंदुस्थान' म्हणजे प्रमाण, विस्तार आणि आकार या दृष्टीनें आचरटपणाचा एक नमुना ठरेल. या फेडरेशनमध्यें इतर फेडरेशन्सचे फांटे आणि फराटे घुसल्यामुळें त्याला फारच विचित्र स्वरूप प्राप्त झालें आहे. तसेंच, बस्तुर संस्थानाला ओरिसापासून तोडून हैद्राबादला कां जखडण्यांत आलें आहे हेंहि समजत नाहीं. या योजनेविरुद्ध तिसरा आक्षेप असा घेतां येतो कीं, तिच्यांत हिंदु आणि मुस्लिम यांखेरीज इतरधर्मीयांचा विचारच केलेला आढळत नाहीं. तेहि बिचारे हिंदुस्थानांतच जन्मलेले आहेत, आणि ते अगदीं अगतिक [ hopeless ] अल्पसंख्याक असले तरी त्यांनाहि हिंदुस्थानांत सन्मानानें आणि समृद्धीनें रहाण्याचा हक्क आहे, याचा या जनाबांना अजिबात विसरच पडलेला दिसतो. चौथा आक्षेप असा कीं, या योजनेच्या निर्मात्याला लोकसंख्येच्या अदलाबदली [ exchange of population ] ची कल्पना सहन होत नसल्यानें दरेक फेडरेशनमध्यें हिंदु व मुस्लिम कोणत्या ना कोणत्या तरी त्रासदायक प्रमाणांत शिल्लक उरणारच. म्हणजे या योजनेप्रमाणें हिंदुमुसलमानांचा प्रश्न सुटत नाहीं तो नाहींच ! मग हा इतका खटाटोप कशाला ? आणि मग या सोज्वळ दिसणाऱ्या योजनेच्या मुळाशीं खरोखर ती

इस्लामी क्रांतीची अंतिम इच्छा आहे असा जर संशय एखाद्यानें व्यक्त केला तर त्याची काय चूक ? शिवाय, हिंदुस्थान हा एक सलग असा देश नसून एक चित्रविचित्र खंड आहे, आणि या खंडांत हिंदु आणि मुसलमान अशीं दोन स्वतंत्र राष्ट्रें आहेत हे जे दोन तात्त्विक सिद्धान्त या योजनेच्या मुळाशीं आहेत, ते किती बिनबुडाचे आहेत हें आपण मागें पाहिलेंच आहे.

सैद झाफरूल हसन आणि मोहमद अफझुल हुसेन काद्री, या अलिगड विश्वविद्यालयाच्या दोन प्रोफेसरांनीं पाकिस्तानची दुसरी एक योजना आंखली आहे, तिच्या बुडाशीं देखील हे दोन बिनबुडाचे सिद्धान्तच आहेत; आणि मुसलमानांना बहुसंख्याक हिंदूंच्या 'तावडींतून' सोडविण्याची विचित्र इच्छाच त्या योजनेची प्रेरकशक्ति आहे. ह्या प्रोफेसरांच्या योजनेप्रमाणें हिंदुस्थानचे अनेक खंड पडतात. ते असे.:—

[ १ ] पाकिस्तान—म्हणजे पंजाब, सरहद्द, सिंध, बलुचिस्तान, काश्मिर, मंडी, चांभा, कपुर्थळा, मालेरकोटला, चित्रल, बिलासपूर, भावलपूर वगैरे. [ मुसलमान ६०·३% ]

[ २ ] बंगाल ( हौरा व मिद्नापूर सोडून ), पूर्निआ, सिल्हेट. [ मुसलमान ५७% ]

[ ३ ] हिंदुस्थान—म्हणजे हैद्राबाद, पाकिस्तान, बंगाल वगैरे भाग सोडून उरलेला भरत खंडाचा भाग. [ मुसलमान ९·७% ]

[ ४ ] हैद्राबाद ( वऱ्हाड व कर्नाटक धरून ). [ मुसलमान ७·४% ]

[ ५ ] दिल्ली, मीरत, रोहिलखंड आणि अलीगड. [ मुसलमान २८% ]

[ ६ ] मलबार आणि दक्षिण कानडा. [ मुसलमान २७% ]

याशिवाय ५० हजार अगर अधिक वस्तीचीं शहरें यांना डान्झिगप्रमाणें 'स्वायत्त नगरें' गणण्यांत यावें.

या प्रोफेसर-द्वयांच्या योजनेप्रमाणें पाकिस्तान, बंगाल आणि 'हिंदुस्थान' हीं तीन 'राष्ट्रें' पुढील तत्त्वांवर–म्हणजे ( १ ) परस्परता, ( २ ) पाकिस्तान–बंगाल ही मुसलमानांची व 'हिंदुस्थान' ही हिंदूंची मातृभूमि, ( ३ ) 'हिंदु-

स्थानां 'तील मुसलमान हें एक अल्पसंख्याक राष्ट्र आहे, ( ४ ) स्वतंत्र मतदार-संघ आणि लोकसंख्येनुसार प्रतिनिधित्व, ( ५ ) मुसलमानांची एक अधिकृत राजकीय संस्था ही हिंदुस्थानांतील मुसलमानांची एकमेव प्रातिनिधिक संस्था राहील, या तत्त्वांवर परस्पर सहकार्याचे आणि मैत्रीचे तह करतील. ग्रेट ब्रिटनशीं यांचे दोस्तीचे तह जे व्हावयाचे ते अगदीं स्वतंत्रपणें होतील.

हैद्राबाद संस्थानची ऐतिहासिक परंपरा आणि राजकीय प्रतिष्ठा अगदीं स्वतंत्र असल्यानें तो एक [ या प्रोफेसर–द्वयांच्या मतें ] अगदीं स्वतंत्रच खंड ठरतो. ऐतिहासिक परंपरेला धरून ते वऱ्हाड व कर्नाटक यांना हैद्राबादच्या वशांत कोंबूं पहातात. या भागांत मुसलमान हे ७·४% इतके अल्पसंख्याक असूनहि हे विद्वान् प्रोफेसर त्याला मुस्लिम प्रदेश म्हणण्याचा आग्रह धरतात, यावरून त्यांच्या धर्मांधतेखेरीज दुसरें कांहींहि सिद्ध होत नाहीं.

कांहीं किरकोळ तपशील सोडला तर ही योजना ' पंजाबी ' यांच्या योजने-सारखीच व तशीच आक्षेपार्ह वाटते. कांहीं दृष्टींनीं तिचें स्वरूप अधिक आक्षे-पार्ह आहे. उदाहरणार्थ, ' डान्झिग 'प्रमाणें ते हिंदुस्थानांत अनेक ' स्वायत्त नगरें ' निर्माण करूं इच्छितात. डान्झिगनें सांप्रतचें युद्ध सुरू केलें – हीं अनेक हिंदी डान्झिगें काय काय गोंधळ माजवतील कालच जाणे ! नात्सींकडून स्फूर्ति घेण्याची मुसलमानांची प्रवृत्ति एवढ्या दारूगोळ्यावर हवा तो भडका उडवूं शकतील !

अलीगडच्या या प्रोफेसर-द्वयांचा मुस्लिम-पक्षपातीपणा अगदीं झगझगीत आहे. 'हिंदुस्थानां'तल्या मुसलमानांना अल्पसंख्याक मुस्लीम राष्ट्र, म्हणजे पाकिस्तान–बंगालमधील मुस्लिम राष्ट्राची एक शाखा मानावी असें हे विद्वान् सांगतात; पण पाकिस्तान–बंगालमधील हिंदूंना मात्र ते राष्ट्रीयत्वाचे अधिकार द्यावयास तयार नाहींत. तसेंच, मुसलमानांची एक अधिकृत संस्था ' हिंदुस्थानां 'तील मुसलमानांची प्रातिनिधिक समिति मानावी असें ते सांगतात, पण अशी कांहीं सवलत आपण मुस्लिम राष्ट्रांतील हिंदूंना देत नाहीं, याची त्यांच्या जिवाला खंत वाटत असल्याचें आढळून येत नाहीं. ' हिंदुस्थानां 'तल्या मुसलमानांचें प्रातिनिधित्व स्वीकारूं पहाणारी ही संस्था हिंदु राष्ट्रांत इस्लामी क्रांतीचीं कार-

स्थानें करील हें जाणावयास कल्पनाशक्तीस फारसा ताण देण्याचें मुळींच कारण नाहीं.

हैद्राबादचे डॉ. लतिफ आणि पंजाबचे सर शिकंदर हयात खां यांच्या योजना इतक्या आततायी नसल्या तरी त्या अशाच आक्षेपार्ह आहेत. दोघांच्याहि योजनांची उभारणी हिंदुस्थानांत नवीन खंड (zones) पाडून केलेली आहे. डॉ. ए. लातिफ यांच्या योजनेप्रमाणें हिंदुस्थानचे, [ १ ] उत्तर–पश्चिमखंड ( सिंध, बलुचिस्तान, पंजाब, सरहद्दप्रांत, खैरपूर आणि भावलपूर ). [ २ ] उत्तर–पूर्वखंड (पूर्व बंगाल आणि आसाम) [ ३ ] दिल्ली–लखनौखंड [ ४ ] दख्खन ( हैद्राबाद, वऱ्हाड, आणि कूर्नेल ते मद्रासपर्यंत पसरणारी एक पट्टी ) असे चार मुस्लिम खंड पडतात; आणि ( १ ) पश्चिम बंगाल ( २ ) ओरिसा ( ३ ) बिहार–युक्तप्रांत ( ४ ) राजपुताना संस्थानें ( ५ ) गुजरात ( ६ ) महाराष्ट्र ( ७ ) कन्नड ( ८ ) तामील ( ९ ) आंध्र ( १० ) मलबार ( ११ ) काश्मिर असे अकरा हिंदु खंड पडतात. या योजनेप्रमाणें हिंदु खंडांतील मुसलमानांची व मुस्लिम खंडांतील हिंदूंची शक्य तितक्या प्रमाणावर अदलाबदल करून या खंडांना शक्य तितकें निर्भेळ स्वरूप दिलें जाईल.

मुस्लिम खंडांतील हिंदूंना व हिंदु खंडांतील मुसलमानांना, तसेंच इतरधर्मीय अल्पसंख्याकांना व अस्पृश्यांना शक्य तितकें धार्मिक व सांस्कृतिक स्वातंत्र्य द्यावें व त्यांच्या पवित्र स्थानांचें संरक्षण व्हावें, अशा प्रकारची कायदेशीर योजना डॉ. लतिफ यांच्या योजनेंत आहे.

मध्यवर्ति सरकारकडे जितकी अधिक सत्ता असेल तितक्या प्रमाणांत देशांतील बहुसंख्याकांचें राजकीय महत्त्व वाढतें. म्हणून अल्पसंख्याकांच्या पाठिराख्यांचा प्रांतिक स्वायत्ततेबद्दल कटाक्ष असतो. डॉ. लतिफ यांच्या योजनेंतहि प्रांतिक स्वायत्ततेला शक्य तितका अवसर आहे. अल्पसंख्याकांच्या हितरक्षणाचा आणखी एक मार्ग म्हणजे कायम स्वरूपाचें सर्वपक्षीय मंत्रिमंडळ प्रस्थापित करणें. डॉ. लतिफांच्या योजनेप्रमाणें मध्यवर्ति व प्रांतिक मंत्रिमंडळें सर्वपक्षीय आणि कायम स्वरूपाचीं असतील. निरनिराळ्या खंडांत विभाग-

लेल्या समसंस्कृति लोकांची एकी शक्य तितकी कायम राहावी म्हणून समसंस्कृतीच्या खंडांत वाढतें सहकार्य असावें आणि त्यांनीं शक्य तों एकाच प्रकारचे कायदे पास करावे असें ते सुचवितात. यासाठीं 'रीजनल' अगर 'झोनल' बोर्डांची प्रस्थापना करावी असें त्यांचें म्हणणें आहे.

मुस्लिम जनतेच्या हितरक्षणासाठीं डॉ. लतिफ यांनीं अर्थात् याहूनहि काळजीपूर्वक व्यवस्था सुचाविली आहे. स्वतंत्र मतदारसंघ, सध्यांचें प्रतिनिधित्वाचें प्रमाण वगैरे अस्तित्वांत असलेले खास अधिकार त्यांना हवेतच, पण त्याच बरोबर 'झोनल' बोर्डांवर मुसलमानांना योग्य प्रतिनिधित्व मिळावें असें सुचविण्याचीहि दक्षता त्यांनीं बाळगिली आहे. धार्मिक, सांस्कृतिक वगैरे बाबतींतला कायदा मुसलमानांनींच करावा, त्याचा निवाडाहि मुसलमान न्यायाधीशांनींच करावा, पब्लिक सर्व्हिस कमिशनवर मुसलमानांना पुरेसें प्रतिनिधित्व असावें, मुसलमानांच्या स्वतंत्र शैक्षणिक आणि आर्थिक समित्या असाव्या वगैरे अनेक कल्पना त्यांनीं, कांहीं उसनवट तर कांहीं स्वतःच्या डोक्यांतून काढल्या आहेत.

या योजनेचा मोठा दोष म्हणजे लोकसंख्येची अदलाबदल. यामुळें ही योजना जवळजवळ अशक्य झाली आहे. जन्मभूमीबद्दल वाटणारी स्वाभाविक ओढच या अदलाबदलीविरुद्ध येते असें नव्हे, तर ती करतांना नुसतीं डोकीं मोजूनच भागत नाहीं तर त्या डोक्यांवरील जंगम जिंदगीचा आणि त्या डोक्यांच्या पायांखालील स्थावर इस्टेटीचाहि विचार करावा लागतो; आणि कोणत्याहि खंडांत मुस्लिम [ अगर हिंदु ] जनतेचें जेवढें प्रमाण पडेल तेवढेंच मुस्लिम [ अगर हिंदु ] जिंदगीचें पडण्याचा सुतराम् संभव नसल्यानें हा प्रश्न सोडवतांना डोक्यांच्या अदलाबदलीबरोबरच इस्टेटीच्या अदलाबदलीचाहि प्रश्न उपस्थित होतो. 'हिंदुस्थानां'त मुसलमानांची संख्या जास्त; पण त्या प्रमाणांत इस्टेट कमी, आणि मुस्लिम प्रांतांत हिंदूंच्या संख्येच्या मानानें त्यांची जिंदगी कितीतरी अधिक, अशी वस्तुस्थिति असल्यानें लोकसंख्येच्या अदलाबदीनें हिंदु-मुसलमानांचा प्रश्न सोडवूं पहाणें केवळ अशक्य होऊन बसलें आहे.

सध्यांची संस्थानांची परिस्थिति आहे तशीच राहील अशी समजूत या योजनेंत

भिनलेली आहे, हा तिचा दुसरा एक दोष होय. हिंदी स्वराज्याचा प्रश्न हा निव्वळ ब्रिटिश हिंदुस्थानपुरता मर्यादित नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानच्या बरोबरीनें संस्थानी स्वराज्याचा विकास झाला तरच हिंदुस्थानचें स्वातंत्र्य अर्थपूर्ण ठरेल.

हिंदूंच्या दृष्टीनें तर ही योजना कांहीं बाबतींत फारच आक्षेपार्ह आहे. पहिला प्रश्न असा कीं, हैद्राबाद हें मुस्लिम खंड कसें होतें ? हैद्राबादवर एकदां केव्हां ऐतिहासिक योगायोगानें मुसलमानांनीं प्रभुत्व प्रस्थापित केलें म्हणून तो दुर्दैवी प्रांत सतत कल्पान्तापर्यंत मुस्लिमच गणला गेला पाहिजे अशी सर्वसाधारण मुस्लिम पुढाऱ्यांची समजूत झालेली दिसते ! मुसलमानांची ही समजूत पार मोडून टाकली पाहिजे. दुसरें असें कीं, मद्रासपर्यंतची पट्टी आणि मद्रास शहर हैद्राबादच्या स्वाधीन कां करावयाचें ? तसेंच कलकत्त्याभोंवतालचा हिंदु प्रदेश मुस्लिम खंडांत कां ? आणि दिल्ली-लखनौ प्रांतांत मुसलमानांचें बहुमत कोठें आहे ? यावरून एवढेंच सिद्ध होतें कीं, ज्या डॉ. लतिफना जयकरांनीं एका सभेंत patriot [ देशभक्त ] असें संबोधिलें होतें त्यांनाहि इस्लामी भिंगें लावल्याखेरीज विचार करतां येत नाहीं. त्यांनीं मुसलमानांच्या हितरक्षणासाठीं जे कांहीं किरकोळ उपाय सुचविले आहेत त्यांचा विचार करतां येईल, पण त्यांची एकंदर योजना [ आर्थिक दृष्ट्या एखादा चमत्कार घडून शक्य ठरली तरी ] टाकाऊच ठरवावी लागेल.

सर शिकंदर यांनीं आपली योजना Outlines of a Scheme of Indian Federation या पुस्तिकेंत प्रसिद्ध केली आहे. या पुस्तिकेच्या नांवावरूनच ध्यानांत येईल कीं, या योजनेचा हेतु १९३५च्या घटनाकायद्यांतील उणिवा दूर करण्याचा आहे. डॉ. लतिफ यांच्या योजनेप्रमाणेंच या योजनेंत हिंदुस्थानचे खंड [ zones ] पाडलेले आहेत. पण त्यांची संख्या कमी आहे:—

[ १ ] आसाम, बंगाल (कांहीं भाग वगळून), सिक्किम आणि बंगाली संस्थानें.
[ २ ] बिहार-ओरिसा ( अधिक बंगालचा कांहीं भाग ).
[ ३ ] युक्त प्रांत आणि युक्त प्रांतांतील संस्थानें.
[ ४ ] मद्रास, त्रावणकोर, कूर्ग वगैरे.

[ ५ ] मुंबई, हैद्राबाद, पश्चिम हिंदुस्थानांतलीं संस्थानें, म्हैसूर आणि मध्यप्रांतीय संस्थानें.

[ ६ ] रजपुत संस्थानें (बिकानेर व जैसलमेर वगळून) ग्वाल्हेर, मध्य हिंदुस्थानांतली संस्थानें, बिहार-ओरिसांतली संस्थानें, मध्यप्रांत-वऱ्हाड.

[ ७ ] पंजाब, सिंध, काश्मिर, जैसलमेर.

डॉ. लतिफ यांनीं पाडलेल्या खंडांशीं शिकंदर—योजनेचा आणखी एक असा फरक आहे कीं हे खंड सांस्कृतिक दृष्टीनें पाडलेले नाहींत, तर प्रादेशिक दृष्टीनेंच पडलेले आहेत. म्हणजे हिंदुस्थानांतील विद्यमान प्रांतभेदांची ती एक पुनर्रचना आहे. एवढा एकच त्यांचा गुण म्हणतां येईल. पण या पुनर्रचनेच्या मुळाशीं भाषावार प्रांतरचनेसारखें एखादें तर्कशुद्ध तत्त्व दिसत नाहीं.

या योजनेप्रमाणें प्रत्येक खंडाला एक प्रादेशिक कायदेमंडळ असेल. या कायदेमंडळाच्या एकंदर ३७५ सभासदांचें मिळून फेडरल [ मध्यवर्ति ] कायदेमंडळ होईल. त्यांत मुसलमानांना $\frac{1}{3}$ प्रतिनिधित्व देण्यांत यावें. हिंदुस्थानांतील सर्व खात्यांची प्रांतिक, प्रादेशिक [ रीजनल ] आणि फेडरल [ मध्यवर्ति ] अशी विभागणी करून त्यांचे परस्परांचे संबंध सुस्पष्ट करावे.

व्हाइसरॉयच्या [ फेडरल ] कार्यकारी मंडळांत कमींत कमी सात व अधिकाधिक अकरा मंत्री असावेत. त्यापैकीं $\frac{1}{3}$ मुसलमान असावेत व निदान दोन संस्थानांचे असावेत. परराष्ट्रीय संबंध व संरक्षण हीं खातीं ताबडतोब लोकनियुक्त मंत्र्यांकडे द्यावीं अशी मागणी करण्याइतकी ‘ अधीरता ’ सर शिकंदरांना लागलेली दिसत नाहीं. त्यासाठीं पंधरावीस वर्षांचा संक्रमणकाल त्यांना मान्य आहे !

प्रादेशिक कायदेमंडळाची निवडणूक प्रांतिक कायदेमंडळांच्या सभासदांतून अप्रत्यक्षपणें व्हावी असें शिकंदरांना वाटतें. अप्रत्यक्ष निवडणुकीनें कांहीं विशिष्ट कंपूंच्या हातांत सत्ता जाते याची भीति त्यांना वाटत नाहींसें दिसतें. संस्थानचे सर्व प्रतिनिधि लोकनियुक्त असावेत ही मामुली मागणी करण्याइतका लोकशाहीचा संचार या खानदानी मुत्सद्याच्या अंगांत झालेला दिसत नाहीं !

अल्पसंख्याकांचे आणि संस्थानांचे हक्क, प्रांतिक स्वायत्तता, अल्पसंख्याकांचे

संस्कृतिविशेष इत्यादींच्या संरक्षणासाठीं खास तरतूद कायद्यांत करण्यांत यावी असा सर शिकंदरांचा कटाक्ष आहे.

या त्यांच्या मागण्यांचें आश्चर्य वाटत नाहीं. पण हिंदुस्थानच्या सैन्यांत ता. १ जानेवारी १९३७ रोजीं जें जातीय प्रमाण होतें तेंच नेहमीं कायम रहावें असा कायदा करण्याची भाषा जेव्हां ते बोलतात तेव्हां मात्र शिकंदरांच्या हेतू-बद्दल आणि न्यायबुद्धीबद्दल संशय उत्पन्न झाल्याखेरीज रहात नाहीं. सध्यां हिंदी सैनिकांत मुसलमानांचें प्रमाण एकसारखें वाढत आहे, आणि बरेंचसे सैनिक पंजाबमधले आहेत, या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर शिकंदरांची ही सूचना न्याहाळली म्हणजे त्यांतून एक निराळाच अर्थ प्रतीत होऊं लागतो. १९२१ सालीं हिंदी सैन्यांतील मुसलमानांचें प्रमाण २४·९% होतें, १९३० मध्यें तें ३०% पर्यंत वाढलें आणि आतां तर तें ५० टक्क्यांहून अधिक आहे असें म्हणतात. शिकंदरांना, हें भरमसाट प्रमाण कायम ठेवून हिंदी सैन्यांत मुसलमानांचें व पंजाबचें वर्चस्व कायम राखावयाचें आहे. यामुळें पंजाबचे आर्थिक व राजकीय असे दोनहि प्रकारचे फायदे होतात. हिंदी सैन्यावर खर्च होणारा बराचसा पैसा पंजाबमध्यें जातो. त्या पैशानें शिकलेले तरुण इतर प्रांतांत नोकरीधंदा करून त्या मार्गानेंहि पंजाबमध्यें पैसा ओढतात. हा झाला आर्थिक फायदा. ज्या प्रांतांचें सैन्यामध्यें वर्चस्व त्याचें देशाच्या राष्ट्रीय व परराष्ट्रीय कारभारांत महत्त्व राहतें, हा राजकीय फायदा. या बारीकशा सूचनेनें सर शिकंदरांच्या मनांतून पंजाबचें हें अवास्तव महत्त्व कायम टिकवावयाचें आहे हें स्पष्ट होतें. पण पंजाबची [ व मुसलमानांची ] ही कुरघोडी इतर प्रांतांनीं कां चालवून घ्यावी ?

स्वातंत्र्य आणि लोकसत्ता यांचीं जीं कांहीं तत्त्वें आपणाला माहीत आहेत त्यांच्या कसोटीला सर शिकंदर हयातखान यांची योजना उतरणें शक्य नाहीं. तिच्यांत स्वातंत्र्याचा झंकार ऐकूं येत नाहीं. संस्थानांत लोकशाहीचीं तत्त्वें लागू होण्याचा संभव तींत दिसत नाहीं. संयुक्त जबाबदारीचें तींत तत्त्व नाहीं. या योजनेंत अनुस्यूत असलेली प्रादेशिक विभागणी जातीय पद्धतीवर केलेली नाहीं हा तिचा गुण असला तरी राष्ट्राचा कारभार हांकणाऱ्या मंत्र्यांच्या जातीयतेलाच त्यांत आवाहन आढळतें.

# ८ आंबेडकरांचें पाकिस्तान

डॉ. आंबेडकर आपल्या पाकिस्तानची उभारणी मुस्लिम लीगच्या मागणीचें तर्कशुद्ध टोंक गांठून करतात. म्हणजे त्यांच्या योजनेंत भरतखंडाची संपूर्ण फाळणी अभिप्रेत आहे. मुस्लिम लीगनें आपला लाहोरचा ठराव धूर्तपणानें संदिग्ध आणि परस्परविरोधी ठेवला आहे. या ठरावांतलें—The areas in which the Muslims are numerically in a majority as in the North Western and Eastern Zones of India should be grouped to constitute 'Independent' States in which the constituent units shall be autonomous and sovereign [ म्हणजे हिंदुस्तानच्या वायव्य आणि पूर्व खंडांसारख्या ज्या भागांत मुसलमानांचें बहुमत आहे त्या भागांचीं 'स्वतंत्र' राष्ट्रें म्हणून प्रस्थापना व्हावी; या राष्ट्रांचे जे संयोजक घटक आहेत ते स्वायत्त आणि स्वतंत्र मानावे ] हें वाक्य वाचलें म्हणजे त्याचें परस्परविरोधी स्वरूप ध्यानांत येतें. कारण, 'संयोजक घटक' हे 'स्वायत्त आणि संपूर्ण' कधींच होऊं शकत नाहींत. ही संदिग्धता अगर विसंगति बुद्धिपुरःसर नसेल असें म्हणतां येणार नाहीं. मुस्लिम लीग नात्सींचें अनुकरण हरेक प्रकारें करीत आहे. गोंधळाचें तंत्र [ technique of confusion ] हा नात्सी प्रचारशास्त्राचा एक प्रमुख भाग आहे. त्या गोंधळाच्या तंत्राचाच हा एक छोटासा प्रयोग दिसतो. पण तूर्त आपल्याला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. मुस्लिम राष्ट्रांतील घटकांची व्यवस्था लीगवाले कशीहि लावणार असले अगर नसले तरी भरतखंडाची फाळणी त्यांच्या ठरावांत अभिप्रेत आहेच. आणि तीच आपल्या पाकिस्तानचा पाया म्हणून डॉ. आंबेडकरांनीं स्वीकारली आहे.

पण डॉ. आंबेडकरांच्या योजनेंत जो सरळपणा अगर प्रामाणिकपणा आहे त्याला मात्र लीगच्या ठरावांत थारा दिसत नाहीं. या ठरावांत, हिंदु आणि मुस्लिम राष्ट्रांतील अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांविषयीं जी तरतूद केलेली आढळते तिच्याकडे सूक्ष्म नजरेनें पाहिलें म्हणजे मुस्लिम लीगचें अप्रामाणिक राजकारण लगेच ध्यानांत येतें. लीगच्या मनांतून सिंध, पंजाब, सरहद्द आणि बंगाल या 'मुस्लिम' प्रांतांच्या सांप्रतच्या सरहद्दी आहेत तशाच कायम राखावयाच्या आहेत. त्याचप्रमाणें या प्रांतांत जे हिंदु, शिख वगैरे मुस्लिमेतर आहेत त्यांना या 'मुस्लिम' राष्ट्रांत तसेंच डांबून ठेवावें असा लीगचा कावा दिसतो. 'हिंदुस्थानां'तील अल्पसंख्याक मुसलमानांना चांगली वागणूक मिळावी एतदर्थ ही मुस्लिमेतर प्रजा आपल्या प्रांतांत ओलीस ठेवल्याप्रमाणें रहावी असा लीगवाल्यांचा डाव असावा असें स्पष्ट दिसतें. त्यांच्या मतें हे मुस्लिमेतर निव्वळ अल्पसंख्याक आहेत. त्यांना राष्ट्रीयत्वाचे हक्क बहाल करण्यास ते मुळींच तयार नाहींत. पाकिस्तानचें नैतिक अधिष्ठान जर द्विराष्ट्र-सिद्धान्तावर आहे तर मुस्लिम प्रांतांतील मुस्लिमेतर लोकांना स्वतंत्र राष्ट्र असें मानून त्यांना मुसलमानांच्या बरोबरीनें हक्क द्यावयास लीगनें कां तयार होऊं नये ? लीगच्या 'मुस्लिम' प्रांतांत सुमारें ३८% मुस्लिमेतर आहेत. त्यांच्यामध्यें हिंदु, शिख, जैन वगैरे नाना भेद असले तरी ते एकराष्ट्र म्हणून नांदावयास तयार आहेत. ब्रिटिश हिंदुस्थानांतील सुमारें २६% [आणि संस्थानें धरून सर्व हिंदुस्थानांतील सुमारें १९·५%] मुसलमानांना स्वतंत्र राष्ट्र असें मानावें असा जर लीगचा आग्रह आहे तर 'मुस्लिम' प्रांतांतील ३८% मुस्लिमेतरांना स्वतंत्र राष्ट्रीयत्वाचे अधिकार देण्यास तिनें कां कुचराई करावी ? पण लीगचा लाहोरचा ठराव स्पष्ट म्हणतो कीं, त्यांना फक्त अल्पसंख्याकांचे हक्क दिले जातील.* म्हणजे सबंध हिंदुस्थानांत मुसलमान अवघे १९–२०% असले तरी ते स्वतंत्र राष्ट्र आणि मुस्लिम राष्ट्रांत मुस्लिमेतरांची संख्या याच्या दुप्पट म्हणजे सुमारें ३८%

---

* Adequate, effective and mandatory safeguards should be specifically provided in the constitution for minorities in these units.

असली तरी ते केवळ अल्पसंख्याक !–असें हें लीगचें धादान्त लबाडीचें [ विकृत जातीयतेचें असें म्हणा हवें तर ! ] राजकारण आहे.

यावर जरूर तेवढी टीका डॉ. आंबेडकरांनीं केली नसली तरी त्यांच्या पाकिस्तानांत या असल्या अप्रामाणिकपणाला अवकाश नाहीं. त्यांच्या मतें, जातीयतेचा प्रश्न जर खरोखरच प्रामाणिकपणें सोडवायचा असेल तर लीगला जे आपले प्रांत वाटतात त्या म्हणजे सिंध, बलुचिस्तान, सरहद्द, पंजाब आणि बंगाल या प्रांतांची निर्भेळ संस्कृतिक घटना होईल अशी व्यवस्था केली पाहिजे. यासाठीं ते सांप्रतच्या सरहद्दी बदलणें आणि प्रजेची अदलाबदल करणें असे दोन मार्ग सुचवितात. सरहद्दी बदलणें म्हणजे या प्रांतांत जे मुस्लिमेतरांचे म्हणजे मुस्लिमेतर बहुमताचे जिल्हे आहेत ते 'हिंदुस्थान'ला जोडणें. पंजाब प्रांतांत असे जिल्हे १३ आहेत व बंगालमध्यें १४ आहेत. आसामांत सिल्हेट ह्या एका जिल्ह्याखेरीज इतर सर्व जिल्हे मुस्लिमेतरच म्हटले पाहिजेत. डॉ. आंबेडकरांच्या मतें, हे सर्व जिल्हे मुस्लिम राष्ट्रांतून काढून हिंदुस्थानला जोडावे. सरहद्दींचा हा बदल सिंध, बलुचिस्तान अगर सरहद्द प्रांतांत शक्य नाहीं. तेथें हिंदु व मुसलमान असे स्वतंत्र भौगोलिक भाग नाहींतच. मुसलमान व हिंदु यांची त्या प्रांतांत सरमेसळ फार आहे. त्यांच्या बाबतींत प्रजेची अदलाबदल एवढा एकच उपाय आंबेडकर सुचवितात. पंजाब आणि बंगाल यांच्या सरहद्दी बदलल्या तरी अर्थात् त्यांच्या मुस्लिम जिल्ह्यांत कांहीं मुस्लिमेतर व हिंदु जिल्ह्यांत कांहीं मुस्लिम राहातातच. त्यांची अर्थात् अदलाबदल करावी असें आंबेडकर सांगतात. म्हणजे एकंदरींत या मुस्लिम प्रांतांपुरते, सरहद्दींचा बदल व मुस्लिम आणि मुस्लिमेतर जनतेची अदलाबदल असे दोनहि उपाय योजून हिंदुस्थानच्या ईशान्येस आणि वायव्येस दोन निर्भेळ मुस्लिम राष्ट्रें निर्माण करावयाची अशी आंबेडकरकृत पाकिस्तानची योजना आहे.

सरहद्दींचा बदल फारसा कठिण नाहीं, पण प्रजेची अदलाबदल मात्र आंबेडकरांना वाटते तेवढी सोपी नाहीं, असें म्हणणें भाग आहे. गेल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर तुर्कस्थान, ग्रीस व बल्गेरिआ यांनीं अशी प्रजेची अदलाबदल केली होती, मग आपणांसच करावयास काय हरकत आहे ? असें आंबेडकर

विचारतात. परंतु ती अदलाबदल करतांना वेळेचा व पैशाचा किती अपव्यय झाला आणि किती मनस्ताप झाला याचें पुरेसें दिग्दर्शन आंबेडकरांच्या पुस्तकांत झालें आहे असें मला वाटत नाहीं. प्रजेची अदलाबदल हा केवळ डोकीं मोजण्याचा गणिती प्रश्न नाहीं. तो भावनांचा आणि अर्थशास्त्राचाहि प्रश्न आहे. जन्मभूमीबद्दल माणसांच्या भावना फार नाजूक असतात, आणि या अदलाबदलींत या भावनांचा जो निर्दय चक्काचूर होतो त्याचें मोल पैशांनीं मोजतां येत नाहीं. दुसरें असें कीं, ज्या लोकांची अदलाबदल करावयाची त्यांच्या संख्येचें जें प्रमाण पडतें तेंच त्यांच्या जिंदगीचें पडेल असें नाहीं. उदाहरणार्थ, आज पंजाब प्रांतांत मुस्लिमेतरांचें प्रमाण ४६% असलें तर त्यांच्या जिंदगीचें प्रमाण [ सुमारें ] ७०।७५% पडेल. ही गुंतागुंत सोडविण्यासाठीं मुस्लिम राष्ट्रांना बरींच नुकसानभरपाई सोसावी लागेल. तेवढी सोसण्याइतकी ताकद या राष्ट्रांपाशीं आहे का, असा वाजवी संशय व्यक्त करतां येतो.

प्रजेच्या अदलाबदलीस आणखी एक अडचण आहे व ती सरहद्दीच्या बदलासहि लागू आहे. ही अदलाबदल शुद्ध धार्मिक दृष्टीनें होणार—पण इतर भेदाभदांचें काय ? उदाहरणार्थ, बंगालमधले हिंदु बिहारमध्यें ढकलले गेले तर बिहारी लोकांशीं [ धार्मिक ऐक्य असूनहि ] त्यांचें कितपत पटेल ? असा प्रश्न उपस्थित करणें म्हणजे द्विराष्ट्र—सिद्धान्ताचीच पुनः चर्चा करणें होय. हा सिद्धान्त निर्विवादपणें सिद्ध होत नाहीं, आणि होतो असें गृहीत धरलें तरी त्यांतून पाकिस्तानचा निर्विवाद निष्कर्ष निघत नाहीं, हें आपण पाहिलेंच आहे.

डॉ. आंबेडकरांच्या पाकिस्तान—प्रस्थापनेसाठीं प्रजेच्या अदलाबदलीचा आणि सरहद्दीच्या पुनर्रचनेचा इतका खटाटोप केला तरी ‘ हिंदुस्थान’च्या दृष्टीनें अल्पसंख्याकांचा प्रश्न सुटत नाहीं तो नाहींच ! म्हणजे इतकें सारें करूनहि ‘ हिंदुस्थानां’त मुस्लिम अल्पसंख्याक हे व्रणाप्रमाणें त्रास देत राहाणारच. हा कांटा काढून टाकावयाचा असेल तर पाकिस्तान आणि ‘ हिंदुस्थान ’ यांच्यामध्यें पुनः प्रजेची अदलाबदल केली पाहिजे, किंवा अधिक अचूक बोलावयाचें म्हणजे ‘ हिंदुस्थानां’तील सर्व मुसलमानांना पाकिस्तानांत रवाना केलें पाहिजे. कोणत्याहि मुसलमानानें इस्लामेतर राज्यांत म्हणजे शत्रुभूमींत राहूं नये; त्यानें इस्लामी

राज्यांत म्हणजे पुण्यभूमींत गमन केलें पाहिजे, असा इस्लामचा एक दंडक आहे. या निर्गमनाला ‘ हिजरत ’ म्हणतात. मुसलमानांना आपल्या ‘ हिजरत ’-बद्दल [ म्हणजे शत्रुभूमींतून पुण्यभूमींत जाण्याबद्दल ] इतकी आस्था वाटत असेल तर वस्तुतः ते आपण होऊनच ‘ हिंदुस्थान’चा निरोप घेऊन पाकिस्तानांत पदार्पण करतील. पण डॉ. आंबेडकरांना याची तितकीशी खात्री वाटत नसावीसें दिसतें. मागील अनुभवावरून तशी खात्री बाळगण्यास आधार नाहीं. कारण हिंदुस्थानांत ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाल्यावर ‘ हिजरत’ची चळवळ सुमारें शंभर वर्षें चालूनहि मुसलमान अखेर हिंदुस्थानांतच राहिले. अर्थात् ‘ हिंदुस्थान’चें स्वरूप पाकिस्तानप्रमाणें निर्भेळ करावयाचें असेल तर हिंदु राष्ट्रांतील मुसलमानांना बळजबरीनें पाकिस्तानकडे रवाना करावें लागेल, आणि त्याला आंबेडकरासारख्या निधड्या छातीच्या गृहस्थाचीहि तयारी दिसत नाहीं.

तरीहि ‘ पाकिस्तान ’बद्दल डॉक्टरसाहेबांना इतकी आस्था वाटते याचें कारण ते असें सांगतात कीं, या योजनेमुळें ‘ हिंदुस्थानां ’तील मुसलमानांचा जातीय प्रश्न सुटला नाहीं तरी त्याचें प्रमाण फारच कमी होईल. म्हणजे आज जो प्रश्न ६॥ कोटी मुसलमानांचा आहे तो पाकिस्तानच्या प्रस्थापनेनंतर अवघा २ कोटी मुसलमानांचा होईल. आणि दुसरें असें कीं, फेडरल असेंब्लींत आज जें मुसलमानांचें ३३% प्रमाण आहे तें उद्यां पाकिस्ताननंतर २१% होईल— किंवा आज मुसलमानांना त्या असेंब्लींत हिंदूंच्या ८०% प्रतिनिधित्व मिळालें आहे तें उद्यां अवघें ४०% मिळेल.

म्हणजे जो प्रश्न सोडवण्यासाठीं इतका खटाटोप करावयाचा, ज्याच्यासाठीं हिंदूंनीं आपल्या स्वाभिमानावर तिलांजलि द्यावयाची, इतिहास विसरायचा, भूगोल बाजूला सारायचा, तो प्रश्न सुटत नाहीं तो नाहींच — त्याचें प्रमाण फक्त कमी होतें ! यावर डॉ. आंब्रेडकरांना एवढेंच सांगतां येईल कीं, ‘ साहेब, खटपटीच्या मानानें यश अगदींच कमी दिसतें कीं हो ! ’ आणि हें यश तरी नुसतें दिखाऊच नाहीं का ? पाकितानच्या प्रस्थापनेनंतर ‘हिंदुस्थानां’तील दोन कोटी मुसलमानांवर हिंदूंनीं बहुमताच्या जोरावरच जर राज्य करावयाचें तर आजहि हिंदुस्थानांत, साडेसहा कोटी मुसलमान असले तरी, हिंदूंचें बहुमत

आहेच. त्यांनीं घाबरण्याचें काय कारण आहे ? आपल्या बहुमताचा कसा उपयोग करावा याचीच तेवढी फिकीर त्यांनीं बाळगावी म्हणजे झालें. ' हिंदुस्थानां'त हिंदूंना बहुमताच्या जोरावर राज्य करावें लागेल असें जें मी म्हणतों त्याला डॉ. आंबेडकर आक्षेप घेतील असें वाटत नाहीं. 'हिंदुस्थानां'तल्या दोन कोटी मुसलमानांची स्थिति झेकोस्लोव्हाकिआंतील सुडेटन जर्मनांसारखी राहील आणि ते सुडेटन ज्या दृष्टीनें जर्मनीकडे पहात त्याप्रमाणें हे मुसलमान पाकिस्तानाकडे पहातील, असें त्यांनींच आपल्या पुस्तकाच्या याच विभागांत सांगितलें आहे. म्हणजे आपल्या 'हिंदुस्थान'चा झेकोस्लोव्हाकिआ होऊं नये अशी जर हिंदूंची इच्छा असली तर त्यांनीं आपल्या राष्ट्रांतील मुसलमानांबद्दल सदोदित सावध राहिलें पाहिजे, असा याचा अर्थ होतो. ' हिंदुस्थानां'तील मुसलमानांकडे हिंदूंना असें जागरूकपणानें जर नेहमींच पहावें लागणार असेल तर या जागरूकपणांत आजच थोडी भर टाकून त्यांनीं आपल्या मातृभूमीचें आजचें राजकीय ऐक्य कायम टिकविण्याचा प्रयत्न करण्यांत अधिक शहाणपणा नाहीं काय ?

यावर डॉ. आंबेडकरांकडून असें उत्तर येण्याचा संभव आहे कीं पाकिस्तानचा हा एवढा एकच फायदा आहे असें नाहीं; इतर अनेक फायदे आहेत. आंबेडकरांनीं त्या सर्वांचा तपशीलवार उल्लेख केला आहे. त्यांत लष्करी व आर्थिक स्वरूपाचे फायदे प्रमुख दिसतात. पाकिस्तानच्या प्रस्थापनेमुळें 'हिंदुस्थान'चा लष्करी फायदा कोणता होईल हें आंबेडकरांनीं A safe army is better than a safe border [ सुरक्षित सरहद्दीपेक्षां सुरक्षित सैन्य बरें ] या एका वाक्यांत सांगितलें. हिंदी सैन्याचा इतिहास पाहिला तर त्यांत मुसलमानांचें प्रमाण एकसारखें व बेसुमार वाढत असल्याचें आढळतें, तें कमी होण्याची फारशी आशा नाहीं, मुसलमान सैनिक स्वधर्मीयांविरुद्ध लढावयास नाखूष असल्यानें वायव्येकडील मुसलमानी आक्रमणाला आळा घालण्यास ते कुचकामाचे आहेत, अर्थात् हिंदी सैन्य हें हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या दृष्टीनें दिवसेंदिवस बेभरंवशी होत चाललें आहे – म्हणून असल्या सैन्यावर भिस्त टाकण्यापेक्षां ' हिंदुस्थान 'नें आपल्या सैन्यावरच अवलंबून रहावें हें बरें. आतां, वायव्येस

आणि ईशान्येस मुस्लिम राष्ट्रांची प्रतिस्थापना केली म्हणजे तिकडच्या नैसर्गिक संरक्षणास हिंदुस्थान मुकेल हें खरें; पण लढाईचें तंत्र सारखें बदलत आहे, वैमानिक युद्धांत निसर्गानें दिलेल्या संरक्षक सरहद्दी अर्थशून्य ठरत असतात, शिवाय कृत्रिम सरहद्दी बांधतां येतात हें फ्रान्स, जर्मनी, रशिया यांनीं दाखविलेंच आहे.— तेव्हां नैसर्गिक सरहद्दींची भलतीच अभिलाषा न धरतां 'हिंदुस्थान'नें कृत्रिम सरहद्द आणि विश्वसनीय असें हिंदु सैन्य यांवर अवलंबून रहाण्याची तयारी करावी, यांतच त्यांचें हित आहे, असा आंबेडकरांच्या त्या वाक्याचा एकंदरं मतितार्थ आहे.

आंबेडकरांच्या या प्रतिपादनांत बरेंच तथ्य आहे. पण तें निर्णायक मात्र नाहीं. हिंदी सैन्यांत मुसलमानांचें प्रमाण बेसुमार वाढत आहे हें अगदीं खरें आहे, परंतु तें तसेंच नेहमीं वाढत अगर कायम राहील असें मानण्यास काय आधार आहे ? सैन्यभरती करतांना लढाऊ आणि बिनलढाऊ असा जो कृत्रिम भेद सरकार करीत असे तो हें प्रमाण असें भरमसाट वाढण्याचें एक महत्त्वाचें कारण आहे. पण चालू महायुद्धांत सरकारला हें वर्गीकरण सोडून द्यावें लागलें आहे. आणि युद्धतंत्राचें स्वरूप दिवसेंदिवस बदलत असल्यानें, दिवसेंदिवस त्यांत शारीरिकपेक्षां बौद्धिक ताकदीची आवश्यकता वाढत असल्यानें थोडेच दिवसांत सरकारचें हें वर्गीकरण अर्थशून्य आणि टाकाऊ ठरेल, आणि त्याबरोबर मुसलमानांचें प्रमाणहि कमी होईल. दुसरें असें कीं, आज ना उद्यां सरकारला 'इंडियन मिलिशिआ'ची उभारणी करावी लागेलच. हिंदुस्थानांत कांहीं राजकीय सुधारणा होणार असतीलच तर ही देखील होईल, अशी आशा आपण बाळगूं या. ही सुधारणा झाली तर हिंदी संरक्षक दळांत लोकसंख्येच्या प्रमाणांत हिंदूंचें बहुमत होईलच.

नैसर्गिक सरहद्दीबद्दल आंबेडकरांचें प्रतिपादन अधिक विचारार्ह आहे. पण वैमानिक युद्धाच्या युगामुळें नैसर्गिक सरहद्दी अगदींच अर्थशून्य ठरतात असा जो ध्वनि त्यांतून निघतो तो मात्र तितकासा बरोबर नाहीं. वैमानिक युद्धाच्या कालांतहि नैसर्गिक सरहद्दी उपकारक ठरतात हें ब्रिटनसभोंवतीच्या समुद्राच्या लहानशा पट्टीनें हिटलरच्चीं ब्रिटनवरील आक्रमणाचीं सुखस्वप्नें विदारकपणें

भंगून टाकलीं आहेत यावरून सिद्ध होतें. कृत्रिम सरहद्दी बांधाव्या असें आंबेडकर म्हणतात. परंतु ' हिंदुस्थान 'ला काय अगर [ ' हिंदुस्थान 'विरुद्ध ] पाकिस्तानला काय अशा कृत्रिम सरहद्दी बांधायला किती खर्च येईल, याचा आंबेडकरांनीं विचार केला आहे काय ? आपल्या पुस्तकांत संस्थानांचा विचार आंबेडकरांनीं अजिबात केलेलाच नसल्यामुळें हा प्रश्न त्यांना थोडाबहुत सोपा वाटत असावा. पण हिंदुस्थानच्या पोटांत भोपाळ–हैद्राबादसारखीं मुस्लिम, आणि पाकिस्तानच्या पोटांत ' काश्मीर 'सारखीं हिंदु संस्थानें कायम रहाणार असलीं तर हें कृत्रिम सरहद्दीचें कडबोळें किती चित्रविचित्र आणि खर्चाचें होईल याची नुसती कल्पनाच केलेली बरी. अशा परिस्थितींत A safe army is better than a safe border हें आंबेडकरांचें सुटसुटित वचन त्यांना वाटतें इतकें खात्रीनें निर्णायक ठरत नाहीं.

आर्थिक दृष्टीनें पाहिलें म्हणजे पाकिस्तानची प्रस्थापना सकृद्दर्शनीं तरी ' हिंदुस्थान 'च्या निर्विवाद फायद्याची दिसते यांत संशय नाहीं. हा फायदा अनेक प्रकारचा आहे. प्रथम म्हणजे मध्यवर्ति सरकारचा आज जितका बोजा हिंदु प्रांतांना सोसावा लागतो तितका तो पाकिस्ताननंतर सोसावा लागणार नाहीं. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील प्रांतिक सरकारांचें आणि मध्यवर्ति सरकारचें उत्पन्न पाहिलें कीं हें ध्यानांत येईल कीं, मध्यवर्ति सरकार आपलें उत्पन्न सर्व प्रांतांतून सारख्या प्रमाणांत वसूल करीत नाहीं. उदाहरणार्थ, मुंबई–बंगालसारखे कांहीं प्रांत आपल्या प्रांतिक उत्पन्नाच्या जवळजवळ दुप्पट रक्कम मध्यवर्ति सरकारच्या तिजोरींत भरीत असतात, तर पंजाब, सरहद्द यांसारखे प्रांत आपल्या प्रांतिक उत्पन्नाच्या धड एकदशांश भागहि मध्यवर्ति सरकारला देत नाहींत. यावरून स्थूल मानानें असें म्हणतां येईल कीं, मध्यवर्ति सरकारचें उत्पन्न हिंदु प्रांतांतूनच अधिक प्रमाणांत वसूल होत असतें. उद्यां पाकिस्तान आलें तर हिंदु प्रांतांवरील हें ओझें कमी होईल आणि न झालें तरी त्याचा फायदा सर्वस्वीं हिंदु प्रांतांनाच मिळेल.

दुसरें असें कीं, मध्यवर्ति सरकारकडून ज्या ' डेफिसिट ' [आंतवटीच्या] प्रांतांना सालीना मदत मिळते त्या सिंध, ओरिसा, आसाम, सरहद्द, बिहार आणि

बंगाल प्रांतांत मुस्लिम प्रांतच अधिक आहेत. एकंदर सहा ' डेफिसिट ' प्रांतांत चार [ निदान साडेतीन ] प्रांत ' मुस्लिम ' आहेत. याचा अर्थ असा होतो कीं या मुस्लिम प्रांतांचा खर्च त्या प्रमाणांत मध्यवर्ति सरकारतर्फे हिंदु प्रांतांतील लोक चालवितात. पाकिस्तानच्या प्रस्थापनेनंतर हिंदूंच्या डोक्यावरचें हें ओझें सहाजिकच उतरेल.

तिसरें असें कीं, हिंदी सैन्यावर सालीना जो अवाढव्य खर्च होतो त्याचें बरेंचसें प्रमाण, सैन्यांत मुसलमानांचें आणि पंजाबचें वर्चस्व असल्यानें मुसलमानांच्या आणि पंजाबच्या खिशांत जातें. हा खर्च अर्थात् प्रामुख्यानें हिंदु लोकच सोसतात – म्हणजे तेवढ्या प्रमाणांत पैसा सरळ हिंदूंच्या खिशांतून मुसलमानांच्या खिशांत जातो. या पैशाची प्रगति तेथेंच थांबत नाहीं. या पैशांतूनच मुस्लिम आणि पंजाबी सैनिकांचीं मुलें उच्च शिक्षण घेतात, आणि त्याच्या जोरावर आपल्या पंजाबांत आणि इतरत्र मोठमोठ्या नोकऱ्या आणि उत्पन्नाचीं स्थानें पटकावतात. [ डॉ. सच्चिदानंद सिंहांनीं दाखविल्याप्रमाणें यंदाच्या आय्. सी. एस्. परिक्षेंतच, उदाहरणार्थ, सर्वांत अधिक विद्यार्थी पंजाब विश्वविद्यालयाचे होते. ] म्हणजे या दिशेनेंहि पैसा पंजाब आणि मुसलमान यांच्याच दिशेकडे वळतो. पाकिस्तानच्या प्रस्थापनेनंतर पैशाचा हा विचित्र ओघ थांबेल आणि त्याला अधिक अविकृत दिशा प्राप्त होईल.

पण आर्थिक दृष्ट्या सर्वांत मोठा मुद्दा असा कीं, ' पाकिस्तान 'पेक्षां ' हिंदुस्तान ' हा अधिक समृद्ध प्रांत आहे. डॉ. आंबेडकांनीं हें फक्त सरकारी उत्पन्नाच्या आंकड्यांनीं दाखविलें आहे. परंतु उत्पादन, लोकसंख्या अगर भूप्रदेश, कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी ही गोष्ट खरी आहे,' असेंहि त्यांनीं स्पष्टपणें म्हटलें आहे. * आधुनिक युद्धांत अत्यंत आवश्यक असलेल्या खनिज संपत्तीच्या दृष्टीनें पाहिलें तर पाकिस्तान आणि 'हिंदुस्थान' यांच्या मधील हा फरक विशेषच प्रत्ययास येतो. कारण भरतखंडांतील बहुतेक

---

* The resources of Hindustan are far greater than those of Pakistan, whether one considers the question in terms of area, population or revenue.–*Thoughts on Pakistan*, P. 65.

सर्व खनिज संपत्ति दिल्ली–हैदराबाद–कलकत्ता आणि मुंबई–हैदराबाद–त्रिवेंद्रम् या दोन त्रिकोणांत दडलेली आहे. आणि हे दोनहि त्रिकोण 'हिंदुस्थानां'त आहेत. तेव्हां भरतखंडाचे पाकिस्तान आणि 'हिंदुस्थान' असे दोन भाग पाडले तर 'हिंदुस्थान' हा आर्थिक दृष्ट्या विशेष समृद्ध व समर्थ होईल तर पाकिस्तानची आर्थिक परिस्थिति अवघड आणि केविलवाणी होईल यांत कांहींच संशय नाहीं.

आणि यांतच 'हिंदुस्थान'ला धोका आहे. सकृद्दर्शनीं हें विधान विरोधात्मक वाटेल, पण तें केवळ विरोधाभासात्मक आहे. आजच्या परस्परावलंबित आंतरराष्ट्रीय जीवनांत स्वयंनिर्णयाचें तत्त्व पाळण्याचा अट्टाहास करावयाचा असेलच तर कोणत्याहि राष्ट्राची प्रस्थापना अगर पुनर्घटना करतांना तें आर्थिक दृष्ट्या अधिकांत अधिक स्वयंपूर्ण होईल, अशी शक्य तेवढी काळजी घेतली पाहिजे. नाहींतर तें इतर निकटच्या राष्ट्रांना धोका उत्पन्न करतें. प्रत्येक राष्ट्र आपलें राजकीय व आर्थिक जीवन सुरक्षित करण्याचा प्रयत्न करीत असतें. आजच्या आत्यंतिक राष्ट्रवादाच्या काळांत तर ही प्रवृत्ति विशेषच वाढलेली दिसते. आर्थिक स्वयंपूर्णता हा या सुरक्षिततेचा एक उत्तम मार्ग होय. ज्या राष्ट्रांपाशीं ती नाहीं तीं या ना त्या उपायांनीं इतर राष्ट्रांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतात, आणि ज्यांना हें साधत नाहीं त्यांना दुय्यम–तिय्यम स्थान स्वीकारावें लागतें. पण तें स्वीकारण्याची कांहीं राष्ट्रांची मानसिक प्रवृत्ति नसते. नात्सी जर्मनी इतका आक्रमण बनला याचें एक – अर्थात् एक – महत्त्वाचें कारण त्या राष्ट्रांत आर्थिक स्वयंपूर्णता अशक्य झाली हेंच होय. रशियाची आर्थिक व्यवस्था जवळ जवळ नात्सी जर्मनीसारखीच असूनहि त्याला फारसें आक्रमक बनावें लागलें नाहीं याचें कारण रशिया स्वयंपूर्ण आहे आणि जर्मनी नाहीं हेंच होय.* ब्रिटन आणि अमेरिका यांच्या साम्राज्यवादांतील फरकाचें एक कारण मला हेंच दिसतें.

पाकिस्तानमधील लोकांची मनोवृत्ति आणि त्यांची परंपरा पाहिली म्हणजे पाकिस्तान आर्थिक दृष्ट्या अपूर्ण आणि परावलंबी ठरला तर तो आक्रमक

*Peter Drucker यांचें The End of Economic Man हें पुस्तक पहा.

बनेल आणि हें आक्रमण 'हिंदुस्थाना'विरुद्धच होईल, अशी मला भीति वाटते. ज्या हिंदूशीं पटत नाहीं म्हणून विद्वेषानें हे मुसलमान आज विभक्त होऊं पहात आहेत [असें पाकिस्तानवाले म्हणतात] त्या हिंदूंबद्दल उद्यां पाकिस्तानची प्रस्थापना झाल्याबरोबर त्यांच्या अंतःकरणांत प्रेमाचे पाट वाहूं लागतील असें म्हणण्यास फारसा आधार नाहीं. किंबहुना 'हिंदुस्थान'वर आक्रमण करून त्यावर इस्लामचा झेंडा फडकविणें हेंच त्यांना आपलें कर्तव्य वाटेल. मुसलमानांचे कांहीं धार्मिक दंडक आणि त्यांचें राजकारण यांचें स्वरूप अभ्यासलें म्हणजे पाकिस्तानची 'हिंदूस्थान'वर आक्रमण करण्याची वृत्ति कां राहील हें ध्यानांत येतें. मुसलमानांच्या धार्मिक समजुतीप्रमाणें जगाचे दोन भाग पडतात. एक दार-उर-इस्लाम [पुण्यभूमि] आणि दुसरा दार-उल-हर्ब [शत्रुभूमि]. ज्या भूभागावर मुसलमानांचें राज्य असतें तो दार-उल-इस्लाम व ज्यावर मुस्लिमेतरांचें असतें तो दार-उल-हर्ब. मुसलमानांच्या 'जिहाद' कायद्याप्रमाणें दार-उल-इस्लाम आणि दार-उल-हर्ब यांच्यामध्यें अविरत विरोध असतो; आणि दार-उल-हर्बचें रूपांतर दार-उल-इस्लाममध्यें करणें हें मुस्लिम राज्यकर्त्यांचें कर्तव्य आहे, असा या 'जिहाद'चा पैगंबरभक्तांना सक्त आदेश आहे. या 'जिहाद'ची मजल एवढ्यावरच थांबलेली नाहीं. मुसलमानांच्या धर्मादेशाप्रमाणें कोणत्याहि मुस्लिम राज्यकर्त्याला शत्रूभूमीवर धर्मयुद्ध पुकारतां येतें; इतकेंच नव्हे, तर या धर्मयुद्धांत साहाय्य करण्यासाठीं इतर मुस्लिम राज्यकर्त्यांना पाचारण करतां येतें; आणि तें त्यांना नाकारतां येत नाहीं. म्हणजे, उदाहरणार्थ, उद्यां पाकिस्तानने 'हिंदुस्थान'वर धर्मयुद्ध पुकारलें तर, या धर्मयुद्धांत भाग घेण्यासाठीं इराण-अफगाणिस्तानला बोलावणें हें पाकिस्तानचें धार्मिक कर्तव्य ठरतें, व या निमंत्रणाचा स्वीकार करणें हें इराण-अफगाणिस्तानच्या मुस्लिम राज्यकर्त्यांचेंहि धार्मिक कर्तव्य ठरतें. १९२१ सालीं कराची येथील मॅजिस्ट्रेट कोर्टांत अलीबंधूंवर खटला झाला, तेव्हां मौ. महमदअली यांनीं आपली कैफियत सादर करतांना [नुकत्याच झालेल्या अफगाण-युद्धाच्या संबंधांत] मुसलमानांचीं हीं कर्तव्यें अगदीं स्पष्ट शब्दांत नमूद करून ठेवलीं आहेत.

मुसलमानांच्या धार्मिक कर्तव्यांची एवढ्यावरच परिसमाप्ति झालेली नाहीं.

इस्लाम प्रादेशिक भेद जाणीत नाहीं. त्याचे बंध धार्मिक–सामाजिक असतात, प्रादेशिक नसतात. म्हणून कोणत्याहि मुसलमानाला, एखाद्या देशाचे कायदे इस्लामच्या तत्त्वांना धरून नाहींत असें वाटलें तर तें मोडणें आपलें कर्तव्य वाटतें. इस्लाम धर्म इतका सर्वव्यापी आहे, आणि यांतच पॅन–इस्लामिझमचा पाया आहे. म्हणूनच बहुतेक मुसलमानांचें राजकारण पॅन-इस्लामिझमवर आधारलेलें असतें. या राजकारणाचा आविष्कार पाकिस्तानांत झाला तर तें सभोंवतालच्या इस्लामेतर राष्ट्रांना म्हणजे अर्थात् 'हिंदुस्थान'ला मारक झाल्याखेरीज कसें राहील ?

पण पाकिस्तानचें राजकीय धोरण इतकें धर्मानुगामी राहील असें मानण्यास आधार काय, असा यावर आक्षेप घेतां येईल. या आक्षेपाला सुरेख उत्तर The Confederacy of India या ग्रंथाचे लेखक मि. 'पंजाबी' यांनींच दिलें आहे. मुसलमानांना धर्म आणि राजकारण यांची फारकत करतां येत नाहीं असें सांगतांना ते म्हणतात, " मुसलमान लोक आपला धर्म आणि राजकारण यांच्या मध्यें विच्छेद करूं शकत नाहींत. त्यांच्या धर्मांत राजकारणाचा अंतर्भाव होतो आणि त्यांचें राजकारण हा त्यांच्या धार्मिक जीवनाचाच एक भाग असतो. मुसलमानांची मशिद हें एक नुसतेंच प्रार्थना-मंदिर नसतें तर कायदेमंडळहि असतें. मशिद हें त्यांच्या सार्वजनिक जीवनाच्या, धार्मिक, आर्थिक, राजकीय वगैरे सर्व अंगांचें केंद्रस्थान असतें." *

मुसलमानांचा धर्म आणि राजकारण एक असल्यामुळें त्यांच्या स्वातंत्र्याच्या ध्येयालाहि अगदीं वेगळा अर्थ प्राप्त होतो. कॉंग्रेसच्या स्वातंत्र्याहून मुसलमानांचें स्वातंत्र्य किती वेगळें आहे हें सांगतांना मि. ' पंजाबी ' म्हणतात, " कॉंग्रेसच्या दृष्टीनें स्वातंत्र्य ही 'राष्ट्रीय' गरज आहे. कॉंग्रेसवाल्यांना तें आपल्या राष्ट्रीय अभि-

* " The Muslims cannot divorce their religion from politics. Their religion includes their politics and their politics are a part of their religion. The mosque not only constitutes the place of worship but also the Assembly hall...The mosque forms the centre of all aspects of their public life, religious, social, economic and political." [ P. 88–89 ].

मानाच्या उद्धारासाठीं आणि त्यापासून होणाऱ्या राष्ट्रीय, आर्थिक आणि सामाजिक सुधारणांसाठीं हवें आहे. पण मुसलमानांच्या दृष्टीनें स्वातंत्र्य ही धार्मिक गरज आहे – इस्लामप्रणीत आध्यात्मिक आणि व्यवहारिक जीवनाच्या सफलतेसाठीं त्यांना तें हवें आहे. मुसलमानांना, आपल्या धार्मिक आणि सांस्कृतिक ध्येयांच्या पूर्तीसाठीं स्वातंत्र्य हवें आहे – कारण परधर्मीयांच्या अंमलाखालीं या ध्येयांचा विकास होऊं शकत नाहीं." §

स्वातंत्र्याचा इस्लामी अर्थ असा असल्यामुळेंच मुसलमान अखेरीस स्वातंत्र्य हें जागतिक इस्लामी क्रांतीचें एक साधन मानतात. या इस्लामी क्रांतीच्या अंतिम इच्छेनेंच ते स्वातंत्र्याच्या अगर दुसऱ्या कोणत्याहि चळवळीस प्रवृत्त होतात. इस्लामी क्रांतीच्या पार्श्वभूमीवरच त्यांच्या आंदोलनांत अर्थ प्रतीत होऊं लागतो. मि. 'पंजाबी'नीं हें स्वच्छच सांगून टाकलें आहे. ते म्हणतात, "[ मुस्लीम ] स्वातंत्र्याच्या प्रस्थापनेनंतर, अनिस्लामी जगांत आपलें इस्लामी राज्याचें ध्येय फार काल टिकविणें अशक्य होईल. सवत्र इस्लामी स्वरूपाच्या जागतिक क्रांतीची घोषणा करणें आपणास प्राप्त आहे. म्हणून इस्लामी स्वरूपाची जागतिक क्रांति हेंच आपलें अंतिम ध्येय असलें पाहिजे." †

---

§ To the congress 'independence' constitutes a national necessity, and they want it for the restoration of their national self-respect and all the other national, social and economic benefits which accrue from it. To Muslims 'independence' is a religious necessity, for the achievement of the spiritual and worldly benefits which Islam promises. Muslims want independence for the sake of their religious and cultural ideals, for they cannot flourish under a foreign rule. [ P. 98-99 ].

† After independence has been achieved it would be impossible for us to maintain, for long, in an un-Islamic world, our ideal of an Islamic state. As such, we shall have to advocate a world revolution on Islamic lines. Consequently, our ultimate ideal is a world-revolution on Islamic lines. [ P. 269-78 ].

अशा इस्लामी क्रांतीच्या अंतिम ध्येयानें प्रेरित झालेलें पाकिस्तान उद्यां हिंदुस्थानबाहेरील मुस्लीम राष्ट्रांशीं संगनमत करून 'हिंदुस्थान' नांवाच्या दार-उल-हर्बवर धर्मयुद्ध पुकारण्याचा हमखास प्रयत्न करील असाच निष्कर्ष यावरून निघत नाहीं काय ? बाहेरील धर्मवेड्या लोकांनीं आजवर असे प्रयत्न केले नाहींत, हें याला उत्तर नव्हे. प्रयत्न केले नाहींत म्हणून करण्याची इच्छा नव्हती असें म्हणतां येत नाहीं. ताकद नव्हती असेंच म्हणणें अधिक बरोबर ठरतें. पाकिस्तानपासून 'हिंदुस्थान'ला धोका येणार नाहीं असें जीना वारंवार जीव तोडून सांगत असतात. जीनांचें हें आश्वासन अप्रामाणिक आहे असें मी म्हणत नाहीं. पण लाला लजपतराय यांच्या शब्दांत त्यांना एवढेंच उत्तर द्यावेंसें वाटतें कीं, मी मुस्लिम पुढाऱ्यांवर पूर्ण विश्वास टाकायला तयार आहे, पण कुराण आणि हादी यांच्या आज्ञांचें काय ? त्यांच्या पलीकडे तर त्यांना जातां येत नाहीं ना ? *

'हिंदुस्थान' हा पाकिस्तानच्या मानानें किती तरी समृद्ध असतांना त्यानें मुस्लिम आक्रमणाला इतकें घाबरण्याचें काय कारण आहे ? आपल्या नैसर्गिक समृद्धीचा उपयोग करून हिंदूंना आपल्या 'हिंदुस्थान'ची तटबंदी करतां येणार नाहीं काय ? मुसलमान कितीहि कडवे आक्रमक असले तरी हिंदूंना नैसर्गिक सामर्थ्याच्या जोरावर अल्पावधींत हवें तेवढें प्रचंड सैनिकदल आणि हवी तितकी भरपूर युद्धसामुग्री निर्माण करतां येईल, मग त्यांनीं मुस्लिम आक्रमणाची धास्ती कां बाळगावी ? – असा यावर युक्तिवाद करतां येईल. त्याला उत्तर असें कीं, अशा बाबतींत केवळ नैसर्गिक समृद्धीवर अवलंबून भागत नाहीं, तर ती ज्यांच्या वांट्याला आली आहे त्यांची नैसर्गिक प्रकृति, व्यावहारिक अनुभव, भौगोलिक अवस्था, ऐतिहासिक परंपरा इत्यादि गोष्टींचाहि विचार करावा लागतो. 'हिंदुस्थान' देश समृद्ध असल्यानें पुढेंमागें तो एक प्रभावी व प्रबल राष्ट्र बनूं शकेल. पण याला कालावधि लागेल. नजिकच्या कालांत दृष्टि टाकून विचार

---

* I am fully prepared to trust the Muslim leaders, but what about the injections of the Quoran and Hadis? The leaders cannot override them. इंद्रप्रकाश यांनीं वें. सावरकरांच्या चरित्रांत उद्धृत केलेल्या एका पत्रावरून.

केला तर मुसलमानांच्या आक्रमणाला तोंड देण्याच्या कामांत अनेक अडचणी उभ्या रहातात. प्रथम म्हणजे हिंदुस्थानला नैसर्गिक सरहद्द नाहीं. दुसरें म्हणजे हिंदु हे मुसलमानांप्रमाणें कडवेहि नाहींत, आणि त्यांच्या वीरश्रीला मुसलमानांच्या इतकें आततायी स्वरूपहि धारण करतां येणार नाहीं. या बाबतींत मुसलमानांची ऐतिहासिक परंपरा त्यांच्या आक्रमणशील धोरणाला पोषक आहे. शिवाय, हिंदी सैन्यांत मुसलमानांचा विशेष भरणा असल्यानें त्यांची लढाऊ वृत्ति व कसब विशेष ताजें आणि जागृत आहे. अक्कल आणि आर्थिक समृद्धि असल्यावर लढाऊ परंपरा अगर मनोवृत्ति निर्माण करतां येते हें खरें, पण पंधरावीस वर्षांत साधणारें तें काम नव्हे हें मुसोलिनीच्या फॅसिस्ट सैनिकांच्या उदाहरणावरून म्हणावयास हरकत नाहीं. उलटपक्षीं लढाऊ वृत्ति आणि परंपरा असली म्हणजे राष्ट्र किती तेजस्वी आणि आक्रमक, अगदीं अल्पावधींत, बनवितां येतें हें हिटलरनें सिद्ध केलें आहे. म्हणूनच हिंदूंच्या इतिहासांत वीरश्रीचे अनेक आश्चर्यकारक दाखले आहेत एवढ्या आधारावर हिंदुस्थानला निर्धास्त रहातां येईल असें मला वाटत नाहीं.

# ९ चक्रव्यूह

हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नाचें विवेचन करतां करतां मी एका चक्रव्यूहांत सांपडून अडकलों आहें असेंच अनेकांना वाटत असेल. या चक्रव्यूहाचें स्वरूप स्पष्ट आहे. हिंदु आणि मुसलमान अशीं दोन स्वतंत्र आणि सलग राष्ट्रें हिंदुस्थानांत नाहींत हें सिद्ध करतांना हिंदुस्थानांत तसें म्हटलें तर अनेक राष्ट्रें आहेत, आणि एकराष्ट्रीयत्व हें हिंदुस्थानचें एक उज्ज्वल आणि विशाल असें ध्येय आहे असें मीं सांगितलें. * त्याचप्रमाणें मी हेंहि स्पष्ट केलें कीं, आज हिंदु--मुसलमानांचे संबंध खरोखरच बिघडलेले आहेत, त्यांच्या मध्यें एकोपा तर नाहींच, पण उलट मुस्लिम लीगच्या राजकारणाला अतिशय उद्वेगजनक असें आततायीपणाचें [ आंबेडकरांच्या भाषेंत दादागिरीचें ] स्वरूप प्राप्त झालें

---

* हें माझें प्रतिपादनच सर्वांत अधिक निर्दोष आहे, आणि तें तसें मानलें तरच हिंदुस्थान हें कधीं अखंड हिंदुस्थान होतें कीं नाहीं आणि आज आहे कीं नाहीं यावर जो वृथा वाद माजलेला आढळतो तो संपुष्टांत येईल. अखंड हिंदुस्थान हें एखादें ऐतिहासिक सत्य नसेल, पण तेंच हिंदुस्थानचे सोज्ज्वळ आणि सुसाध्य असें ध्येय असूं शकतें हें निर्विवाद होय. हिंदुस्थान हें एकराष्ट्र नसून अनेकराष्ट्र आहे आणि त्यांतून हिंदु आणि मुसलमान अशीं दोन राष्ट्रें निर्माण करणें जितकें विकट आहे त्याहून एक हिंदी राष्ट्र निर्माण करणें फारसें अधिक विकट नाहीं. तेव्हां त्याच ध्येयाचा स्वीकार करणें श्रेयस्कर होय. पण याबद्दल हवा तो मतभेद झाला तरी एवढी गोष्ट निर्विवाद कीं आज तरी हिंदुस्थानांत सजीवी आणि सामर्थ्यशाली अशा एकराष्ट्रीयत्वाचा अभावच आहे.

आहे. आणि आतां अशी भीति वाटूं लागली आहे कीं मुसलमानांच्या दादागिरीचें रोखठोक निराकरण करण्यासाठीं हिंदूसुद्धां यापुढें दंडेलीच्या राजकारणाचा स्वीकार केल्याखेरीज रहाणार नाहींत. असें झाल्यामुळें कदाचित् समानतेचा न्याय प्रस्थापित होईल, पण हिंदी राजकीय आणि सामाजिक प्रगतीचा मात्र पुरा विध्वंस झाल्याखेरीज रहाणार नाहीं.

अशा परिस्थितींत मुसलमानांना पाकिस्तान देऊन टाकणें हाच एक शहाणपणाचा उपाय नव्हे काय, असा प्रश्न अनेक शहाणेसुर्ते विचारतात. या प्रश्नाला उत्तर असें कीं, पाकिस्तानमुळें आजचा प्रश्न कदाचित् सुटेल, पण उद्यां तें 'हिंदुस्थान'ला मारक झाल्याखेरीज रहाणार नाहीं. म्युनिख्–करारानें झेकोस्लोव्हाकिआची फाळणी झाली आणि त्याचा परिणाम झेक राष्ट्राच्या अस्तांत झाला, तसाच या फाळणीचा परिणाम 'हिंदुस्थान'च्या स्वातंत्र्याचा निकाल लागण्यांत झाल्याखेरीज रहाणार नाहीं.

हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नाचें स्वरूप असें विचित्र आणि गुंतागुंतीचें झालें आहे. त्यांच्या राजकारणांत तात्त्विक एकवाक्यता नाहीं, व्यावहारिक सहकार्य नाहीं, एकराष्ट्रीयत्वाची भावना नाहीं आणि कोणत्याहि भांडणाचा तर्कशुद्ध शेवट जसा विभक्तीकरणांत होतो तसाहि तो होऊं शकत नाहीं, आणि झाला तर तो दोघांनाहि मारक झाल्याखेरीज रहाणार नाहीं. म्हणजे हिंदु-मुसलमानांना आज एकत्र नांदतां येत नाहीं, आणि विभक्तीकरणानें त्यांचे प्रश्न सुटतील अशी सुतराम् आशा नाहीं.

असा हा चक्रव्यूह आहे !

या चक्रव्यूहाचा भेद कसा करावयाचा ?

हिंदुस्थानांत हिंदूंचें अधिराज्य प्रस्थापित करून मुसलमानांना कायमचें कबज्यांत ठेवणें असा. जर हा भेद करण्याचा उपाय एखादा सुचवील तर त्यासारखा मूर्खपणाचा उपाय दुसरा नाहीं, असें निदान मला तरी वाटतें. सात–आठ कोटी मुसलमानांना कायमचें गुलामगिरींत डांबून ठेवण्याचीं स्वप्नें कितीहि उन्मादक असलीं तरी तीं कायमचीं दिवास्वप्नेंच ठरतील, प्रत्यक्षांत तीं कधीं आकारास येतील अशी आशा करण्याचें कारण नाहीं असें माझें स्पष्ट मत

आहे. आणि हें ध्येय स्वप्नसृष्टींतून वास्तवसृष्टींत उतरण्याचा संभव असला तरी हें जबरीचें अधिराज्य हिंदूंना उपकारक ठरेल असेंहि वाटत नाहीं. स्वातंत्र्याचें अपहरण हें परतंत्रांइतकेंच राज्यकर्त्यांच्याहि अधःपाताला कारण ठरतें ही गोष्ट आतां नव्यानें सिद्ध करण्याचें कारण नाहीं. तेव्हां हिंदूंना आपला विकास करून घ्यावयाचा असेल तर त्यांनीं आपल्याबरोबरच मुसलमानांनाहि स्वातंत्र्य मिळेल, आणि त्यांना अखंड हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व आणि नागरिकत्व आकर्षक वाटेल अशी परिस्थिति निर्माण करणें हें आपलें ध्येय ठेवलें पाहिजे.

अशी परिस्थिति कधींहि निर्माण होणें शक्य नाहीं असें निराशावादी प्रतिपादन हवेंत फेंकणें म्हणजे मनुष्यस्वभाव आणि इतिहास यांचें अक्षम्य अज्ञान व्यक्त करण्यासारखें होय. हिंदुस्थानच्या इतिहासाचेंच परिशीलन केलें तरी ब्रिटिशपूर्व हिंदुस्थानांत हिंदु-मुसलमानांच्या सहकार्याचीं अनेक उज्ज्वल दृश्यें आढळून येतील. विसाव्या शतकांतील भावनांचें आणि कल्पनांचें समाधान करणारें एकराष्ट्रीयत्व त्यावेळीं अस्तित्वांत होतें असें मला म्हणावयाचें नाहीं. तो कालच या भावनांना पोषक नव्हता. तरी देखील हिंदु-मुसलमानांचें त्यावेळचें सहकारी जीवन अनेक बाबतींत अभिमानास्पद होतें यांत संशय नाहीं. भाषेचा प्रश्न, उदाहरणार्थ, घ्या. आज 'उर्दू' ही मोठी वादाची बाब होऊन बसली आहे. पण भाषाशास्त्रीय शोधांवरून अगदीं निर्विवादपणें सिद्ध झालें नसलें तरी साधारणपणें असें अनुमान बांधावयास हरकत नाहीं कीं दिल्लीच्या आसपास प्रचलित असणाऱ्या एका बोलीचा हिंदु-मुसलमानांनीं केलेला उर्दू हा एक संघर्षमय विकास आहे. उर्दूमध्यें अनेक हिंदु लेखकांनीं अभिमानास्पद भर घातली आहे आणि अनेक मुसलमानांनीं संस्कृतोद्भव प्रांतिक भाषांचें [ विशेषतः बंगालीचें ] वैभव वाढविलेलें आहे. कला आणि कौशल्य यांच्या क्षेत्रांत तर हिंदु–मुसलमानांनीं सहकार्याची जी सीमा गांठली ती सदैव स्पृहणीय राहील. संगीत, शिल्प, चित्रकला आणि नृत्य यांच्या प्रांतांत हिंदुमुसलमानांच्या सहकार्याचे सजीव नमुने ठिकठिकाणीं सांपडतात. धर्माच्या क्षेत्रांत दादुमिया, कबीर, नानक, चैतन्य आणि तुकाराम यांनीं एक समान विशाल दृष्टिकोन निर्माण केला, आणि निःपक्षपाती दृष्टीनें पाहिलें तर भक्तिपंथावर कांहीं मुस्लिम धर्मपंथांचा स्पष्टास्पष्ट परिणाम झालेला आढळून

आल्याखेरीज राहणार नाहीं. त्यावेळच्या सामाजिक [ व धार्मिक ] चालीरीतींचें निरीक्षण देखील हेंच सांगतें. समान आर्थिक आणि राजकीय पातळीवरील हिंदु–मुसलमानांच्या पोशाखांत, चालीरीतींत आणि नैतिक व्यवहारांत फारसा फरक नव्हता. हिंदु-मुसलमानांच्या राजकीय सहकार्याकडे पाहिलें तर एक निराळीच आशा प्रतीत होऊं लागते. मुसलमान हे हिंदुस्थानांत विजेते म्हणून. शिरले. त्यांनीं आपल्या बरोबर इस्लामचा आक्रमक झेंडाहि आणला. त्यामुळें जी कांहीं मानसिक विकृति व्हावयाची ती झाली. पण कालांतरानें हिंदु-मुसलमानांचें राजकीय ऐक्य इतकें विकसित झालें कीं मुसलमान सैनिक आपला ‘ जिहाद ’चा आदेश विसरून हिंदु राजांच्या लष्करी दळांतून मुस्लिम राजां-विरुद्ध लढतांना हरहमेश दिसूं लागले. हिंदुमुसलमानांचें हें सहकार्य निरपवाद अगर निर्विवाद होतें, अगर तें पूर्णपणें अविकृत होतें, असें कांहीं मला म्हणावयाचें नाहीं. पण मुस्लिम आक्रमक हिंदुस्थानांत शिरल्यापासून हिंदु आणि मुसलमान यांच्यामध्यें धार्मिक, राजकीय आणि सामाजिक भांडणांखेरीज दुसरा कसला प्रतिध्वनिच निघाला नाहीं अगर त्यांच्या सहकार्याचें एखादें गोड दृश्य हिंदुस्थानच्या क्षितिजावर कधीं दृग्गोचर झालेंच नाहीं असें म्हणणें केवळ वस्तुस्थितीचा विपर्यास, इतकेंच नव्हे तर इतिहासाचा अपमान करणारें आहे एवढेंच मला म्हणावयाचें आहे.

हिंदु-मुसलमानांचें तें सहकार्य परिपूर्ण नव्हतें; कारण तेव्हां आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन परिपूर्ण नव्हतें. सर्वांना सारखी आणि शक्य तितकी संधि मिळणें हें परिपूर्ण जीवनाचें एक प्रमुख साधन आहे. तेव्हांच्या सरंजामी समाजपद्धतींत अशी संधि मिळणें शक्य नव्हतें. असें असलें तरी त्या वेळच्या सामाजिक जीवनांत एक प्रकारची संगति होती, आणि बहुसंख्याक हिंदी लोक ज्या खेड्यांत रहात होते त्या खेड्यांतील जीवन एक प्रकारच्या सहकार्यानें आणि समाधानीनें परिवेष्टिलेलें होतें. हिंदुस्थानच्या जीवनावर राजकीय प्रक्षोभाच्या कितीहि लाटा उसळल्या तरी या आंतरिक ग्रामीण जीवनाची सहकारसमाधि सहसा भंग पावत नसे.

हिंदुस्थानांत ब्रिटिशांचें आगमन झालें आणि ही समाधि भंग पावली.

त्यांनीं हिंदुस्थानचें जुनें समाजजीवन बरबाद केलें – आणि नव्या समाजजीवनाचा पाया घातला. ब्रिटिशांनीं उत्पादनाचीं नवीं साधनें हिंदुस्थानांत आणलीं आणि नवी उत्पादनपद्धति सुरू केली. हीं साधनें आणि ही पद्धति इतकी व्यापक आणि इतकी क्रांतिकारक होती कीं तिनें हिंदुस्थानच्या जुन्या समाजजीवनाचा सांगाडा खिळखिळा केला. निरनिराळे औद्योगिक कारखाने, वाहतुकीचीं नवीं साधनें, तारायंत्रें, वगैरे गोष्टींनीं हिंदी ग्रामीण जीवनाची सुरम्य अलिप्तता नष्ट झाली आणि हिंदु मुसलमान शेतकरी जगाच्या बाजारांत कठोर वस्तुस्थितीच्या झगझगित प्रकाशांत अवचितपणें येऊन उभा राहीला. अर्थात् ब्रिटिशांनीं आणलेलीं उत्पादनसाधनें अगर उत्पादनपद्धति ही ऐतिहासिक दृष्ट्या उच्च श्रेणीची असल्यानें तत्त्वतः त्यांत प्रतिगामी अगर अपकारक असें कांहीं नव्हतें. परंतु ब्रिटिशांच्या राजनीतीनें त्यांनीं स्वतःच आणलेल्या या नवपद्धतीच्या आणि तिनें निर्माण केलेल्या नवसंस्कृतीच्या विकासास पायबंद घातला – आणि या अवघडलेल्या परिस्थितीमुळें ओढवलेल्या विफलित जीवनांत अनेक विकृति उत्पन्न होऊं लागल्या. हिंदी लोकांचें जुनें संकुचित पण संतोषकारक जीवन नष्ट झालें आणि नव्या समाजजीवनांत त्यांना आपलें स्वाभाविक स्थान शोधून काढणें अशक्य ठरलें. हिंदुस्थानांत नव्या औद्योगिक युगाचा जर सुसंगत आणि स्वाभाविक विकास झाला असता तर हिंदी लोक त्या नवयुगाशीं समरस झाले असते, आणि त्यांना एक नवें समाधान लाभून त्यांच्या जीवनांत ज्या नानाविध विकृति उद्भवल्या त्या उद्भवल्या नसत्या. परंतु हिंदुस्थान ही ब्रिटिश साम्राज्यवाद्यांची एक वसाहत आणि बाजारपेठ झाली. – आणि साम्राज्यशाहीच्या समृद्धीचें मूळ वसाहतीच्या विकृतींत असतें.

हिंदु–मुसलमानांतील तेढ ही या नानाविध विकृतींपैकींच एक आहे. असंतोषाचें उगमस्थान अन्यायांत असतें, आणि हिंदुस्थानच्या नवजीवनांत [विशाल मानवतेच्या दृष्टीनें] न्यायाला फारसा अवकाश उरला नाहीं. हा असंतोष राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रांत सारख्याच तीव्रतेनें धुमसूं लागला. त्यामुळें वास्तवाची जाणीव असह्य होऊं लागली. वास्तवाचें दर्शन असह्य झालें म्हणजे मनुष्य स्वप्नसृष्टींत प्रवेश करतो. हिंदुस्थानांतहि तसेंच झालें. हिंदी

लोकांनीं स्वप्नसृष्टींत प्रवेश केला. हिंदु आणि मुसलमान पूर्वकालीन वैभवाच्या स्वप्नसृष्टींत स्वतःला विसरूं लागले. त्यांना पुनरुज्जीवनाचीं स्वप्नें पडूं लागलीं. सर्व हिंदुस्थानांत पुनरुज्जीवनाची लाट उसळली. ती सर्वस्वीं प्रतिगामी नव्हती. तिच्यांतहि प्रगतीचा कांहीं अंश होता. गतकालीन वैभवाच्या जाणिवेनें पारतंत्र्यामुळें नष्ट झालेला स्वाभिमान जागृत झाला. हिंदी लोकांची अस्मिता जागी झाली. परकीयांपुढें स्वाभिमानशून्यतेनें लांगूलचालन करण्याची प्रवृत्ति कमी होऊं लागली. तेजस्वी स्वातंत्र्यलालसेचा जन्म झाला. पुनरुज्जीवनाच्या कांहीं चळवळींत समाजसुधारणेलाहि भरपूर वाव होता. हिंदु आणि मुसलमान सुधारक, समाजजीवनांतील कोळिष्टकांची साफसफाई करण्यासाठीं, वेद आणि कुराणें यांतील वचनांचा परिणामकारक आधार घेऊं लागले. ब्रिटिशांनीं आणलेल्या नव्या पद्धतींत या सुधारणा अभिप्रेत होत्या; पण त्यांना स्वाभिमानाचा आधार नव्हता, तो या पुनरुज्जीवनवादी सुधारकांनीं दिला आणि सुधारणांचा मार्ग सुकर केला.

पण या पुनरुज्जीवनांतच हिंदु-मुसलमानांच्या तेढीचें बीज सांठविलेलें होतें. पुनरुज्जीवनाच्या उत्साहांत हिंदु-मुसलमानांची दृष्टि मध्यंतरीच्या हिंदु-मुसलमानांच्या सहकार्यावर केंद्रित झाली नाहीं, तर त्या कालखंडाच्याहि पलीकडे उड्डाण करून ती अगदीं प्राचीन कालाचा वेध घेऊं लागली. येथेंच हिंदु आणि मुसलमान यांच्या दृष्टिकोणांत विलक्षण आणि विरोधक असें अंतर पडलें. कारण हिंदु पुनरुज्जीवनवाद्यांची दृष्टि वेदकालावर अधिष्ठित झाली तर मुस्लिम पुनरुज्जीवनवाद्यांची नजर हिंदुस्थानबाहेर कुराणकालीन प्रदेशांवर स्थिर होऊं लागली. हिंदूंना वेद आठवले तर मुसलमानांना कुराणाचें तीव्र स्मरण होऊं लागलें. हिंदूंना रामराज्यानें मोह पाडला, तर मुसलमान खिलाफतींत मश्गूल होऊं लागले. हिंदूंना राम, अर्जुन, राणा प्रताप, शिवाजी हे राष्ट्रवैभवाचीं प्रतीकें वाटूं लागले तर मुसलमानांना साहजिकच अल्लाउद्दिन खिलजी, महमूद गझनी, अवरंगजेब, शहाजहान यांच्या चिंतनानें स्वराज्याचा साक्षात्कार होऊं लागला. स्वराज्याची भाषा दोघेच करीत, परंतु सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचें एक साधन एवढ्याच दृष्टीनें ते स्वराज्याकडे पहात.

पुनरुज्जीवनाचीं स्वप्नें हा आपल्या पारतंत्र्यानें दिलेला मोठा शाप होय. आपल्या ब्रिटिशपूर्व जीवनाचा स्वाभाविक विकास झाला असता, किंवा ब्रिटिशांनीं साम्राज्यवादी धोरणानें प्रेरित होऊन आपणच सुरू केलेल्या नवयुगाच्या स्वाभाविक आणि सुसंगत विकासास पायबंद घातला नसता तर वास्तव जीवन झालें तसें असह्य झालें नसतें आणि या असह्य वास्तवांतून गतकालीन वैभवाचीं खरीखोटीं स्मृतिचित्रें लोकांना भारून टाकूं लागलीं नसतीं. वर्तमानकालांत हातपाय हालवायला कांहीं वाव असला तरच भविष्यकाल आशादायक वाटूं लागतो. पण वर्तमानकाल केविलवाणा आणि कुचंबणा करणारा असला तर गतकालीन वैभवांच्या स्वप्नसृष्टींत स्वतःला विसरून जाण्याखेरीज इलाजच उरत नाहीं. आमच्या विफलित जीवनाचा एक विपरीत परिणाम असा झाला कीं आमची दृष्टि निरोगी राष्ट्राप्रमाणें भविष्यकालाकडे वळण्याऐवजी भूतकालाकडे वळली.

ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाप्रमाणेंच त्यांच्या राजकीय धोरणानेंहि या 'भूतचेष्टा' केल्याच. ब्रिटिशांचें राजकीय धोरण हें अर्थात् त्यांच्या आर्थिक हेतूंचें प्रतिबिंब होतें. हिंदुस्थानांत त्यांच्या आगमनानें अपरिहार्य झालेल्या नवयुगाचा स्वाभाविक विकास हा जसा त्यांच्या आर्थिक धोरणांत अभिप्रेत नव्हता तसा त्यांच्या राजकीय धोरणांतहि नव्हता. असणें शक्य नव्हतें. हिंदुस्थानचें पारतंत्र्य हें त्यांच्या आर्थिक धोरणाशीं सुसंगत असल्यानें राजकीय क्षेत्रांत *Divide et impera* चा अवलंब स्वाभाविकपणेंच झाला. अव्वल इंग्रजींतले ब्रिटिश अधिकारी तर 'फोडा आणि झोडा' [ Divide et impera ]चा अवलंब आणि पुरस्कार अगदीं उघड उघड करीत. एशिॲटिक रिव्ह्यूच्या मे १८२१च्या अंकांत Carnaticus या टोपण नांवाचा एक ब्रिटिश अधिकारी तर स्वच्छच सांगतो कीं, फोडा आणि झोडा हें आपल्या हिंदी राज्यकारभाराच्या सर्व क्षेत्रांतलें बोधवाक्य असावें.* लॉर्ड एल्फिन्स्टन, सर जॉन स्ट्रॅचे प्रभृति इतर ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं देखील हें सांगतांना फारसा आडपडदा

* "*Divide et impera* should be the motto of our Indian adminirsation, whehter political, civil, or military."–*Carnaticus.*

ठेवलेला दिसत नाहीं. $ हिंदुस्थानांतलीं परस्परविरोधी अशीं धर्मतत्त्वें हें ब्रिटिशांच्या राजकीय सामर्थ्याचें एक रहस्य आहे असें सर जॉन स्ट्रॅचे यांनीं चोख सांगितलें आहे.‡ आज देखील 'फोडा आणि झोडा' या विपरीत तत्त्वाचा आविष्कार ब्रिटिशांच्या धोरणांत अजिबात होत नाहीं असें ठांसून सांगणें कोणालाहि शक्य नाहीं. या अपेशी राजकारणाची विस्तृत चर्चा येथें नको, पण एवढें जरूर म्हणतां येईल कीं ब्रिटिशांच्या ज्या अनेक जबाबदाऱ्या [ Obligations ] आज हिंदी स्वराज्याच्या मार्गांत अडचणींचे पर्वत होऊन राहिल्या आहेत त्यांतील कांहींचा तरी उगम या विपरीत अर्थकारणांत आणि राजकारणांत आहे असें सहज सिद्ध करून देतां येईल.

आमच्या अगतिक जीवनांतून निर्माण झालेल्या पुनरुज्जीवनाच्या 'भुता'ची बाधा आपल्या बहुतेक सर्व पक्षांना झालेली दिसते. पाकिस्तानवाले, रामराज्यवाले, हिंदुपदपादशाहीवाले अगर वैदिक साम्यवादवाले – सर्वांची दृष्टि कमीअधिक प्रमाणांत भूतकालावरच खिळलेली आहे, आणि या सर्वांनीं आपल्या पूर्वकालीन संकुचित जीवनांतूनच स्फूर्ति घेतलेली आहे. म्हणूनच त्यांना आधुनिक युगांतील प्रश्नांचीं शास्त्रशुद्ध उत्तरें देतां येतील अशी खात्री वाटत नाहीं. तें कार्य फक्त आधुनिकतावादीच करूं शकतील. ब्रिटिशांनीं निर्माण केलेल्या नवयुगाच्या जन्माबरोबरच आधुनिकतावादाचा जन्म झाला, परंतु या नवयुगाप्रमाणेंच या आधुनिकतावादाचीहि वाढ खुरटली आणिं आधुनिकता अगतिक झाली. आपल्या

---

$ "*Divide et impera* was the old Roman motto and it should be ours."–*Lord Elphinstone.*

‡ "The existence side by side of hostile creeds among the Indian people, is one of the strong points in our political position in India."–*John Strachey*.

सर जॉन स्ट्रॅचे यांच्या या दृष्टिकोनानें विचार केला कीं, कांहीं वर्षांपूर्वीं पूर्व बंगालचे ले. गव्हर्नर सर बॅम्फ्फिल्ड फुल्लर यांनीं हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकारला हिंदु आणि मुसलमान अशा दोन बायका आहेत आणि त्यांतली मुसलमान ही आवडती आहे असे अर्थपूर्ण उद्गार कां काढले हें ध्यानांत येतें.

महाराष्ट्रांतले आगरकरांसारखे अस्सल उदारमतवादी हेच हिंदुस्थानचे खरे आधुनिकतावादी होते. पण त्यांची परंपरा पूर्णांशानें चालविणारा पक्ष आज हिंदुस्थानांत नाहीं. साम्यवादी पक्षानें ही आधुनिकतावादी परंपरा चालविली असती, पण दुर्दैवानें त्यानें आपली सारी स्फूर्ति बाहेरून घेतली. आमच्या बहुतेक साम्यवाद्यांना हिंदुस्थान ही पितृभूमि वाटत असली तरी रशिया हीच त्यांना आपली 'पुण्यभूमि' वाटते. हा खरा आधुनिकतावाद नव्हे.

खरा निरोगी आधुनिकतावाद विकसित जीवनांतूनच निर्माण होतो. व परिपूर्ण जीवनांतच आधुनिकतावादाची परिणति होते. दुर्दैवानें आपलें जीवन अपूर्ण आणि विफलित आहे. भूतकालांतलीं भुतें आपल्याला भेडसावीत असतात. वर्तमानांतल्या अगतिकतेमुळें या भुतांच्या मानेला मिठी मारण्याकडे माणसाची प्रवृत्ति होते; आणि भविष्यकालाबद्दलची धडकी अंतःकरणांत भरल्यामुळें तर तो भूतकालाकडेच पळत सुटतो. भविष्यकालाबद्दलचें भय ही राजकारणांतली एक विचित्र आणि विध्वंसक प्रेरणा आहे. भूतकालांतल्या विफलित जीवनापेक्षां भविष्य-कालांतल्या भयानकतेमुळेंच मनुष्याचें मन अधिक विकृत होतें असें जें ॲड्लर म्हणतो त्याचा विचित्र प्रत्यय राजकारणाइतका इतरत्र क्वचितच येतो. आज हिंदु-मुसलमानांची मनःस्थिति या भयानें भेडसावून गेली आहे. हिंदुस्थानची राजकीय प्रगति दिवसेंदिवस अधिकाधिक आडमार्गानें जात असल्यामुळें पुढें आपलें काय होणार याची धास्ती हिंदु आणि मुसलमान दोघांनाहि वाटत असते. भविष्यकालीन हिंदुस्थानांत आपल्याला निर्धास्तपणें वास करतां येईल याची खात्री मुसलमानांना वाटत नाहीं, म्हणून ते पुनरुज्जीवनाचें तर्कशुद्ध टोंक गांठून पाकिस्तानची विवेकशून्य भाषा बोलतात – तर कांहीं हिंदु गांधार देशहि पुनः हिंदुस्थानला जोडण्याची भाषा करतांना आढळतात. ही धास्ती नाहींशी करणें हें आजच्या परिस्थितींत तरी ब्रिटिश सरकारलाच शक्य आहे—पण स्वतःच्या सत्तेवर विरजण घालणारा हा नसता खटाटोप त्यानें कां करावा ?

हिंदुस्थानचें सांप्रतचें विफलित जीवन संपुष्टांत येऊन त्याच्या आशावादी आणि परिपूर्ण जीवनास सुरवात होईल तेव्हांच हिंदु-मुसलमानांच्या तेढीसारख्या विकृति नष्ट होतील. सामाजिक असंतोष आणि गैरसमज हे विफलित आणि

विकृत जीवनाचीं प्रतिबिंबें असतात. हिंदी जीवन परिपूर्ण झालें, त्या जीवनांत दरेक मनुष्याला प्रगतीचीं आणि संस्कृतीचीं सारीं साधनें उपलब्ध झालीं, दरेक हिंदी माणसाला सुशिक्षण आणि सुसंधि यांचा लाभ झाला, एकंदर आर्थिक जीवन विकसित होऊन प्रत्येकाच्या वृत्तीचा प्रश्न थोडाबहुत समाधानकारक रीतीनें सुटला, थोडक्यांत म्हणजे प्रत्येकाच्या व्यक्तित्वाचा 'विकास शक्य झाला तर आज हिंदु-मुसलमानांच्या तेढीचें कारण होऊन बसलेलें असमाधान, असूया, विकृत स्पर्धा आणि कुत्सितपणा यांना अवकाशच उरणार नाहीं. सांप्रत मुसलमानांचे कांहीं धार्मिक दंडक एकीला मारक झाले आहेत – पण उद्यां प्रत्येकाच्या व्यक्तित्वाचा विकास होण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली तर हेच मुसलमान, ते वास्तवाची विकृत विस्मृति पाडणारे धार्मिक दंडक विसरून भारताच्या विशाल संस्कृतीच्या विकासाला आपुलकीनें हातभार लावण्यास पुढें येतील. सुशिक्षण, सुबत्ता आणि संरक्षण यांच्या परस्परपोषणानेंच संस्कृतीची जोपासना होते. आणि संस्कृतीच्या जोपासनेनेंच विशाल जीवनाचा साक्षात्कार होत असतो. पण हिंदुस्थानची आजची परतंत्र परिस्थिति या विशाल जीवनाला सर्वस्वीं मारक झाली आहे. स्वातंत्र्याखेरीज सुशिक्षण, सुबत्ता आणि संरक्षण यांचा प्रश्न सुटणार नाहीं. म्हणून स्वातंत्र्य हाच हिंदु-मुसलमानांच्या तेढीवर खरा परिणामकारक इलाज आहे. स्वातंत्र्याच्या विशाल प्रश्नाच्या पार्श्व-भूमीवर हिंदु-मुसलमानांचा प्रश्न न्याहाळूं लागलें म्हणजेच त्याचा खरा अर्थ प्रतीत होऊं लागतो आणि तो सोडविण्याचा खात्रीलायक उपायहि दिसूं लागतो.

पाकिस्तानमध्यें स्वातंत्र्य, अगदीं संपूर्ण स्वातंत्र्य शक्य झालें तरी आर्थिक दृष्ट्या पाकिस्तान कमकुवत असल्यानें सुशिक्षण, सुबत्ता आणि संरक्षण यांची त्यांत सोय होणें शक्य नाहीं, व म्हणूनच हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नावर पाकिस्तान ही उपाययोजना होऊं शकत नाहीं. पाकिस्तानच्या प्रस्थापनेनंतर 'पाक' जनतेची आर्थिक अवस्था अधिक अवघड आणि केंविलवाणी होईल – आणि तिच्या धर्मवेडासारख्या विकृति अधिकच वाढीस लागून 'जिहाद'सारखे तिचे धार्मिक दंडक अधिकच भयानक होतील – आणि पाकिस्तान आक्रमक बनण्याचा संभव निर्माण होईल. अर्थात् पाकिस्तान हा आजच्या तेढीवर तोडगा ठरूं शकत

नाहीं. स्वतंत्र, समृद्ध आणि विकसित अखंड हिंदुस्थान हें हिंदु मुसलमान जनतेच्या व्यक्तिविकासाचें एकमेव साधन आहे व म्हणून आजच्या सर्व विकृतींवर तो एकच एक इलाज आहे.

आधुनिकतावाद – शास्त्रशुद्ध आधुनिकतावाद – हाच सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या स्वप्नमय कल्पनांचा तात्त्विक शत्रु होय. पण स्वतंत्र आणि समृद्ध समाजजीवनाखेरीज शास्त्रशुद्ध आधुनिकतावादाचा विजय संभवत नाहीं. आणि असें विकसित जीवन स्वतंत्र आणि समृद्ध अशा अखंड भारतांतच शक्य आहे. पण त्याच्या प्रस्थापनेसाठीं आज पुनरुज्जीवनाच्या सर्व प्रवृत्तींचा मोड करून सर्व आधुनिकतावादी प्रवृत्तींचा परिपोष केला पाहिजे. कोणाला हें विधान वर्तुलाकार वाटेल, पण तसें दुष्ट वर्तुळांत गिरक्या खाणारें तें खरोखर नाहीं. समाजाची अगर राष्ट्राची प्रगति सरळ रेषेंत होत नसते. तिचा विकास नागमोडी वर्तुलाकार [ spiral ] गतीनें होत असतो. म्हणूनच तिच्याकडे संकलित दृष्टीनें पहावें लागतें. हिंदु–मुसलमानांच्या प्रश्नाकडेहि याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे.

सामाजिक चक्रव्यूहांचा भेद करण्याची पद्धति अशीच असते.

---

# १० ‘ भरतवाक्य ’

स्वातंत्र्याच्या विशाल प्रश्नाचें एक उपांग म्हणून हिंदुमुसलमानांच्या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे असें जें मी म्हणतों त्याचा अर्थ असा नव्हे कीं, स्वातंत्र्य मिळेपर्यंत हिंदुमुसलमानांच्या प्रश्नाचा अधिक कांहीं विचार करण्याचें कारण नाहीं. प्रथम हें ध्यानांत घेतलें पाहिजे कीं, स्वातंत्र्य प्रस्थापित झाल्याबरोबर हिंदुमुसलमानांचा प्रश्न अगदीं आपोआप आणि समाधानकारक रीतीनें सुटून एका सुप्रभातीं दरोबस्त सर्व हिंदू आणि मुसलमान ‘ शेजारी ’ बोलपटांतील जिवबा आणि मिर्झा यांच्याप्रमाणें एकमेकांच्या गळयांत मिठ्या मारूं लागतील असें नाहीं. ही स्वप्नसृष्टि प्रत्यक्षांत अवतीर्ण होण्यापूर्वी प्रत्येक व्यक्तीच्या विकासाची शक्यता निर्माण करणारी, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या सजीव तत्त्वांवर अधिष्ठित असलेली समाजस्थिति अस्तित्वांत येणें जरूर आहे. अशी समाजस्थिति निर्माण झाली म्हणजेच हिंदुमुसलमानांच्या तेढीसारख्या विकृतींचें निर्मूलन होईल. हिंदुस्थानचें राष्ट्रीय स्वातंत्र्य ही अशी न्यायनिष्ठ समाजरचना अस्तित्वांत आणण्याची एक किमान आणि अनिवार्य अट आहे, एवढेंच. दुसरें असें कीं, मुस्लिम लीगच्या आजच्या अटी इतक्या विलक्षण आणि भरमसाट आहेत कीं त्या मान्य केल्या तर त्या आपल्या राष्ट्रीयत्वास, राष्ट्रीय आंदोलनास म्हणजे अखेरीस स्वातंत्र्य-संपादनास सर्वस्वीं विघातक ठरल्याखेरीज रहाणार नाहींत. म्हणजे हिंदुमुसलमानांच्या तेढीची विकृति नष्ट करण्याचा जो एकच एक खात्रीचा शास्त्रशुद्ध असा उपाय आहे त्यालाच त्या मारक ठरतील.

लीगवाल्यांच्या या मागण्या मान्य करणें हा हिंदुमुसलमानांचा प्रश्न सोडविण्याचा एक उपाय तर नव्हेच, पण उलट त्यामुळें आज भडकलेल्या आगींत तेलाची भरपूर भर मात्र पडेल. म्हणूनच या मागण्या फेटाळून लावण्यासाठीं कोणती उपाययोजना केली पाहिजे याचा विचार करणें अत्यावश्यक झालें आहे.

आज हा प्रश्न इतका किचकट आणि गुंतागुंतीचा झाला आहे कीं त्यांतून सुटण्यासाठीं कोणत्या तरी स्वप्नसृष्टींत प्रवेश करावा असें वाटूं लागतें. हिंदुस्थानांत एकादा कमाल आतातुर्क निर्माण झाला तर किती नामी होईल!– हें माझें असेंच एक स्वप्न आहे. खरोखर एखाद्या कमालनें हिंदुस्थानांत अवतीर्ण व्हावें आणि हिंदु आणि मुसलमान दोघांच्याहि धार्मिक संस्कृतीचीं कोळिष्टकें आणि जळमटें सफा झाडून काढावींत अशी माझी फार फार इच्छा आहे. कमाल आतातुर्कच्या आगमनाला अनुरूप अशी परिस्थिति हिंदुस्थानांत थोडीबहुत आहे. परंतु परिस्थिति अनुरूप असली म्हणून त्यांतून विभूतीचा अवतार अवश्यमेव होतो असें, If there had been no Napoleon another would have taken his place असे भाववादी उद्गार काढणाऱ्या फ्रेड्रिक एंगल्सप्रमाणें मला वाटत नाहीं. दुसरें असें कीं, कमाल अतातुर्कच्या यशाचा खरा विलास तुर्कस्थानच्या अप्रतिहत स्वातंत्र्यांतच झाला – हिंदुस्थानचें स्वातंत्र्य अद्याप फार दूर आहे [ निदान फारसें जवळपास नाहीं ]. आणखी हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, तुर्कस्थानांत मुस्लिम संस्कृतीवरील जळमटें झाडून टाकणारा कमाल हा स्वतः मुसलमानच होता. हिंदुस्थानांत दोन परस्परविरोधी धार्मिक संस्कृतींची शुद्धि करावयाची आहे – त्याला या दोहोंपैकीं एकाहि धर्मांतला इसम चालणार नाहीं, आणि दोनहि धर्मांबाहेरचा पुरुष या दोघांनाहि परवडणार नाहीं. इतक्या सर्व अडचणी दूर सारून एखादा कमाल हिंदुस्थानच्या क्षितिजावर उगवलाच तर त्याच्या हुकूमशाहीचा आमच्या लोकसत्तावादी ध्येयाशीं समन्वय कसा घालावयाचा हा प्रश्न आहेच! ही सारी वस्तुस्थिति इतकी विदारक आहे कीं, तिच्या प्रखर झळींनीं माझी ती स्वप्नसृष्टि बेचिराख झाल्याखेरीज रहाणें शक्य नाहीं.

दुसऱ्या एका स्वप्नाची कल्पना येथें मनांत येते. हिंदुमुसलमानांनीं आपसांत

एखादें निर्णायक यादवी युद्ध करून या प्रश्नाचा कायमचा सोक्षमोक्ष लावून टाकला तर ? याला कसली हरकत आहे ? एकराष्ट्रीयत्वाचें संरक्षण करण्यासाठीं अमेरिकेनें नाहीं का यादवी युद्धाचें दिव्य पत्करलें ? मग हिंदुमुसलमानांनीं देखील त्या दिव्याचा स्वीकार करावयास कोणती हरकत आहे ? हें स्वप्न भयानक आहे, तें प्रत्यक्षांत उतरलें तर अनेक निरपराध हिंदु मुसलमान नागरिकांना नाहक प्राणांना मुकावें लागेल—पण तें खरें झालें तर हिंदु अगर मुसलमान यांपैकीं कोणाचा तरी एकदां कायमचा निष्पात अगर पराभव होऊन या प्रश्नाचा अखेरचा निकाल लागेल एवढें खरें. पण हें स्वप्न खरें ठरूं शकत नाहीं. हिंदुस्थानांत हिंदु आणि मुसलमान यांच्याखेरीज जी तिसरी आणि आजमितीस निर्णायक असलेली शक्ति आहे ती [ म्हणजे ब्रिटिश सरकार ] हिंदुमुसलमानांना आपल्या जातीय प्रश्नाचा निकाल या मार्गानें लावूं देणार नाहीं. या भयानक परंतु निर्णायक मार्गाचा अवलंब करावयाचा असेल तर हिंदुमुसलमानांनीं प्रथम एक होऊन ब्रिटिश सत्तेचा शेवट केला पाहिजे, म्हणजे निर्भेळ स्वातंत्र्य प्रस्थापित केलें पाहिजे. पण स्वातंत्र्य-संपादन आणि तें देखील हिंदुमुसलमानांच्या एकीनें करणें म्हणजेच हिंदुमुसलमानांचा प्रश्न सोडविणें होय. एवढें झाल्यावर त्या यादवी युद्धाची गरजच पडणार नाहीं. पण हें देखील एक स्वप्नच नव्हे काय ?—एका स्वप्नाच्या पूर्तीसाठीं दुसरें स्वप्न !

तें कांहींहि असलें तरी आजच्या परिस्थितींत ब्रिटिश सरकार असले यादवी युद्धाचे भेसूर चाळे करूं देणार नाहीं एवढें निश्चित. हिंदुमुसल्मानांच्या एखाद्या दंग्याचेंच उदाहरण घ्या. हा दंगा म्हणजे अल्पशा प्रमाणावर चालणारें आणि अल्पशा स्वरूपाचें असें एक यादवी युद्धच होय. परंतु या देशाच्या भौतिक शांततेची हमी घेतलेलें आपलें सरकार दंगेखोरांस तें युद्ध केव्हां तरी खुल्या दिलानें आणि सोक्षमोक्ष करण्याच्या वृत्तीनें लढूं देतें काय ? नाहीं. अर्थात् यामुळें दंग्याच्या दिवसांत हिंदु आणि मुसलमान दंगेखोरांची स्थिति एकमेकांकडे विद्वेषपूर्ण कुर्रेबाज दृष्टीनें पहाणाऱ्या सशस्त्र तळांप्रमाणें होते, पण या तळांना एकमेकांशीं धडक मात्र घेतां येत नाहीं. कांहीं दिवसांनीं दोघेहि तळ कंटाळतात, त्यांचा उत्साह थंडावतो आणि दंगा शमतो. पण आंत, राखेच्या आंत विद्वेषाचा वन्हि मात्र

तसाच धुमसत रहातो. तें असो. पण या स्वप्नाच्या परिपुर्तीनें 'हिंदु–मुसलमानांच्या तेढीचा प्रश्न सुटला तरी यादवी युद्धाचे एकंदर परिणाम इतके भयंकर असतात कीं असलें स्वप्न वास्तवसृष्टींत उतरावें असें कोणाहि शहाण्या माणसास वाटणार नाहीं.

अशा परिस्थितींत स्वप्नसृष्टीचा निरोप घेऊन विदारक वस्तुस्थितीकडे वळण्याखेरीज गत्यंतरच नाहीं. ही विदारक वस्तुस्थिति म्हणजे मुस्लिम लीगच्या सांस्कृतिक आणि राजकीय मागण्या. आतां, कोणाच्याहि विशुद्ध सांस्कृतिक म्हणजे परिणामीं मानवी संस्कृतीच्या उत्कर्षास हातभार लावणाऱ्या मागण्यांस विरोध करण्याचें कारण नाहीं. परंतु लीगच्या सांस्कृतिक मागण्या मात्र अशा विशुद्ध स्वरूपाच्या दिसत नाहींत. त्यांपैकीं कांहीं कदाचित् योग्य असतील. उदाहरणार्थ, 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीतानें मूर्तिपूजेची भावना निर्माण होत असेल तर दुसरें एखादें राष्ट्रगीत स्वीकारण्यास कोणीहि समतोल बुद्धीचा इसम विरोध करणार नाहीं. परंतु अडीच–तीन कोटी मूठभरांची मातृभाषा उर्दू–ही चाळीस कोटी हिंदवासीयांची राष्ट्रभाषा व्हावी अशी मस्तवाल मागणी जेव्हां लीगवाले करतांना आढळतात तेव्हां त्यांच्या सांस्कृतिक मागण्यांचें स्वरूप सत्तालोलुपतेनें आणि धार्मिकतेच्या विकृतीनें किती विषारी झालें आहे याचा प्रत्यय येतो आणि अशा विषारी मागण्यांचा कांटा मुळापासून उपटून टाकला पाहिजे अशी भावना निर्माण झाल्याखेरीज रहात नाहीं.

परंतु मुस्लिमेतरांनीं खरोखर या मागण्यांबाबत नेहमींच उदारवृत्ति धारण केली आहे. मुस्लिमेतरांच्या धार्मिक वा सांस्कृतिक भावनांचें काय हवें तें होवो पण मुसलमानांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक भावनांचा भरपूर मान राखला पाहिजे हें तत्त्व त्यांनीं नेहमींच मान्य केलें आहे. पं. नेहरूसारखे नास्तिकहि या तत्त्वाच्या संपूर्ण परिपूर्तीसाठीं हवी ती सीमा गांठायला तयार झाले आहेत. राष्ट्रसंघासारख्या एखाद्या आंतरराष्ट्रीय संस्थेकडे अगर लवादाकडे या मागण्या सोंपवून ते देतील तो निकाल मान्य करण्याची तयारी मुस्लिमेतरांनीं नेहमींच दाखविली आहे. परंतु मुसलमान पुढाऱ्यांना हें फारसें पसंत नाहीं. याचें कारण उघड आहे. राष्ट्रसंघासारखी संस्था केव्हांहि झालें तरी जो निर्णय देणार

तो लोकसत्तावादाच्या कांहीं अनिवार्य तत्त्वांना अनुसरूनच देणार. आणि तेंच तर मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांना मान्य नाहीं. लोकसत्तावादी स्वरूपाच्या कोणत्याहि राजवटींत हिंदी मुसलमान हे कांहीं झालें तरी अल्पसंख्यांकच रहाणार. फार झालें तर त्यांना थोडें जादा प्रतिनिधित्व मिळेल आणि त्या प्रमाणांत त्यांना अधिकार–प्राप्ती होईल, परंतु सबंध हिंदुस्थानवर पुनरपि मुस्लिम अधिराज्य प्रस्थापित करण्याचीं त्यांचीं साम्राज्यवादी स्वप्नें मात्र कदापि खरी ठरणार नाहींत.

आणि म्हणूनच लोकसत्तावादाच्या तर्कशुद्ध कक्षेतून सुटण्यासाठीं लीगच्या पुढाऱ्यांची आज सारी धडपड चालू आहे. त्यांच्या पाकिस्तानच्या मागणीकडे याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे. ही पाकिस्तानची मागणी प्रामाणिक आहे, असें समजण्याचें कारण नाहीं. हजरत मोहनीसारखे कांहीं अगदीं थोडे [ आणि आज मुस्लिम राजकारणांत ज्यांना फारसें कोणी विचारीत नाहीं असे ] मुसलमान पुढारी वगळले तर पाकिस्तानबद्दल मुस्लिम पुढाऱ्यांना प्रेम बेताबाताचेंच वाटतें. पण पाकिस्तान ही एक घोषणा आहे. ती एक उठावणी आहे. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत लोकसत्तावादी तत्त्वांप्रमाणें अल्पसंख्याक मुसलमानांना अधिकांत अधिक प्रतिनिधित्व जितकें लाभूं शकेल त्याहून दीडपट–दुप्पट प्रतिनिधित्व उकळण्यासाठीं कांहीं मुस्लिम पुढाऱ्यांनीं टाकलेला तो एक डाव आहे – आणि याच एका दृष्टीनें पाकिस्तानकडे मुस्लिमेतरांनीं पहाणें जरूर आहे.

लोकसत्तावादी राजवटींत निरनिराळ्या लोकांना आणि हितसंबंधांना कोणत्या प्रमाणांत प्रतिनिधित्व असावें याची कांहीं आवश्यक लक्षणें मोठमोठ्या तत्त्वज्ञांनीं आणि विचारवंतांनीं फार विचार करून ठरविलीं आहेत. त्यांचा थोडक्यांत गोषवारा प्रो. वेणीप्रसाद यांनीं आपल्या Hindu-Muslim Questions या पुस्तकांत दिला आहे. तो असाः—

(i) It must not reduce a majority to minority or to equality with the minorities as a whole anywhere [ म्हणजे बहुसंख्याकांना अल्पसंख्याक करूं नये ];

(ii) it must not reduce the representation of a minority below its numerical representation [ म्ह० अल्पसंख्याकांना त्यांच्या लोकसंख्येच्या मानापेक्षां कमी प्रतिनिधित्व मिळूं नये ];

(iii) it must give a reasonable weightage to minorities in an inverse proportion to its numbers [म्ह० अल्पसंख्याकांना त्यांच्या लोकसंख्येच्या उलट प्रमाणांत जादा प्रतिनिधित्व मिळावें];

(iv) The weightage must not be so large as to jar on the sense of justice and fairness and require the exertion of force rather than an appeal to the twin principles of justice and political expendiency for its maintenance [पण हें जादा प्रतिनिधित्व, जबरदस्तीनें प्रस्थापित करण्याची पाळी ओढवण्यासारखें अन्याय्य नसावें].*

हीं तत्त्वें फाजील उदार आहेत असेंच पुष्कळांना वाटेल. One man, one vote [एक व्यक्ति, एक मत] असा लोकसत्तावादाचा रोखठोक अर्थ करणाऱ्या लोकांना तर त्यांचा संताप येईल. पण या उदार तत्त्वांच्या दृष्टीनें पाहिलें तरी

---

* या संबंधांत राष्ट्रसंघाच्या प्रेरणेनें युरोपीय राष्ट्रांत जे अल्पसंख्याक तह [Minorities Treaties] झाले त्याबद्दलचीं कांहीं पाश्चात्य मुत्सद्यांचीं मतें उद्धृत करणें अवश्य वाटते–

(I) The object of the Minorities Treaties was to secure for the Minorities that measure of protection and justice which would generally prepare them to be merged in the national communities to which they belonged [*Sir Austen Chamberlain*].

(II) It seems to me obvious that those who conceived this system of protection of minorities did not dream of creating within certain states a group of inhabitants who would regard themselves as permanently foreign to the general organisation of the country [*M. DeMello Franco*].

(iii) We must avoid creating a State within a State. We must prevent the minority from transforming itself into a privileged caste and taking definite form as a foreign group [*M. Blociszewski*].

(iv) If privileges were granted to the Minority, inequality would be created between the Minority ahd the Majority. This latter would be oppressed by the Minority and it would then the Majorities' question which would have to engage the attention of the League of Nations [*M. Dendarmis*].

एकटा बंगाल प्रांत सोडला तर इतर सर्व प्रांतांत मुस्लिमेतरांनीं मुसलमानांच्या हक्कांचें भरपूर माप त्यांच्या पदरांत टाकलें आहे असें दिसून येईल. बंगालमध्यें युरोपीअन व इतर गटांनीं हिंदु-मुसलमानांवर, दोघांवरहि [ अर्थात् हिंदूंवर अधिक प्रमाणांत ] कुर्घोडी केली आहे – पण इतर प्रांतांत मुसलमानांना इतकें प्रतिनिधित्व मिळालें आहे कीं त्यापैकीं कांहीं थोडें काढून घ्यावयासहि हरकत नाहीं असेंच कांटेकोर वृत्तीच्या माणसास वाटेल. ह्या सर्वच प्रश्नाची पुनः एकदां फेरतपासणी करावी [ should be considered *de novo* ] आणि मुसलमानांना मिळालेलें फाजील प्रतिनिधित्व कमी करावें असें तर अनेकांना वाटूं लागलें आहे.

तरीदेखील मुस्लिम पुढाऱ्यांचें समाधान नाहीं तें नाहींच. साऱ्या हिंदुस्थानवर पुनरपि मुस्लिम सार्वभौमत्व प्रस्थापित करण्याचीं साम्राज्यवादी स्वप्नें त्यांना पडत असल्यामुळे किती तरी अधिक प्रतिनिधित्व त्यांना हवें आहे आणि त्यासाठींच पाकिस्तानचा आणि द्विराष्ट्र–सिद्धान्ताचा खटाटोप त्यांनीं आरंभिला आहे. मुसलमान ही एक जमात [ community ] आहे, हें मान्य केलें तर मुसलमानांना आजवर जें प्रतिनिधित्व मिळालें आहे त्याहून अधिक मागावयास आपल्याला तोंडच नाहीं हें मुस्लिम पुढारी बरोबर ओळखतात. म्हणूनच मुसलमान हे एक जमात नसून हिंदूंप्रमाणेंच स्वतंत्र राष्ट्र [ nation ] आहेत अशी ओरड त्यांनीं सुरू केली आहे. हिंदूंच्या बरोबरीनें आपला राष्ट्रीयत्वाचा हक्क मान्य झाला म्हणजे हिंदुस्थानच्या राजकारभारांत आपल्याला हिंदूंच्या बरोबरीनें अधिकार प्राप्त होईल अशी आशा त्यांना वाटते, व तसा बरोबरीचा हक्क त्यांनीं सांगावयास सुरवातहि केली आहे.

पण सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर मुसलमानांचें हें तथाकथित राष्ट्रीयत्व म्हणजे शुद्ध अतिराष्ट्रीयत्व आहे. कॉंग्रेस आली तर निम्म्या जागा, नाहीं तर निर्विवाद बहुमत, ही मागणी गतवर्षी जीनांनीं व्हाइसरॉयकडे केली तेव्हांच या अति-राष्ट्रीयत्वाला वाचा फुटली; पण वस्तुतः मुसलमानांना ५०% [ निम्या ] जागा दिल्या तरी त्यांना बहुमत मिळतेंच. कारण, उरलेल्या निम्या जागांत हिंदु आणि इतर सर्व अल्पसंख्याक यांची व्यवस्था करणें भाग आहे; आणि ती केली

म्हणजे बहुसंख्य हिंदु हे कायमचे अल्पसंख्याक होऊन अल्पसंख्याक मुसलमानांपेक्षां त्यांचा राजकीय दर्जा कमी होतोच, पण मुस्लिमेतर अल्पसंख्याक, सत्ताधीश होणाऱ्या मुसलमानांना मिळण्याचा निश्चित संभव असल्यानें मुसलमानांना निर्विवाद प्रभुत्व मिळतें आणि हिंदु हे अगतिक गुलाम होतात. हिंदु राष्ट्रीयत्वाच्या बरोबरीनें मुस्लिम राष्ट्रीयत्वास मान्यता मिळाली पाहिजे ही मुस्लिम पुढाऱ्यांची भाषा प्रामाणिक असती तर त्यांनीं निम्में प्रतिनिधित्व मागितलें नसतें; इतर अल्पसंख्याकांचे हक्क भागवून उरलेल्या जागांत निम्मी भागिदारी मागितली असती. परंतु एवढी सवलत दिली तर अस्पृश्य हे कायदेशीर अल्पसंख्याक असल्यानें त्यांना अगोदर स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळेल, आणि उरलेल्या हिंदूंची आणि जागांचीहि संख्या कमी होईल. अशा परिस्थितींत स्पृश्यास्पृश्यांची एकी होऊन कदाचित् आपण पूर्वीसारखेच अल्पसंख्याक राहूं अशी त्यांना भीति वाटते. तेवढाहि धोका पत्करण्याची मुसलमान पुढाऱ्यांची तयारी दिसत नाहीं. स्पृश्य आणि अस्पृश्य दोघांवरहि प्रभुत्व गाजविण्याची जबरदस्त अभिलाषा त्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेली दिसते. हा अंतस्थ हेतु साध्य करण्यासाठीं ते आज मुस्लिम राष्ट्रीयत्वाच्या गप्पा मारीत आहेत, पण वस्तुतः तें राष्ट्रीयत्व नसून अतिराष्ट्रीयत्व आहे. हिंदुस्थानचे स्वाभाविक राज्यकर्ते मुसलमानच आहेत, इंग्रज गेल्यावर मुसलमानांचेंच अधिराज्य प्रस्थापित झालें पाहिजे या विकृत समजुतीच्या पोटीं त्याचा जन्म झाला आहे.

बहुसंख्य हिंदूंना कायमचे 'अल्पसंख्याक' गुलाम बनविणाऱ्या आणि मुस्लिम अल्पसंख्याकांचें अधिराज्य प्रस्थापित करणाऱ्या या साम्राज्यवादी मागण्या मान्य करणें म्हणजे स्वातंत्र्याचा मुडदा पाडणें आणि राष्ट्रीयत्वाला कायमचें बरबाद करणें नव्हे काय ? या अन्याय्य मागण्यांच्या पायावर आधारलेलें स्वातंत्र्य, स्वातंत्र्य ठरलें तरी सामाजिक विकृतींचा नायनाट करणारी न्यायनिष्ठ समाजरचना तें कधींहि अस्तित्वांत आणूं शकणार नाहीं हें उघड नाहीं काय ?

कांहीं पुरोगामी प्रवृत्तीच्या लोकांना याची फिकीर वाटत नाहीं. त्यांच्या मतें, हा प्रतिनिधित्वाचा वाद मूठभर वरच्या लोकांसाठीं आहे, बहुजनसमाजाचा

त्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं, कारण बहुजनसमाजाला मतदानाचा हक्क नाहीं. हा हक्क आज नाहीं ही गोष्ट खरी आहे, पण तरीहि बहुजनसमाज या मूठभर वरच्या पुढाऱ्यांच्या मागें आहे ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. आणि दुसरें असें कीं, जीना–सावरकर प्रभृति लोकांचा आज तरी बहुजनसमाजाला मतदानाचा हक्क देण्यास विरोध दिसत नाहीं. पण तमाम जनतेला मतदान दिलें तरी प्रतिनिधित्वांच्या प्रमाणांत कांहीं फरक पडलेला मात्र त्यांना सहन होणार नाहीं. म्हणजे अखेरीस या प्रतिनिधित्वाच्या प्रमाणाचा प्रश्न महत्त्वाचा ठरतोच. तेव्हां प्रगतिवादी लोकांना देखील त्याचा विचार करणें भाग आहे. शिवाय, हेंहि विसरून चालणार नाहीं कीं, या प्रमाणाचा लोकसत्तावादी तत्त्वांशीं निकटचा संबंध आहे; आणि आजच्या जगांत तरी प्रगतिवाद्यांनीं लोकसत्तावादाचें प्रतिपालन अगदीं कटाक्षानें होईल अशी काळजी वहाणें जरूर आहे. अर्थात् जे काल्च्या जगांतच अजून वास्तव्य करून आहेत आणि एंगल्सप्रमाणें ज्यांना वाटतें कीं, History proceeds in such a way that the end–result [ म्ह० साम्यवाद ] always issues...त्यांची ध्येयवादी स्थितप्रज्ञता या वाद-विवादानें विघडण्याचें कारण नाहीं, हें मी जाणतों. पण शहाण्या लोकांनीं या अशा ध्येयवाद्यांचा अधिक विचार करण्याचें कारण नाहीं.

पण दुर्दैव असें कीं, इतर पक्षांच्या ध्यानांत देखील मुसलमानांच्या मागण्यांचें स्वरूप अद्याप आलेलें दिसत नाहीं. अर्थात् डॉ. आंबेडकर हे या विधानाला बरेचसे अपवाद आहेत. मुसलमानांना पन्नास टक्के देणें म्हणजे राष्ट्रावर आपत्ति ओढवून घेणें होय हें ते जाणतात, व म्हणूनच त्यांची पाकिस्तानची मागणी तावडतोब देऊन टाकावी असें ते म्हणतात. परंतु ही पाकिस्तानची मागणी प्रामाणिक आहे, किंवा मुसलमान पुढाऱ्यांना पाकिस्तानखेरीज दुसरें कांहीं सुचतच नाहीं असें ते धरून चालत आहेतसें वाटतें. पाकिस्तान ही एक केवळ घोषणा आहे, ती एक उठावणी आहे, पन्नास टक्के मिळविण्यासाटीं टाकलेला तो एक धूर्त डाव आहे याची स्पष्ट फोड त्यांच्या पुस्तकांत झालेली कोठेंच दिसत नाहीं. दुसरा पक्ष म्हणजे कॉंग्रेस पक्ष. मुसलमानांच्या मागण्यांमुळें कॉंग्रेसची अवस्था नेहमींच केविलवाणी होते. मुसलमानांच्या मागण्यांना

विरोध करणें म्हणजे कांहीं भूरी राष्ट्रीयता-विरोधी अधम कृत्य करणें होय अशी कॉंग्रेसवाल्यांची समजूत झालेली दिसते, आणि असा मनोगंड कॉंग्रेसवाल्यांनीं जनतेंत पसरविलेला आढळून येतो. या मनोगंडानें विकृत झालेल्या कॉंग्रेसकडून 'कम्युनल अवॉर्ड 'सारख्या चक्क अन्याय बाबतींतहि neither accept nor reject सारख्या तृतीय प्रकृति भूमिकेखेरीज दुसऱ्या कोणत्या भूमिकेची अपेक्षा करणें शक्य आहे ? आणि म्हणून पाकिस्तान अगर पन्नास टक्के यांच्याबद्दल साधा ठरावहि कॉंग्रेसनें केला नाहीं याबद्दल आश्चर्य वाटण्याचें काय कारण आहे ? त्या मानानें आमचे नेमस्त पुढारी अधिक तर्कशुद्धतेनें आणि राष्ट्रीयत्वानें विचार करूं शकतात, असें दिसतें. पण ब्रिटिशांवर अवास्तव विश्वास टाकायची संवय त्यांना जडलेली असल्यानें सरकार पाकिस्तानला मान्यता देण्यास तयार होणार नाहीं या एका विचारानेंच ते निश्चिंत झालेले दिसतात. भरमसाट प्रतिनिधित्व मिळविण्यासाठीं टाकलेला तो एक डाव आहे हें त्यांच्या नीटसें ध्यानांत आलेलें दिसत नाहीं. त्या मानानें मुनशी, सावरकर आणि कांहीं इतर हिंदु पुढारी या प्रश्नाकडे अधिक अचूक दृष्टीनें पहातात व त्यांनीं पाकिस्तानला कमर कसून विरोध चालविला आहे.

पण या त्यांच्या उत्साहांतच एक धोका आहे – कारण त्यांच्या पाकिस्तान-विरोधी प्रचारानें पाकिस्तान ही एक महाभयंकर आपत्ति आहे अशी अवास्तव धडकी हिंदूंच्या हृदयांत भरली तर ही आपत्ति टाळण्यासाठीं मुसलमानांच्या भरमसाट प्रतिनिनित्वाला मान्यता देण्याकडे त्यांची वृत्ति झुकेल. अशा धास्तीचें भूत निर्माण करणें हा तर लीगच्या पुढाऱ्यांचा कावा आहे, आणि हें त्यांनीं स्वीकारलेल्या नात्सीतंत्राला अगदीं धरून आहे. आपल्या अन्याय्य मागण्या मान्य करून घेण्यासाठीं कसल्या तरी अभद्र आपत्तीचें भूत निर्माण करावयाचें हा नात्सींचा नेहमींचाच शिरस्ता आहे. इंग्लंड-फ्रान्सकडून सवलती मिळविण्यासाठीं बोल्शेव्हिझमचें भूत हिटलरनें असेंच उठवलें होतें. त्याचीच ही अनुकृति आहे. म्हणून हिंदूंनीं पाकिस्तानकडे अगदीं माथें शाबूत ठेवूनच पाहिलें पाहिजे. पाकिस्तान अस्तित्वांत आलें तर 'हिंदुस्तान'च्या स्वातंत्र्यास धोका निर्माण होईल हें खरें. पण तो नुसता संभवनीय धोका आहे – हिंदूंनीं ताबडतोब बद्धपरिकर

होऊन 'हिंदुस्थान'च्या सुसज्ज संरक्षणाच्या तयारीस सुरवात केली तर हा धोका कदाचित् कधीं जाणवणारच नाहीं. पण मुसलमानांना एकदां पन्नास काय, ४५ [ ४३% त्यांना आजच एका रूपानें मिळाले आहेत ] टक्के प्रतिनिधित्व मिळालें तरी हिंदूंच्या स्वातंत्र्यास कायमचा व खात्रीलायक धोका निर्माण होईल. स्वतःच्या देशांत बहुसंख्य असूनहि त्यांना कायमचें अल्पसंख्याक बनून गुलामगिरींत रखडावें लागेल. पुढेंमागें अगदी निर्भेळ, सचेतन असें धर्मातीत राष्ट्रीयत्व निर्माण झालें तर हिंदूंची थोडीबहुत सुटका होईल. परंतु अन्यायानें मिळविलेल्या प्रतिनिधित्वाच्याच जोरावर सत्ताधीश झालेले मुस्लिम राज्यकर्ते असें धर्मातीत राष्ट्रीयत्व कधींच निर्माण होणार नाहीं अशी खबरदारी घेणार नाहींत काय?

पाकिस्तानचा खरा धोका हा आहे. पाकिस्तानची प्रत्यक्ष भीति वाटण्याचें हिंदूंना कारण नाहीं. एक भावनेचा प्रश्न सोडला तर ही पन्नास टक्क्यांची आपत्ति पत्करण्यापेक्षां पाकिस्तानच्या प्रस्थापनेस मान्यता देण्यांतच हिंदूंचें अधिक हित आहे. पण मुस्लिम पुढाऱ्यांना खरे डोहाळे पाकिस्तानचे लागलेले नाहींत. ब्रिटिश सरकारची पाकिस्तानला मान्यता मिळणार नाहीं, आणि मिळाली तरी पाकिस्तानचे प्रांत आर्थिक दृष्ट्या इतके भिकार आहेत कीं ते स्वीकारण्यांत मुसलमानांचा फारसा कांहीं फायदा नाहीं, एवढें ते जाणतात. म्हणून पाकिस्तानची अवास्तव धास्ती निर्माण करून भरमसाट प्रतिनिधित्व उपटायचें हा त्यांचा डाव आहे. आणि या बाबतींत गांधी त्यांना उपकारक ठरतील अशी मला भीति वाटते. Vivisect me before vivisecting India [ हिंदुस्थानचीं शकलें पाडण्यापूर्वी अगोदर माझीं खांडोळीं करा ] हें त्यांचें जें वाक्य आज मुनशी अगदीं जोरांत उद्धृत करीत आहेत तेंच हिंदूंच्या हिताला बाधक होईल अशी धास्ती मला वाटते.

कसें तें पहा, समजा, उद्यां मुसलमानांनीं आपली पाकिस्तानची मोहिम पराकोटीला नेली [ म्हणजे पाकिस्तान–नाटकाचा अखेरचा प्रवेश सुरू केला ] आणि सरकारनें मतलबी मुत्सद्देगिरीनें, 'हिंदूंची अनुज्ञा मिळवा, पाकिस्तान देतों' असें जाहीर केलें, आणि आतां देशाची शकलें पडणार अशीं लक्षणें दिसूं लागलीं, तर गांधी, Vivisect me before vivisecting India हा मंत्र

जिभेच्या शेंड्यावर ठेवून, मॅक्डोनल्ड-अ‍ॅवॉर्डला विरोध करण्यासाठीं, पुणें-करारापूर्वीं, त्यांनीं उपवास केला होता तसा उपवास आरंभतील अशी मला भीति वाटते. असें झालें म्हणजे सर्वसाधारण हिंदुमात्राच्या मनांत उत्पन्न झालेली पाकिस्तानबद्दलची अवास्तव धास्ती आणि गांधींच्या प्राणांची सर्वसाधारण हिंदु अगर हिंदी माणसाला वाटणारी विवंचना यांच्यामुळें मुस्लिम पुढाऱ्यांचें भलतेंच फावेल. त्यांना एकदम गांधीच्या प्राणांबद्दल विलक्षण फिकीर वाटूं लागेल. 'कोणत्याहि भुक्कड मुसलमानांपेक्षां नीच प्रतीचे असे' गांधी एक जगद्वंद्य विभूति आहेत याची त्यांना अचानक जाणीव होईल, आणि त्यांच्या जिव्हा आणि झरण्या गांधी महात्म्याचे अध्यायांवर अध्याय [ याने कल्मे ] स्रवूं लागतील. आणि मग अर्थात् गांधींचे अमोलिक प्राण वांचविण्यासाठीं ते पाकिस्तानची मागणी सोडून द्यावयास तयार होऊन फक्त पन्नास टक्के प्रतिनिधित्वावर खूष रहाण्याचें औदार्य दाखवतील. या पन्नास टक्क्यांना हिंदूंनीं संमति देणें हेंच या नाटकाचें भरतवाक्य होय. हें भरतवाक्य म्हणावयाचें कीं नाहीं हें हिंदूंनीं आणि हिंदी राष्ट्रीयत्वाची ज्यांना थोडीशी तरी फिकीर वाटते अशा सर्वांनीं आतांच ठरविणें जरूर आहे. हीच त्यांच्या राष्ट्रीयत्वाची खरी कसोटी आहे. गांधी असा आचरट उपवास करणार नाहींत अशी आशा आपण करूं या, पण गांधींनीं तसा अभद्र उपवास सुरू केलाच तर, पुणें-करारापूर्वीं डॉ. आंबेडकरांनीं जसें जाहीर केलें तसें प्रत्येक राष्ट्रवाद्यानें टाहो फोडून सांगितलें पाहिजे कीं, 'गांधी फार थोर विभूति असतील, त्यांचे प्राण मलाहि प्रिय आहेत. पण गांधींच्या एकट्याच्या प्राणांपेक्षां मला बत्तीस कोटी मुस्लिमेतरांचे प्राण अधिक प्यार आहेत. मला समोरच्या कंदिलाच्या खांबावर लटकविलेंत तरी मी त्यांच्या न्याय्य हक्कांवर वरवंटा फिरविण्यास संमति देणार नाहीं. मुसलमानांना आम्हीं आजवर भरपूर प्रतिनिधित्व दिलेलें आहे. अधिक प्रतिनिधित्वावर त्यांचा आतां कांहींहि हक्क उरलेला नाहीं. म्हणून मी साफ सांगतों कीं मुसलमानांना इतउत्तर एकहि अधिक जागा मिळणार नाहीं. त्यांचें माथें फिरलेंच असेल तर त्यांनीं तें पाकिस्तानच्या फत्तरावर जरूर फोडून घ्यावें-आम्ही आमची शक्य ती ताकद खर्च करून तें बचावण्याची कोशिस करूं.'

## प्रभाकर पाध्ये यांचीं पुस्तकें –

प्रकाशित

- आजकालचा महाराष्ट्र [ सहकार्यानें ]
- प्रकाशांतील व्यक्ति
- पाकिस्तान कीं पन्नास टके ?

आगामी

- ? [ वाङ्मयविषयक लेख ]
- ? [ लघुकथा ]
- ? [ व्यक्तिचित्रें ]
- आधुनिक युगाचे सहप्रवासी

६१४०

REFBK-0006140